## आज रायगडमध्ये पावसाची शक्यता

**रायगड :** रायगड जिल्ह्यात बुधवारी (दि. २०) अनेक भागांमध्ये पावसाची शक्यता वर्तविण्यात आली असून, सकाळपासूनच काही ठिकाणी रिमझिम स्वरूपाचा पाऊस पडू शकतो, असा अंदाज भारतीय हवामान विभागाच्या मुंबई प्रादेशिक केंद्राने व्यक्त केला आहे. वाढत्या उकाड्यामुळे हैराण झालेल्या नागरिकांना या पावसामुळे काहीसा दिलासा मिळण्याची शक्यता असली तरी दुसरीकडे आंबा उत्पादक शेतकऱ्यांची चिंता मात्र वाढली आहे. गेल्या काही दिवसांपासून रायगड जिल्ह्यात तापमानात मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून, घराबाहेर पडणेही कठीण झाले आहे.

# कृषीवल

रायगड, बुधवार, दि. २० मे २०२६

किंमत ४ ₹

## पेट्रोल-डिझेलच्या दरात पुन्हा वाढ

**मुंबई :** अवघ्या चार दिवसांपूर्वी इंधन दरात मोठी वाढ झाल्यानंतर आता पुन्हा पेट्रोल आणि डिझेलच्या दरात जवळपास एक रुपयांची वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे वाहनधारकांच्या खिशावर आणखी ताण पडणार असून, वाढत्या इंधन दरांमुळे सर्वसामान्यांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. मंगळवारी जाहीर झालेल्या नव्या दरानुसार पेट्रोलच्या दरात प्रतिलीटर ९१ पैशांची वाढ झाली असून, पेट्रोलचा दर १०६.९८ रुपयांवरून १०७.८९ रुपये, तर डिझेलच्या दरात प्रतिलीटर ९४ पैशांची वाढ होऊन तो ९३.४५ रुपयांवरून ९४.३९ रुपये प्रतिलीटर झाला आहे.




**दि.बा. पाटील यांच्या नावावरून राज्य, केंद्र सरकारचा डाव उघड**

**नवी मुंबई विमानतळाच्या नामकरणाला वेगळे वळण लागल्याने संताप**

# भूमीपुत्रांच्या भावनांशी खेळ!

## सर्वोच्च न्यायालयाने याचिका फेटाळली

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचं नाव देण्याच्या मागणीवरून सुरू असलेल्या संघर्षाला आता धक्कादायक वळण मिळालं आहे. सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी या प्रकरणात थेट हस्तक्षेप करण्यास नकार देत याचिका फेटाळली आणि 'नामकरणाचा अधिकार सरकारचा आहे' असं स्पष्ट केलं. मात्र, या निर्णयानंतर आता राज्य आणि केंद्र सरकारवर संतप्त भूमीपुत्रांनी पान २ वर

> दि.बा. पाटील हे लोकनेते होते. विमानतळाला त्यांचे मिळावे, यासाठी लोकांना न्यायाची अपेक्षा आहे. त्यासाठी ते आमदार, खासदारांकडे गेले. सरकार, प्रशासनाकडे गेले. रस्त्यावरची आंदोलने करुनसुद्धा सरकार न्याय देत नाही, म्हणून त्यांना न्यायालयात धाव घेतली. न्यायालयाने संबंधित सरकारला यावर त्वरित निर्णय घेण्याचे आदेश द्यायला हवेते. निर्णय आमच्या अधिकारात नाही, असे न्यायालयाने म्हणणे चुकीचे आहे.
>
> – राजाराम पाटील, ओबीसी नेते

### कोण होते दि. बा. पाटील?

दि.बा. पाटील यांचे पूर्ण नाव दिनकर बाळू पाटील होते. रायगड जिल्ह्यातील भूमीपुत्र, शेतकरी आणि प्रकल्पग्रस्तांच्या हक्कांसाठी आयुष्यभर लढणारे ते महाराष्ट्रातील प्रभावशाली नेते मानले जातात. शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते म्हणून त्यांनी काम केले. पनवेल नगरपालिकेचे नगराध्यक्ष, पनवेल-उरण मतदारसंघाचे पाच वेळा आमदार, विधान परिषदेचे सदस्य, विधानसभेचे विरोधी पक्षनेते आणि रायगडचे दोन वेळा खासदार म्हणून त्यांनी काम केले.

### निर्णय सरकारच्या गोटात

प्रकाशज्योत सामाजिक संस्थेचे अध्यक्ष विकास पाटील यांनी याचिका दाखल केली होती. याआधी २०२५ मध्ये मुंबई उच्च न्यायालयानेही ही याचिका फेटाळून लावली होती. सर्वोच्च न्यायालयाने याचिका फेटाळताना नामकरणाला विरोध केलेला नसून, हा निर्णय सरकारने घ्यायचा असल्याचे स्पष्ट केल्याने आता चेंडू पूर्णपणे राज्य आणि केंद्र सरकारच्या कोर्टात गेला आहे. त्यामुळे सरकारने दिलेला शब्द पाळणार का? असा सवाल आता उघडपणे विचारला जात आहे.

## वेधक

### महायुतीत 'गृहकलह'

**मुंबई :** केंद्रीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या १७ विधान परिषद जागांची निवडणूक जाहीर करताच महायुतीमध्ये अंतर्गत जागावाटपावरून मोठा पेच निर्माण झाला आहे. विशेषतः कोकण स्थानिक स्वराज्य संस्था (रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग) आणि पुणे स्थानिक स्वराज्य संस्था या दोन जागांवरून महायुतीतील मित्रपक्षांमध्ये उमेदवारीवरून उघड चढाओढ सुरू झाली आहे. बदललेल्या राजकीय समीकरणांमुळे जागांवर हक्क नेमका कोणाचा, यावरून वरिष्ठ पातळीवर मोठी रस्सीखेच होण्याची चिन्हे आहेत.

### नॉन क्रिमीलेअर मर्यादा वाढणार

**मुंबई :** नॉन क्रिमीलेअर मर्यादा ८ लाखांवरून १५ लाख करण्याची शिफारस करण्यात आली आहे. तसेच ओबीसीमध्ये ४३ नव्या जातींच्या समावेशासाठी केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाच्या उपसमितीने याबाबत शिफारस केली आहे. याबाबतचा अंतिम अधिकार केंद्राला असल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित प्रस्ताव केंद्राला पाठविण्यात येणार आहे.

### वऱ्हाडावर काळाची झडप!

**मुंबई :** मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील पालघरच्या धानीवरी येथे सोमवारी एक अत्यंत काळीज पिळवटून टाकणारी घटना घडली आहे. एका साखरपुड्याच्या कार्यक्रमासाठी आनंदाने निघालेल्या १०० हून अधिक वऱ्हाड्यांच्या आयशर ट्रकला भीषण अपघात झाला. हा अपघात इतका भयानक होता की, यामध्ये ट्रकचा पुरता चक्काचूर झाला असून, आतापर्यंत १३ जणांचा करुण अंत झाला आहे. तर, २५ हून अधिक जण गंभीर जखमी झाले आहेत. नवरीच्या घराच्या अगदी हाकेच्या अंतरावर हा अपघात घडल्याने हळहळ व्यक्त केली जात आहे.

# एमएमआरडीएविरोधात पेणमधील 88 गावांचा एल्गार!

- **प्रांत कार्यालयासमोर शेतकऱ्यांचे मंगळवारी लाक्षणिक उपोषण**
- **जमीन आणि भवितव्याच्या लढ्यात शेतकरी रस्त्यावर**
- **लोकप्रतिनिधी मात्र गायब झाल्याने संतापाची लाट**

**। पेण । प्रतिनिधी ।**

**पेण तालुक्यातील तब्बल ८८ गावांवर एमएमआरडीएचा विळखा दिवसेंदिवस अधिक घट्ट होत असताना आता शेतकऱ्यांच्या अस्तित्वाचाच प्रश्न ऐरणीवर आला आहे. याच पार्श्वभूमीवर ८८ गाव एमएमआरडीए विरोधी शेतकरी संघर्ष समितीच्यावतीने मंगळवार, दि. १९ मे रोजी प्रांत कार्यालयावर एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण करण्यात आले. या आंदोलनात संघर्ष समितीचे पदाधिकारी, शेतकरी, ग्रामस्थ आणि भूमीपुत्र मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. दरम्यान, परिसरात तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले होते.**



### लोकप्रतिनिधींची भूमिका संशयास्पद

एमएमआरडीएच्या मुद्द्यावर शेतकरी उन्हात बसून आपल्या हक्कासाठी लढा देत असताना स्थानिक लोकप्रतिनिधींनी घेतलेली संशयास्पद शांतता आता अनेक प्रश्न निर्माण करणारी ठरत आहे. एकीकडे शेतकरी आपल्या जमिनी आणि भवितव्यासाठी रस्त्यावर उतरले आहेत, तर दुसरीकडे लोकप्रतिनिधींची अनुपस्थिती हा जनतेच्या विश्वासाला तडा देणारा प्रकार असल्याची चर्चा आता संपूर्ण तालुक्यात रंगू लागली आहे.

### शेतकऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी

उपोषणस्थळी संघर्ष समितीचे सर्व पदाधिकारी आणि ग्रामस्थ एकजुटीने उभे असल्याचे चित्र पाहायला मिळाले. मात्र, ज्या स्थानिक लोकप्रतिनिधींना निवडून देण्यासाठी शेतकऱ्यांनी गावोगाव फिरून मेहनत घेतली, तेच लोकप्रतिनिधी या गंभीर प्रश्नावर पूर्णपणे गायब असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

उपोषणस्थळी शेतकऱ्यांच्या घोषणा, सरकारविरोधातील रोष आणि भविष्यातील भीती स्पष्टपणे जाणवत होती. 'आज जमिनी गेल्या तर उद्या आमचं अस्तित्वच संपेल,' अशी भावना अनेक शेतकऱ्यांनी व्यक्त केली. एमएमआरडीएच्या विस्ताराच्या नावाखाली ग्रामीण भागातील शेतकरी आणि स्थानिक भूमीपुत्रांना हळूहळू देशोधडीला लावण्याचा डाव सुरू असल्याचा गंभीर आरोप यावेळी करण्यात आला.

यावेळी मार्गदर्शन करताना अतुल म्हात्रे यांनी पान २ वर

# रायगड पोलीस दलात 'के.९ कमांडो'ची एन्ट्री!

## स्फोटक शोधक आणि स्निफर डॉग म्हणून 'बघिरा' सज्ज

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अधिक मजबूत करण्यासाठी आणि दहशतवादी कारवायांना आळा घालण्यासाठी रायगड पोलीस दलात अत्याधुनिक सुरक्षा व्यवस्थेचा भाग म्हणून नव्या 'के.९ कमांडो'ची भर पडली आहे. स्फोटक पदार्थ शोधक आणि स्निफर डॉग म्हणून प्रशिक्षित करण्यात येणारा 'बघिरा' नावाचा श्वान आता रायगड पोलीस दलात दाखल झाला असून, त्यामुळे पोलीस दलाची सुरक्षा यंत्रणा अधिक सक्षम होणार आहे.



रायगड पोलीस दलात सध्या दोन हजार ३०० हून अधिक मनुष्यबळ कार्यरत असून, जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी पोलीस प्रशासनावर आहे. पोलीस अधीक्षक आचल दलाल यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यात २८ पोलीस ठाणे, ८ उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालये, सुरक्षा शाखा, सायबर पोलीस ठाणे, आर्थिक गुन्हे शाखा, स्थानिक गुन्हे शाखा, वाचक शाखा आणि जिल्हा विशेष शाखा असे विविध विभाग कार्यरत आहेत.

जिल्ह्यातील विविध गुन्ह्यांची उकल, संशयितांचा शोध आणि स्फोटक पदार्थांचा तपास यासाठी श्वान पथकाचे योगदान अत्यंत मोलाचे राहिले आहे. यासाठी पोलीस मुख्यालयात पान २ वर

# भरधाव डंपरची दुचाकीला धडक

- **वृद्ध जागीच ठार**
- **अलिबाग-रेवस मार्गावर अपघात**

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग-रेवस मार्गावर भरधाव डंपरने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने एका वृद्ध दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या अपघातानंतर परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, अलिबाग-रेवस मार्गावरील वाढती डंपर वाहतूक आणि बेदरकार वाहनचालकांबाबत नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, एम.एच. ०६ एच.एस. १४९४ क्रमांकाचा हायवा डंपर रेवसकडून उसरच्या दिशेने जात होता. सोमवारी (दि.१८) सकाळी पावणे बारा वाजण्याच्या सुमारास भालनाका परिसरात पुढे जाणाऱ्या एम.एच. ०६ सी.टी. १३४४ क्रमांकाच्या स्कूटरला डंपरची जोरदार धडक बसली. या भीषण धडकेत दुचाकीस्वार गंभीर जखमी झाले.अपघातानंतर स्थानिकांनी जखमी वृद्धाला पान २ वर

# पोलिसाने संपविले जीवन

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**



रायगड पोलीस दलातील एका पोलीस कर्मचाऱ्याने जीवन संपविले. अलिबागमधील राहत्या घरात गळफास घेऊन त्याने आत्महत्या केली. आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट झाले नाही. याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पान २ वर

# पेण आरटीओचा भोंगळ कारभार

- **सकाळी साडेदहाला कार्यालयात शुकशुकाट**
- **अधिकारी-कर्मचारी गायब, विजेची उधळण मात्र सुरूच**

**। पेण । प्रतिनिधी ।**

शासनाच्या स्पष्ट नियमांनुसार सर्व शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी सकाळी ९.४५ वाजेपर्यंत कार्यालयात उपस्थित राहणे बंधनकारक असताना, पेण येथील उपप्रादेशिक कार्यालयात मंगळवारी सकाळी साडेदहा वाजेपर्यंतही शुकशुकाट पाहायला मिळाला. जिल्हास्तरीय महत्त्वाचे कार्यालय म्हणून ओळख असलेल्या या कार्यालयात केवळ विजय चौधरी हे एकमेव अधिकारी उपस्थित असल्याचे निदर्शनास आले.



विशेष बाब म्हणजे, कार्यालयात अधिकारी व कर्मचारी अनुपस्थित असतानाही अनेक विभागांमध्ये फॅन आणि लाईट सुरूच असल्याने विजेची उघडपणे उधळण होत असल्याचे वास्तव समोर आले. एकीकडे शासनाकडून वीज बचत, ऊर्जा संवर्धन आणि काटकसरीचे धडे दिले जात असताना, दुसरीकडे शासकीय कार्यालयातच नियमांची सर्रास पायमल्ली होत असल्याने नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. कार्यालयातील ढिसाळ शिस्त, वेळेचे पालन नसणे आणि जबाबदारीचा अभाव यामुळे सर्वसामान्यनागरिकांनामात्रकामासाठी ताटकळत बसावे लागत असल्याचे चित्र आहे. पान २ वर

# १ जुलैपासून एचएसआरपी बंधनकारक

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राज्यातील १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व वाहनांसाठी उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक (एचएसआरपी) बसविण्याची अंतिम मुदत ३० जून २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. या मुदतीनंतर म्हणजेच १ जुलै २०२६ पासून एचएसआरपी नसलेल्या वाहनांवर विशेष तपासणी मोहीम राबवून कारवाई करण्यात येणार आहे.

नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनधारकांकडून एक हजार रुपयांपर्यंत दंड आकारला जाईल, अशी माहिती परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. राज्यातील वाहन सुरक्षेला अधिक पान २ वर

**'नाट्यप्रभा'मधून रायगडच्या ग्रामीण कलावंतांसाठी हक्काचा रंगमंच | साहित्यिक ॲड. विलास नाईक यांचे गौरवोद्गार**

# अलिबागच्या रंभभूमीला नवी झळाळी!

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

मराठी रंगभूमीचा दीडशेहून अधिक वर्षांचा गौरवशाली इतिहास आजही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाची साक्ष देत उभा आहे. विष्णूदास भावे यांच्या 'सीतास्वयंवर'पासून सुरू झालेला हा रंगमंचाचा प्रवास अण्णासाहेब किर्लोस्करांच्या संगीत परंपरेतून, आचार्य अत्रे यांच्या गद्य नाटकांतून, विजय तेंडुलकर आणि कुसुमाग्रज यांच्या आधुनिक रंगभूमीतून आजच्या समकालीन नाट्यविश्वापर्यंत येऊन पोहोचला आहे.

या समृद्ध परंपरेत रायगड जिल्ह्याने आपले वेगळे आणि मानाचे स्थान निर्माण केले आहे. याच समृद्ध नाट्यपरंपरेला नवी ऊर्जा देणारा आणि ग्रामीण भागातील कलावंतांना व्यासपीठ उपलब्ध करून देणारा नाट्यप्रभा ग्रामीण नाट्यमहोत्सव सध्या अलिबागमध्ये रंगत आहे. पीएनपी कलाविकास मंडळ



### पीएनपी नाट्यगृहाचे योगदान महत्त्वाचे

अलिबागच्या सांस्कृतिक विश्वाला बळ देण्यात पीएनपी नाट्यगृहाचे योगदान अत्यंत महत्त्वाचे राहिले आहे. ग्रामीण भागातील कलाकारांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी शेकाप सरचिटणीस जयंत पाटील आणि सांस्कृतिक क्षेत्राला कायम प्रोत्साहन देणाऱ्या चित्रलेखा पाटील यांनी सातत्याने काम केले आहे, असेही ॲड. नाईक म्हणाले.

आयोजित चित्रलेखा नृपाल पाटील पुरस्कृत या नाट्यमहोत्सवाने ग्रामीण नाट्यचळवळीला नवसंजीवनी मिळाली आहे, असे मत साहित्यिक ॲड. विलास नाईक यांनी व्यक्त केले. रायगड जिल्ह्याच्या नाट्य संस्कृतीला शंभर वर्षांहून अधिक काळाची समृद्ध परंपरा लाभली आहे. विशेषतः चैत्र महिन्यात गावागावांत सादर होणारी नाटके ही रायगडच्या सांस्कृतिक जीवनाची ओळख मानली जाते. रत्नागिरी आणि सिंधुदुर्गच्या नाट्यसंस्कृतीचा प्रभाव, तसेच मुंबईतील चाकरमान्यांची कलात्मक परंपरा यामुळे रायगडमधील पान २ वर



## पान १ वरून

## पेणमधील ८८ गावांचा एल्गार!

एमएमआरडीएच्या धोरणांवर जोरदार हल्लाबोल केला. आजचा लढा हा केवळ जमिनीचा नाही, तर अस्तित्वाचा आहे. जर शेतकरी आज संघटित झाला नाही, तर उद्या आपली जमीन, आपली ओळख आणि पुढच्या पिढ्यांचे भविष्य कायमचे हिरावले जाईल. एमएमआरडीएच्या नावाखाली शेतकऱ्यांना उद्ध्वस्त करण्याचा प्रकार सुरू आहे, असा घणाघात त्यांनी केला.

भविष्यात या प्रश्नाची मोठी किंमत शेतकऱ्यांना मोजावी लागू शकते, असा इशाराही त्यांनी दिला. त्यांच्या भाषणानंतर उपस्थित शेतकऱ्यांमध्ये अधिक संताप आणि लढ्याची भावना निर्माण झाल्याचे दिसून आले.

निवडणुकीच्या वेळी मतांसाठी घराघरात फिरणारे नेते आज शेतकऱ्यांच्या लढ्यात कुठे लपले आहेत? असा संतप्त सवाल उपोषणस्थळी उपस्थित शेतकऱ्यांनी केला. काही पदाधिकाऱ्यांनी तर शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर फक्त राजकारण करणारे लोकप्रतिनिधी आता पूर्णपणे उघडे पडले आहेत, अशा शब्दांत संताप व्यक्त केला.

पेण तालुक्यातील ८८ गावांचा हा एल्गार भविष्यात आणखी तीव्र होण्याची चिन्हे दिसत असून, सरकार आणि प्रशासनाने वेळेत दखल घेतली नाही तर हा संघर्ष अधिक उग्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## रायगड पोलीस दलात ‘के.९ कमांडो’ची एन्ट्री!

स्वतंत्र श्वान पथक कार्यरत असून, अनेक महत्त्वाच्या कारवायांमध्ये या पथकाने महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

रायगड पोलीस दलातील बॉम्ब शोधक व नाशक पथकात कार्यरत असलेला ‘मॅक्स’ नावाचा श्वान नुकताच वयोमानानुसार मृत्यूमुखी पडला होता. त्यानंतर त्याच्या रिक्त जागी मेलिनॉईस जातीचा अत्यंत चपळ, हुशार आणि सतर्क स्वभावाचा लहान श्वान पोलीस दलात दाखल करण्यात आला आहे. या नव्या श्वानाचे नामकरण पोलीस अधीक्षक आचल दलाल यांच्या हस्ते करण्यात आले असून, त्याला ‘बघिरा’ असे नाव देण्यात आले आहे.

‘बघिरा’ हा स्फोटक पदार्थ शोधक आणि स्निफर डॉग म्हणून कार्यरत राहणार असून, सुरुवातीला त्याला रायगड पोलीस मुख्यालय येथे वयाच्या पाच महिन्यांपर्यंत प्राथमिक प्रशिक्षण दिले जाणार आहे. त्यानंतर पुढील सात महिन्यांसाठी राज्यातील विशेष प्रशिक्षण केंद्रात त्याला खडतर आणि अत्याधुनिक प्रशिक्षण दिले जाईल.

प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर पुढील दहा वर्षे ‘बघिरा’ रायगड पोलीस दलातील बॉम्बशोधक व नाशक पथकात कर्तव्य बजावणार आहे. जिल्ह्यातील नागरी सुरक्षेसोबतच सागरी किनारपट्टीची सुरक्षा अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने अत्याधुनिक साधने, विशेष पथके आणि प्रशिक्षित श्वान दल उभारण्यावर भर दिला जात असल्याचे पोलीस प्रशासनाकडून सांगण्यात आले. रायगड पोलीस दलात नव्या ‘के.९ कमांडो’च्या आगमनामुळे जिल्ह्याच्या सुरक्षाव्यवस्थेला नवी ताकद मिळाल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

## भूमीपुत्रांच्या भावनांशी खेळ!

थेट निशाणा साधला आहे.

ज्या शेतकऱ्यांनी स्वतःच्या जमिनी दिल्या, ज्यांच्या त्यागातून आजची नवी मुंबई उभी राहिली, त्या भूमीपुत्रांच्या भावनांशी सरकार खेळ करत असल्याचा आरोप होत आहे. या प्रकल्पासाठी हजारो कुटुंबांनी जमीन गमावली, संघर्ष केला, आंदोलनं केली; पण आज त्याच लोकांच्या नेत्याचा सन्मान करण्यासाठी सरकारकडे वेळ नाही, अशी तीव्र भावना स्थानिकांमध्ये आहे.

राज्य आणि केंद्र सरकारने अनेकदा आश्वासनं दिली, प्रस्ताव मंजूर झाल्याच्या बातम्या झळकल्या; पण प्रत्यक्षात अजूनही दि.बा. पाटील यांचं नाव विमानतळाला देण्यात आलेलं नाही. त्यामुळे ‘‘भूमीपुत्रांचा वापर फक्त निवडणुकांसाठी?’’ असा संतप्त सवाल आता उघडपणे विचारला जात आहे.

स्थानिक संघटनांनी सरकारला इशारा दिला आहे की, जर तातडीने ‘‘लोकनेते दि.बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ’’ या नावाची अधिकृत घोषणा झाली नाही, तर महाराष्ट्रभर उग्र आंदोलन छेडलं जाईल. रायगड, पनवेल, उरण आणि नवी मुंबई परिसरात संतापाची लाट उसळली असून, सरकारविरोधात तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

भूमीपुत्रांच्या हक्कासाठी आयुष्यभर लढलेल्या लोकनेत्याचा अपमान महाराष्ट्र कधीही सहन करणार नाही, अशी आक्रमक भूमिका आता स्थानिक नागरिकांनी घेतली आहे.

## पोलिसाने संपविले जीवन

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, अरविंद सोनावणे असे या पोलीस कर्मचाऱ्याचे नाव आहे. रायगड पोलीस दलात गेली ३० वर्षांहून अधिक काळ त्यांनी सेवा केली आहे. आपल्या कर्तृत्वाने त्यांनी वेगवेगळ्या गुन्ह्यांची उकलदेखील केली आहे. जिल्ह्यातील वेगवेगळ्या पोलीस ठाण्यांत ते कार्यरत होते. अलिबागमधील पोलीस मुख्यालयात सध्या ते कार्यरत होते. शनिवार ते रविवारी मध्यरात्रीच्या सुमारास अलिबागमधील राहत्या घरातील हॉलमधील छताच्या लोखंडी हूकला बेडशिटच्या कपड्याच्या सहाय्याने गळफास घेऊन त्यांनी आत्महत्या केली असल्याची फिर्याद नोंदविण्यात आली आहे. अरविंद सोनावणे यांच्या आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट झाले नाही. मात्र, मागील काही महिने ते रजेवर होते. त्यानंतर ते पुन्हा कामावर हजर झाले. पुन्हा रजेवर गेले. पुन्हा कामावर हजर झाले असल्याची चर्चा पोलीस दलात सुरू आहे. याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार जे.एच. पाटील अधिक तपास करीत आहेत.

## भरधाव डंपरची दुचाकीला धडक

तातडीने जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र, तपासणीनंतर डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या घटनेनंतर डंपर चालक घटनास्थळावरून पसार झाला असून, त्याच्याविरोधात अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मृत व्यक्तीचे नाव संदीप पाटील (६१, रा. तुडाळ, ता. अलिबाग) असे असून, ते मासळी आणण्यासाठी दुचाकीवरून अलिबागकडे जात होते. यावेळी पाठीमागून आलेल्या भरधाव डंपरने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला.

या घटनेनंतर अलिबाग-रेवस मार्गावरील वाढत्या डंपर वाहतुकीबाबत नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. माती, खडी आणि भराव वाहतुकीसाठी या मार्गावर मोठ्या प्रमाणात डंपरची वर्दळ वाढली असून, चालकांकडून वाहतूक नियमांचे सर्रास उल्लंघन होत असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे.

घोटवडे परिसरातील अजित ठाकूर यांच्या मालकीचा हा डंपर असल्याची चर्चा स्थानिकांमध्ये सुरू आहे. मात्र, अधिकृतरित्या पोलिसांकडून याबाबत दुजोरा देण्यात आलेला नाही.

या भीषण अपघातामुळे अलिबाग-रेवस मार्गावरील अन्य वाहनांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, बेदरकार डंपर चालकांवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून जोर धरू लागली आहे.

## १ जुलैपासून एचएसआरपी बंधनकारक

बळकटी देण्यासाठी आणि वाहनांची ओळख अधिक सुरक्षित व पारदर्शक करण्याच्या उद्देशाने शासनाने हा निर्णय घेतला आहे.

यापूर्वी वाहनधारकांना एचएसआरपी बसविण्यासाठी ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत मुदत देण्यात आली होती. मात्र, राज्यातील कामाचा वेग आणि वाहनधारकांची गैरसोय लक्षात घेऊन शासनाने ही मुदत आणखी सहा महिन्यांनी वाढविण्याचा निर्णय घेतला आहे.

वाहनचोरी, बनावट नंबर प्लेट्सचा वापर आणि गुन्हेगारी कृत्यांमध्ये वाहनांचा गैरवापर रोखण्यासाठी एचएसआरपी प्रणाली महत्त्वाची ठरणार असल्याचे सरनाईक यांनी सांगितले. केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जुन्या वाहनांनाही ही नंबर प्लेट बसविणे बंधनकारक करण्यात आले आहे.

## पेण आरटीओचा भोंगळ कारभार

जिल्ह्याच्या महत्त्वाच्या कार्यालयातच अशी अनागोंदी असेल, तर सामान्य जनतेने न्याय आणि सेवा नेमकी कुणाकडे मागायची, असा संतप्त सवाल आता उपस्थित होत आहे. या प्रकाराबाबत उपप्रादेशिक अधिकारी माधव सूर्यवंशी यांच्याशी दूरध्वनीवर संपर्क साधला असता त्यांनी आपण कामानिमित्त पनवेल येथे असल्याचे सांगितले. तसेच, कोणत्याही परिस्थितीत सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सकाळी ९.४५ वाजेपर्यंत कार्यालयात उपस्थित राहणे आवश्यक आहे. जे कर्मचारी व अधिकारी अनुपस्थित आढळले आहेत, त्यांच्याविरोधात चौकशी करून योग्य ती कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला.

यावेळी मंगेश नाईक यांना बाहेर शासकीय कामानिमित्त पाठविण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. मात्र, उर्वरित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची अनुपस्थिती, कार्यालयातील बेशिस्त कारभार आणि विजेची उघड उधळण यामुळे पेण उपप्रादेशिक कार्यालयाचा ढिसाळ आणि निष्काळजी कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे.

## अलिबागच्या रंभभूमीला नवी झळाळी!

ग्रामीण नाट्यविश्व अधिक समृद्ध झाले. या मातीतून अनेक कलाकार घडले आणि त्यांनी पुढे मुंबई-पुण्यासारख्या शहरांमध्ये अभिनयाच्या जोरावर स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले.

विजू खोटे, शुभा खोटे, जयंत सावरकर, नाना पाटेकर आणि सदाशिव अमरापूरकर यांसारख्या दिग्गज कलाकारांचे रायगडशी घट्ट नाते राहिले आहे. त्याचबरोबर शाहीर साबळे यांनी मराठी संस्कृती आणि लोककलेला दिलेले योगदान आजही प्रेरणादायी मानले जाते.

या नाट्यमहोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी स्थानिक नाट्यकर्मी, निर्माते आणि कार्यकर्त्यांनी मोठी धावपळ केली असून, विक्रांत वार्डे, किशोर म्हात्रे, प्रकल्प वाणी, कार्याध्यक्ष प्रतीक पानकर यांच्यासह राजन पांचाळ, सागर नार्वेकर, केळुस्कर सर, संकल्प केळकर, दिनेश पाटील, जितेंद्र पाटील, अमोल मिठाग्री, नितेश पाटील, ऋषी पडवळ, अनिष मिठाग्री, दीपक काळेल, यश बनसोडे, अंश म्हात्रे, उपासना घोसाळकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे मोठे योगदान आहे.

ग्रामीण भागातील सुप्त कलागुणांना व्यासपीठ मिळवून देणारा हा नाट्यमहोत्सव केवळ सांस्कृतिक कार्यक्रम नसून, ग्रामीण कलावंतांसाठी एक मोठी संधी ठरत आहे. शहरांपर्यंत पोहोचू न शकणाऱ्या, पण अफाट प्रतिभा असलेल्या कलाकारांना यानिमित्ताने स्वतःची कला सादर करण्यासाठी हक्काचा रंगमंच उपलब्ध झाला आहे, असे ॲड. नाईक म्हणाले.

मराठी नाटकाचा समृद्ध इतिहास आणि रायगडची लोकपरंपरा यांचा सुंदर संगम या नाट्यमहोत्सवाच्या माध्यमातून अनुभवायला मिळत असून, हा उपक्रम रायगडच्या नाट्यचळवळीला निश्चितच नव्या उंचीवर घेऊन जाणारा ठरेल, असा विश्वास ॲड. नाईक यांनी व्यक्त केला.

### जाहिर नोटीस

या जाहीर नोटीशीने सर्वाना कळविणेत येते की, खालील नमुद मिळकतीचे मालकाने खालील नमुद मिळकती आमचे अशिलांना विकत देणेचे ठरविले आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचाही हक्कहितसंबंध, बोजा, वहिवाट, पोटगी, गहाण, दान, हक्कसोड पत्र, बक्षिस, फरोक्त, वगैरे हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन चौदा दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकती दाखल कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकती निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतींचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही हे कळावे.

**मौजे मुगपे, ता. कर्जत, जि. रायगड येथिल मिळकती**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. हि.नं | क्षेत्र हे.आर.चौ.मी | आकारणी |
|---|---|---|---|
| श्री, संतोष व्यंकटेश शिंदे<br>श्रीम. मनीषा राजेश काकडे | १६/१/अ | २-४१-०० | ०-९५ |

ता. १९/०५/२०२६

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**सचिन दिलीप बासरे**
डेजी सोसायटी तिसरा मजला
कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड
पिन : ४१०२०१
मो. बा ७६६६९३७७६०

### जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या बिनशेती मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे धामोते, ता. कर्जत, जि. रायगड.**

| मालकाचे नाव | स. नं./हि. नं. | एकुण क्षेत्र चौ.मी. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|---|
| सौ. आरती विशाल तेली | ११८/३ | १६८-०० | १६-०० |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दूसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज लिज, अटेचमेंट, लिन, मृत्युपत्र, पोटगी, अदलाबदल वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पूराव्यासह लेखी हरकत कळवावी. मूदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. २०/०५/२०२६

**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे.**
पत्ता-बी-३०१, सायली निर्माण, निर्माण
नगरी, नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३

### जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे निकोप, ता. कर्जत, जि. रायगड.**

| मालकाचे नाव | स. नं./हि. नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|---|
| श्री.मोतीराम सिताराम तायडे | २४/१४ | ००-३९-००<br>हे.आर.पॉ. | ०-४१ |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दूसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज लिज, अटेचमेंट, लिन, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पूराव्यासह लेखी हरकत कळवावी. मूदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. २०/०५/२०२६

**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे.**
पत्ता-बी-३०१, सायली निर्माण, निर्माण
नगरी, नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३

### शुद्धीपत्रक

दि.१९/५/२०२६ रोजी पान क्र.५ वर mr.Vishal singh यांची सार्वजनिक सूचना प्रसिद्ध झाली त्यामध्ये सुचनेचा दिनांक नजरचुकीने राहिला आहे. तरी तो दि. १९/०५/२०२६ असा वाचण्यात यावा ही विनंती.

सही/-
**mr.Vishal singh**
**For m/s V R Legal & Co.**
कार्यालय क्र.२२५, थापर कॉम्प्लेक्स,
प्लॉट क्र.५१, सेक्टर-१५, सीबीडी
बेलापूर, नवी मुंबई
संपर्क : +९१-९९२०३९०९५९

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, माझे अशिल श्री. तन्मय सिद्धार्थ दुबे व श्रीमती आशा सिद्धार्थ दुबे दोघेही रा. हावरे निर्मिती सोसायटी, सेक्टर-२२, कामाठे, पनवेल-रायगड यांनी खालील वर्णनांची जमिन ही सदर जमिनीचे विद्यमान मालक श्री. दशरथ द्वारकानाथ भोपतराव रा. गोळीबार मैदान, फणसडोंगरी, पेण, पेण-रायगड यांचेकडुन रजिस्टर खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले असुन त्याबाबत उभयतांमध्ये सविस्तर बोलणी झाली आहेत.

**मिळकतीचे वर्णन :-** जिल्हा रायगड, तालुका पेण, मौजे-विराणी येथील गट नं. १८/अ/६ क्षेत्र ०-४४-०० हे.आर.चौ.मी. त्यासी आकार रु. ०-२२ पैसे पैकी श्री. दशरथ द्वारकानाथ भोपतराव यांचे अविभक्त हिश्श्याची सुमारे ०-१०-० हे.आर. चौ.मी. त्यासी आकार रु. ०-१३ ही जमीन या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

सदरची जमिन ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याची ग्वाही सदर जमिनीचे विद्यमान मालकांनी माझे अशिलांना दिली आहे. तरी वरील जमिन मिळकती संदर्भात जर कोणाचा साठेकरार, गहाण, दान, जप्ती, लिन, लीज, चार्ज, जामिनकी, कब्जा, वारसाहक्क अगर कायदेशिर हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले दिवशी पासून १४ (चौदा) दिवसांचे आंत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचे पत्त्यावर रजिस्टर्ड पोस्टाने कळवाव्यात.

जर वरील मुदतीत कोणाचीही लेखी हर हरकत न आल्यास सदरची अविभक्त हिश्श्याची जमिन ही निर्वेध व बोजाविरहित आहे व त्यावर इतर दुसरे कोणाचाही, कसल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध नाही असे समजुन माझे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदती नंतर येणारी कोणतीही हरकत ही माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

पेण-रायगड.
दि. २०/०५/२०२६.

सही
**ॲड. संजय भास्कर पाटील**
परमार प्लाझा, शॉप नं. १६. तळ मजला,
शिवाजी पथ, पेण-रायगड. ४०२१०७.
मोबा. ९८८१९१५२१९

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, माझे अशिल श्री. जैवेद्र सिंह रा. व्हॅली शिल्प सोसायटी, प्लॉट नं. ०३, सेक्टर- ३६, खारघर, नवी मुंबई यांनी खालील वर्णनांची जमिन ही सदर जमिनीचे विद्यमान मालक आरीया रामानुजार, कलईसेलवी श्रीनिवासा व काविया रामानुजार सर्व रा. फ्लॅट नं. ३०३, वोरा भुवन, माटुंगा, मुंबई यांचेकडुन रजिस्टर खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले असुन त्याबाबत उभयतांमध्ये सविस्तर बोलणी झाली आहेत.

**मिळकतीचे वर्णन :-** जिल्हा रायगड, तालुका पेण, तलाठी सजा-तरणखोप, ग्रुप ग्रामपंचायत तरणखोप, मौजे-चिंचघर येथील गट नं. ४१/१ क्षेत्र ०-६३-०० हे.आर.चौ.मी. त्यासी आकार रु. ५-५२ पैसे ही जमिन या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

सदरची जमिन ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याची ग्वाही सदर जमिनीचे विद्यमान मालकांनी माझे अशिलांना दिली आहे. तरी वरील जमिन मिळकती संदर्भात जर कोणाचा साठेकरार, गहाण, दान, जप्ती, लिन, लीज, चार्ज, जामिनकी, कब्जा, वारसाहक्क अगर कायदेशिर हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले दिवशी पासून १४ (चौदा) दिवसांचे आंत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचे पत्यावर रजिस्टर्ड पोस्टाने कळवाव्यात.

जर वरील मुदतीत कोणाचीही लेखी हर हरकत न आल्यास सदरची अविभक्त हिश्श्याची जमिन ही निर्वेध व बोजाविरहित आहे व त्यावर इतर दुसरे कोणाचाही, कसल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध नाही असे समजुन माझे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदती नंतर येणारी कोणतीही हरकत ही माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

पेण-रायगड.
दि. २०/०५/२०२६.

सही
**ॲड. संजय भास्कर पाटील**
परमार प्लाझा, शॉप नं. १६. तळ मजला,
शिवाजी पथ, पेण- रायगड. ४०२१०७.
मोबा. ९८८१९१५२१९

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे देवघर, ता. अलिबाग जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. कार्तिक नारायण नायडु (व २) सर्व रा. ए/२०३ वरद विनायक सीएचएस एसटीडी, विजय होम कॉम्पलेक्स, नियर नारायण स्कुल, जनार्दन रकी मार्ग भायंदर वेस्ट -ठाणे ४०११०१ यांच्या नांवे असलेली सामाईक मालकी हक्काची व त्यांचे ताबे कब्जातील व वहिवाटीतील खालील वर्णन केलेल्या भातशेती मिळकती माझे स्नेही यांनी कायमस्वरूपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| देवघर<br>ता. अलिबाग<br>जि. रायगड | २१६ | ०-३७-३०<br>पो. ख. ०-०५-२०<br>एकूण क्षेत्र ०-४२-५० | ६.२७ |
| देवघर<br>ता. अलिबाग<br>जि. रायगड | २१८/२ | ०-६९-०० | ६-५० |

सदर मिळकती निर्वेध असल्याचा निवाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी याउपरही सदरहु मिळकतींमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासुन सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. जर विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहु मिळकती निर्वेध व बोजाविरहित आहे, असे गृहित धरून माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

तारीख : २०/०५/२०२६

सही/-
**श्री. किशोर वामन तेलंगे**
पत्ता : श्री साई कन्सल्टंन्सी, दुय्यम निबंधक अलिबाग
कार्यालया समोर गाळा क्र. ३, ता.अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९८२२३४८१७३, ८८०५३२८६४६

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकतीचे विद्यमान मालक सुदर्शन रामचंद्र म्हात्रे यांचे कडुन कायम विकत घेण्याचे ठरविले आहे व तशी बोलणी केलेली आहेत. विकत घेणाऱ्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे आर. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| दळवी खरोशी<br>ता. अलिबाग | ८६ | ०-६०-६०<br>पो.ख. ०-१०-८०<br>एकुण ०-७१-४० | १०.८७ |

वरील तपशिलात नमुद केलेल्या मिळकती पैकी विद्यमान मालक यांच्या हिश्श्याचे क्षेत्र ०-३०-०० हे आर इतके क्षेत्र या जाहिर नोटीसीचा विषय आहे.

वर वर्णन केलेली मिळकत ही सामाईक मालकीची असुन सदर मिळकतीत वर नमुद केलेल्या मालकांचा असणारा हिस्सा आमचे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविलेले आहे. सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याचा दावा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलाना केलेला आहे.

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही ताबा, कुळवहिवाट, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षिस, दान, जप्ती, लिज, वहिवाट अथवा अन्य प्रकारचा कसलाही हक्क व हितसंबंध असल्यास हि नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती कागदोपत्री पुराव्यासह सादर कराव्यात. अन्यथा मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे गृहित धरुन सदरचा व्यवहार आमचे अशिल पुर्ण करतील व मागाहून आलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी. कळावे.

अलिबाग.
दिनांक : १९/०५/२०२६

ॲडव्होकेट
**ॲड. प्राजक्ता धिरज म्हात्रे**
जिल्हा न्यायालय अलिबाग
अलिबाग- रायगड

### जाहीर नोटीस

सर्व संबंधितांस ह्या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी मौजे-मांडवेतर्फे बामणगांव व मौजे-बागमळा, ता.अलिबाग, जि.रायगड, येथील खालील नमूद वर्णनाच्या मिळकती, सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. निमेश किर्ती छाटबार, यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून त्या आशयाची बोलणी संदर्भित मिळकतींचे विद्यमान मालक व माझे अशिलांदरम्यान झालेली आहेत. खालील नमूद मिळकतींचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र देणेकामी सदर जाहिर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत.

संदर्भित जमीन मिळकती ह्या पूर्णपणे बिनजोखमी व बोजाविरहित असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतींचे विद्यमान मालकानी माझ्या अशिलांना दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतींमध्ये अन्य कुणाचेही कसल्याही तऱ्हेचा हक्क, मालकी हक्क, दावा, हितसंबंध, बोजा, धारणाधिकार, सुखसोयीचा हक्क किंवा आक्षेप (जसे की गहाण, भाडेपट्टा, वारसा हक्क आणि विक्री) व अधिकार असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १५ दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानीशी देवून माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतेही लेखी हरकत न आल्यास सदर मिळकतींचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र दिले जाईल, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रं. | क्षेत्र (आर.चौ.मी) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| मांडवे तर्फे बामणगांव, ता. अलिबाग, जि. रायगड | ५१/१ | ३३-३०-०० | ३३३.०० |
| बागमळा, ता.अलिबाग, जि.रायगड | १२१/५ | जि. ०-१४-४०<br>पो.ख. ०-०३-८०<br>०-१८-२० | ०.३६ |

अलिबाग,
दि. १९/०५/२०२६

**ॲड. महेश सुहास म्हात्रे**
बी.ए.एलएल.बी.(एमएएच /५७७३/२००६)
पब्लिक नोटरी
कार्यालय: रुतुराज प्लाझा, फ्लॅट नं.१, तळमजला,
शिवाजी चौक, गांवडे ऑप्टीक्सजवळ, अलिबाग,
रायगड ४०२ २०१.
संपर्क क्रमांक: ०९८५००४२२३४/७७४१०३२२३४
ई-मेल आयडी: maheshmhatreoffice7@gmail.com

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसने असे कळविण्यात येते कि, आमचे अशिलाने खालील वर्णन केलेली मौजे गणेगाव चिंचवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत, मिळकत मालक यांच्याकडून कायमस्वरूपी खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मालकाचे नाव | गट क्र. | क्षेत्र हे.आर.प्र | आकार |
|---|---|---|---|
| गुलशन कुमार लिखा आणि इतर | २०/७ | ०-७८-०० | ०-५९ |
| | २०/२० | ०-२३-०० | ०-२३ |
| | २०/१६/अ | ०-५५-०० | ०-४२ |
| | २०/१६/ब | ०-०९-०० | ०-०६ |
| | २०/१७ | ०-३५-०० | ०-२८ |
| | २०/१४ | ०-७९-०० | ०-६२ |
| | २०/१२ | ०-२६-०० | ०-२० |
| | २/७/क | ००-११-४० | ०-२७ |
| | २/१२ | ०-१७-४० | ०-०९ |
| | २०/८ | ०-३४-१० | ०-३० |
| | २१ | ०-४२-५० | १-३६ |
| | ८/४ | ०-०५-०० | ०-०३ |
| | ८/५/अ/२ | ०-३७-९० | ५-१९ |
| | ९/१ | ०-१७-७० | ०-१९ |

सबब सदर बाबत कोणाचेही दान, गहाण, साठेकरार, खरेदीखत, ताबा, कब्जा, वहीवाट, बक्षीसपत्र, लिज अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत दाखल करावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणारी हरकत आमचे आशिलावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण - कर्जत
दिनांक - २०/५/२०२६

सही/-
**ॲड. पुनित आर. बनोटे**
(वकील उच्च न्यायालय)
पत्ता-मु.काराव, पो.वांगणी, ता.अंबरनाथ-जि. ठाणे

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकतीचे विद्यमान मालक सुनिता दिनानाथ पाटील, शैलेश दिनानाथ पाटील, दर्शना महेंद्र पाटील यांचे कडुन कायम विकत घेण्याचे ठरविले आहे व तशी बोलणी केलेली आहेत. विकत घेणाऱ्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

**मिळकीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे आर. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| दळवी खरोशी<br>ता. अलिबाग | १०२ | ०-३२-६०<br>पो.ख. ०-०२-००<br>एकुण ०-३४-६० | ३.०९ |

वरील तपशिलात नमुद केलेल्या मिळकती पैकी विद्यमान मालक यांच्या हिश्श्याचे क्षेत्र ०-१८-६० हे आर इतके क्षेत्र या जाहिर नोटीसीचा विषय आहे.

वर वर्णन केलेली मिळकत ही सामाईक मालकीची असुन सदर मिळकतीत वर नमुद केलेल्या मालकांचा असणारा हिस्सा आमचे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविलेले आहे. सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याचा दावा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलाना केलेला आहे.

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही ताबा, कुळवहिवाट, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षिस, दान, जप्ती, लिज, वहिवाट अथवा अन्य प्रकारचा कसलाही हक्क व हितसंबंध असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती कागदोपत्री पुराव्यासह सादर कराव्यात. अन्यथा मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे गृहित धरुन सदरचा व्यवहार आमचे अशिल पुर्ण करतील व मागाहून आलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी. कळावे.

अलिबाग.
दिनांक १९/०५/२०२६

ॲडव्होकेट
**ॲड. प्राजक्ता धिरज म्हात्रे**
जिल्हा न्यायालय अलिबाग
अलिबाग- रायगड

### ‘‘ जाहिर नोटीस’’

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की १) श्री. शंकर कृष्णाजी राऊत, २) श्री. द्वारकानाथ कृष्णाजी राऊत, ३) श्री. जयराम कृष्णाजी राऊत यांच्या मालकीचे मौजे अलिबाग, ता. अलिबाग येथील सि.स.नं. ४२६ व ४२६के आहे. सदर मिळकत ही दिनांक २५/०१/१९५२ रोजी १) साराबाई दावीद तळकर, २) सालोमन दाविद तळकर, ३) एलिसन सामसन, ४) जोसेफ सामसन, ५) इझोफेल सामसन तळकर यांच्याकडून १) श्री. शंकर कृष्णाजी राऊत, २) श्री. द्वारकानाथ कृष्णाजी राऊत, ३) श्री. जयराम कृष्णाजी राऊत यांनी खरेदीखताने विकत घेतली आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालील परिशिष्टात नमुद केलेले आहे. सदर मुळ खरेदीखत हे आमच्या अशिलांकडून अलिबाग शहरात प्रवासा दरम्यान दिनांक १४/०५/२०२६ रोजी हरविले आहे. सदर हरविलेल्या नोंदणीकृत दस्ताची अलिबाग पोलीस स्टेशन येथे दिनांक १८/०५/२०२६ रोजी तक्रार केली आहे.

मात्र तरी देखील वर नमुद केलेल्या मिळकतीवर खालील परिशिष्टात नमुद केलेल्या खरेदीखताच्या मुळ दस्ताच्या अधारे कोणाचाही विक्री गहाण दान बोजा बक्षिस लिज लीएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा सदरचा मुळ दस्त त्यांच्या ताब्यात असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन सात दिवसांच्या आत खाली दिलेल्या पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात कळवावी.

**परिशिष्ट**

दिनांक २५/०१/१९५२ रोजीचा दुय्यम निबंधक अलिबाग यांचेकडील दस्त क्रं. अलब/५८/१९५२ कडे नोंदविण्यात आलेला आहे. लिहून घेणार १) श्री. शंकर कृष्णाजी राऊत २) श्री. द्वारकानाथ कृष्णाजी राऊत ३) श्री. जयराम कृष्णाजी राऊत व लिहून देणार १) साराबाई दावीद तळकर, २) सालोमन दाविद तळकर, ३) एलिसन सामसन, ४) जोसेफ सामसन, ५) इझोफेल सामसन तळकर यांच्यामध्ये झालेला मौजे अलिबाग, ता. अलिबाग सि.स.नं. ४२६ व ४२६के या मिळकती संदर्भातील खरेदीखताचा मूळ दस्त. हा या नोटीसचा विषय आहे.

अलिबाग
दि. २०/०५/२०२६

सही/-
**ॲड. सौ. गौरी गिरीश म्हात्रे**
डी-२ हिराबाग मोदकम हॉटेलच्या वर जिल्हा
न्यायालयासमोर, अलिबाग
रायगड, मो. नं. ९२७१७७५२७७

## निवडक



### पं.स. कार्यालयात विजेची उधळपट्टी

**पेण** : देशाचे पंतप्रधान पर्यावरण संवर्धन, ऊर्जा बचत आणि सार्वजनिक संपत्तीचा जबाबदारीने वापर करण्याचे आवाहन करत असताना सरकारी कार्यालयांमध्ये मात्र या संदेशाला केराची टोपली दाखवली जात असल्याचे वास्तव समोर येत आहे. पेण पंचायत समितीच्या बैठकीच्या हॉलमध्ये कुणीही उपस्थित नसताना तब्बल आठ पंखे आणि चार लाईट बराच वेळ चालू असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले. विशेष म्हणजे कार्यालयीन कर्मचाऱ्यांची ये-जा सुरू असतानाही हे पंखे आणि लाईट बंद करण्याची साधी तसदी कुणी घेतली नाही. ही बाब पंचायत समितीचे गटविकास अधिकारी गजानन लेंडी यांच्या निदर्शनास आणून देण्यात आली. त्यानंतर त्यांनी कर्मचाऱ्यांना आदेश देत संबंधित हॉलमधील लाईट व पंखे बंद करण्यास सांगितले. मात्र, ही जबाबदारी एखाद्या नागरिकाने लक्षात आणून द्यायची का? कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी नेमके काय पाहत होते? असा प्रश्न उपस्थित होत आहे. तसेच, अनेक खोल्यांमध्ये फक्त एक-दोन कर्मचारी बसलेले असतानाही चार-चार पंखे सुरू असल्याचे वास्तव समोर आले. त्यामुळे वीज वाचवा हे फक्त भाषणापुरतेच राहिले आहे का, असा संतप्त सवाल आता नागरिक विचारू लागले आहेत.

### उरण शहरातील पोस्ट कार्यालय सुरू




**उरण** : उरण शहरातील पोस्ट कार्यालय पुन्हा सुरू करण्यात आले आहे. यापूर्वी हे कार्यालय तात्पुरत्या स्वरूपात जेएनपीटी शॉपिंग सेंटर येथे हलविण्यात आले होते. त्यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात गैरसोयींचा सामना करावा लागत होता.

आनंदनगर येथील जुन्या पोस्ट कार्यालयाची इमारत पुनर्विकासासाठी गेल्यानंतर पोस्ट कार्यालय शहराबाहेर हलविण्यात आले होते. मात्र, पोस्टाच्या विविध कामांसाठी नागरिकांना अतिरिक्त प्रवास करावा लागत असल्याने वेळ आणि पैशांचा अपव्यय होत होता. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला वर्ग तसेच पेन्शन, बचत खाते, मनीऑर्डर आणि इतर पोस्टल सेवांसाठी अवलंबून असलेल्या नागरिकांचे मोठे हाल होत होते. पोस्ट कार्यालय पुन्हा शहरात सुरू करण्याची मागणी नागरिकांकडून सातत्याने करण्यात येत होती. अखेर या मागणीची दखल घेत आजपासून उरण शहरात नव्या ठिकाणी पोस्ट कार्यालय सुरू करण्यात आले आहे. हे कार्यालय कामठा रस्त्यावर शामियाना हॉटेल समोरील युनियन बँकेच्या वरच्या मजल्यावर सुरू करण्यात आले आहे. पोस्ट कार्यालय पुन्हा शहरात सुरू झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.




### ‘वेस्ट टू एनर्जी’ प्रकल्पाविरोधात उपोषण

**नवी मुंबई** : तुर्भे स्टोअर परिसरात प्रस्तावित ‘वेस्ट टू एनर्जी’ आणि सीबीजी प्रकल्पाविरोधातील आंदोलन दिवसेंदिवस तीव्र होत असून, दुसऱ्या दिवशीही आमरण उपोषण सुरूच ठेवण्यात आले. स्थानिक नागरिक, झोपडपट्टीवासीय आणि विविध सामाजिक संघटनांनी या प्रकल्पाला जोरदार विरोध दर्शवला असून ‘‘मागण्या मान्य झाल्याशिवाय उपोषण मागे घेतले जाणार नाही,’’ अशी ठाम भूमिका नगरसेवक सुरेश कुलकर्णी यांनी घेतली आहे. प्रशासनाला थेट इशारा देत, ‘‘भले जीव गेला तरी चालेल, पण तुर्भेकरांच्या आरोग्याशी खेळणारा हा प्रकल्प आम्ही होऊ देणार नाही,’’ असे स्पष्टपणे सांगितले. प्रस्तावित ‘वेस्ट टू एनर्जी’ आणि सीबीजी प्रकल्पामुळे तुर्भे परिसरातील नागरिकांना गंभीर आरोग्य समस्यांना सामोरे जावे लागू शकते. आधीच तुर्भे डम्पिंग ग्राउंडमुळे अनेक नागरिक त्वचारोग, दमा, क्षयरोग यांसारख्या आजारांनी त्रस्त असल्याचा दावा केला आहे. अशा परिस्थितीत आणखी प्रदूषण निर्माण करणारा प्रकल्प दाट लोकवस्तीच्या भागात उभारणे अन्यायकारक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. ‘‘प्रकल्प इतरत्र हलवा, पण तुर्भे एमआयडीसी परिसरातील नागरी वस्तीजवळ नको,’’ अशी एकमुखी मागणी उपोषणस्थळी करण्यात येत आहे. प्रकल्पातून निर्माण होणारा धूर, दुर्गंधी आणि राख यामुळे भविष्यात हवा अधिक प्रदूषित होईल आणि स्थानिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होतील, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

# माणकिवलीत कचरा डेपोचा घाट?

- **गावाच्या वेशीवर उभारण्याचा प्रयत्न**
- **ग्रामस्थांनी दिला प्रखर विरोधाचा इशारा**

**| कर्जत | प्रतिनिधी |**

कडाव ग्रामपंचायतीकडून माणकिवली गावाच्या वेशीवर डंपिंग ग्राउंड उभारण्याचा प्रयत्न सुरू असल्याची चर्चा सध्या परिसरात जोर धरत आहे. या प्रकारामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामपंचायत सदस्य व स्थानिक नागरिकांना कोणतीही स्पष्ट माहिती न देता हा निर्णय घेतला जात असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे.


● (छायाचित्रः संजय गायकवाड)

डंपिंग ग्राउंडसाठी प्रस्तावित जागा ही माणकिवली गावाच्या मुख्य रस्त्यालगत असून, या परिसरात आदिवासी विकास विभागाचे शासकीय बहुउद्देशीय केंद्र, आदिवासी वस्ती, लहान मुलांची अंगणवाडी तसेच ग्रामदैवत सातीचे देव यांचे स्थान आहे. गावातील नागरिकांच्या ये-जा करण्यासाठी हा प्रमुख आणि एकमेव मार्ग असल्याने येथे दररोज शालेय विद्यार्थी, महिला, वयोवृद्ध नागरिकांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. याच परिसरासमोर स्मशानभूमी देखील असल्याने, भविष्यात येथे डंपिंग ग्राउंड उभारण्यात आल्यास दुर्गंधी, अस्वच्छता आणि रोगराईचा गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतो, अशी भीती स्थानिकांकडून व्यक्त केली जात आहे. विशेषतः पावसाळ्यात कचऱ्यामुळे दूषित पाणी तलाव आणि परिसरात पसरण्याची शक्यता असल्याने पर्यावरणीय धोका वाढू शकतो, असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

स्थानिकांच्या मते, घनकचरा व्यवस्थापनासाठी शासनाने स्पष्ट नियमावली निश्चित केली असून,

> सर्व्हे नंबर १३७/१७ या जागेवर कोणत्याही प्रकारचे अनधिकृत अतिक्रमण होऊ नये यासाठी लोखंडी पत्र्याचे कंपाऊंड उभारण्यात येणार आहे. या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे डंपिंग ग्राउंड होणार नाही.
> – प्रेमसिंग गिरासे, ग्रामसेवक, कडाव ग्रामपंचायत

डंपिंग ग्राउंड हे लोकवस्ती, शाळा, रुग्णालय, विहीर, नदी, तलाव आणि पाणवठ्यांपासून सुरक्षित अंतरावर असणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जिल्हा प्रशासनाची परवानगी, ग्रामसभेची मान्यता आणि पर्यावरणीय निकषांची पूर्तता बंधनकारक असते. परंतु, या सर्व नियमांकडे दुर्लक्ष करून मनमानी पद्धतीने निर्णय घेतला जात असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे. दरम्यान, कडाव ग्रामपंचायत हद्दीत अनेक ठिकाणी अतिक्रमणे झालेली असताना त्याकडे दुर्लक्ष केले जात असल्याची टीकाही नागरिकांनी केली आहे. ग्रामपंचायतीच्या मालकीच्या गावरान जमिनी गावाबाहेर उपलब्ध असताना लोकवस्तीच्या जवळच डंपिंग ग्राउंड उभारण्याचा प्रयत्न का केला जात आहे, असा सवालही ग्रामस्थ उपस्थित करत आहेत. माणकिवली ग्रामस्थ तसेच तलावाशेजारील आदिवासी वस्तीत राहणाऱ्या आदिवासी बांधवांनी व स्थानिक शेतकऱ्यांनी या प्रस्तावित डंपिंग ग्राउंडला तीव्र विरोध करण्याचा इशारा दिला असून, आवश्यक असल्यास आंदोलन छेडण्याची भूमिका घेतली आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत हा विषय अधिक तापण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.


● उकाड्याने हैराण झालेली कोळी बांधवांची लहान मुले मुरूड समुद्राच्या थंड पाण्यात पोहण्याचा मनसोक्त आनंद घेताना.. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

## अनधिकृत कनेक्शनविरोधात धडक मोहीम

**| पेण | प्रतिनिधी |**

पेणमधील ग्रामीण भागात तीव्र पाणीटंचाई असताना काही जणांकडून सर्रासपणे अनधिकृत पाणी कनेक्शन घेऊन लाखो लिटर पाण्याचा वापर केला जात असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. या गैरप्रकारांविरोधात ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या उपअभियंता एस.एस. देशमुख यांनी धाडसी पाऊल उचलत थेट कारवाईची मोहीम सुरू केली आहे. भोगावती नदीवरील पुलापासून या तपास मोहिमेची सुरुवात करण्यात आली. दुपारी २.०० वाजेपर्यंत तब्बल आठ अनधिकृत पाणी कनेक्शन शोधण्यात प्रशासनाला यश आले. त्यामध्ये शिवसागर



फूड मॉल, हॉटेल निरव पॅलेस, परिणीती जलशुद्धीकरण, रविराज फार्म हाऊस यांसारख्या व्यावसायिक आस्थापनांचा समावेश असून कैलास घरत, किशोर पाटील आणि शांताराम चवरकर यांच्या नावाचेही अनधिकृत कनेक्शन आढळून आले. एकीकडे खारेपाट परिसरात नागरिकांना आठ-आठ दिवसांनी पाणीपुरवठा करावा लागत असताना दुसरीकडे काही जणांकडून चोरीच्या कनेक्शनद्वारे पाण्याचा व्यावसायिक वापर सुरू असल्याने संताप व्यक्त होत आहे. दरम्यान, उपअभियंता एस.एस. देशमुख यांनी अनधिकृत कनेक्शनविरोधात मोहीम उघडल्याने सर्वसामान्य नागरिकांकडून त्यांच्या कार्याचे कौतुक होत आहे. या कारवाईदरम्यान पंचायत समिती सदस्य प्रदीप म्हात्रे, पंचायत समिती सदस्य सुशांत खाकर, कनिष्ठ अभियंता सौरभ खांडेकर, किशोर पाटील, गणेश पाटील यांच्यासह कर्मचारी वर्ग मोठ्या पोलीस बंदोबस्तात उपस्थित होता.

## श्रीमंत ग्रामपंचायतीचा गरीब रस्ता



**| पाताळगंगा | प्रतिनिधी |**

वडगांव गावाकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून, गेल्या अनेक वर्षांपासून ग्रामस्थांना खड्डेमय रस्त्यावरून जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. विशेष म्हणजे श्रीमंत आणि अनेक पुरस्कार प्राप्त असलेली ग्रुप ग्रामपंचायतीच्या हद्दीत हा रस्ता येत असतानाही या गंभीर समस्येकडे दुर्लक्ष होत असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

वडगांव गावाकडे जाणाऱ्या या मुख्य रस्त्यावर ठिकठिकाणी मोठंमोठे खड्डे पडले असून, काही भागात

> हा रस्ता जिल्हा परिषदेच्या अंतर्गत येत असुन, ग्रामपंचायतीने रस्ता तयार करण्याकरता परवानगी मागितलेली आहे. मात्र, आजपर्यंत परवानगी मिळालेली नाही. तसेच, हा रस्ता मुख्यमंत्री सडक योजनेमध्ये घेण्यात आल्याचे समजते.
> – सुहास वारे, ग्राम विकस अधिकारी, वडगाव

रस्ता पूर्णपणे उखडला आहे. त्यामुळे दुचाकीस्वारांना वाहन चालविताना मोठी कसरत करावी लागत आहे. शालेय विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच रुग्णवाहिकांनाही या खराब रस्त्याचा मोठा फटका बसत आहे. पावसाळ्यात रस्त्यावर पाणी साचत असल्याने खड्ड्यांचा अंदाज न आल्याने अपघाताचा धोका अधिक वाढत आहे.

## शासकीय जागेत उंटांचे अतिक्रमण



**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

श्रीवर्धन नगरपरिषदेच्या शहर विकास आराखडा क्र. ३४ गट क्रमांक १५१ या शासकीय जागेमध्ये उंटवाल्यांनी अतिक्रमण केले आहे. याबाबत नगरपरिषदेचे मुख्याधिकारी, नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष या सर्वांकडे तोंडी तक्रार करून सुद्धा अद्यापपर्यंत या उंटवाल्यांना शासकीय जागेतून हूसकावून लावण्यात आलेले नाही. विशेष बाब म्हणजे नगरपरिषदेने ‘‘या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण केल्यास त्यांच्यावर कारवाई केली जाईल व कारवाईच्या वेळी कोणाचेही नुकसान झाल्यास नगरपरिषद जबाबदार राहणार नाही’’, अशा आशयाचा फलक लावलेला आहे. त्याच ठिकाणी उंटवाले उंट बांधत आहेत.

## अल्पवयीन चोरट्याला रंगेहाथ पकडले

**| नेरळ | प्रतिनिधी |**

नेरळ खांडा येथील विद्या सोनावळे या रात्रीच्या सुमारास घरासमोर उभ्या होत्या. त्यादरम्यान एका तरूणाने अचानक सोनावळे यांच्या गळ्यात हात घालुन सोन्याचे छोटे मंगळसुत्र जोरात खेचले. मात्र, त्यांनी प्रसंगावधान राखल्याने ते त्यांच्याच हातात राहिले. त्यानंतर त्या तरूणाने तेथून पळ काढला. त्यावेळी उपस्थितांनी त्याचा पाठलाग करून त्याला पकडून पोलीस ठाण्यात नेले. या तरुणाचे मोहम्मद शाद अर्शाद अन्सारी असे असून, त्याच्यावर नेरळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## श्रीवर्धनमध्ये स्वच्छतेचा प्रश्न गंभीर

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

श्रीवर्धन शहरातील स्वच्छतेचा प्रश्न गंभीर बनलेला पुन्हा एकदा पाहायला मिळत आहे. या अगोदर श्रीवर्धन नगरपरिषदेने एका खासगी कंपनीला शहरातील कचरा उचलण्याचे, त्याचप्रमाणे गटारे साफ करणे आणि समुद्रकिनाऱ्यावरील धूप प्रतिबंधक बंधाऱ्यावर स्वच्छता करणे इत्यादी कामे नेमून दिली होती. परंतु, या कंपनीच्या निविदेची मुदत संपल्यामुळे कंपनीने काम बंद केले आहे. त्यामुळे श्रीवर्धन शहरातील स्वच्छतेचा प्रश्न गंभीर बनला आहे. सध्या घंटागाड्यांवरती नगरपरिषदेचे सफाई कर्मचारी कचरा नेण्याचे काम करत आहेत.



सध्या मे महिन्याच्या सुट्ट्या सुरू असल्यामुळे श्रीवर्धनला पर्यटक खूप मोठ्या प्रमाणावर येत आहेत. येणारे पर्यटक हे समुद्रकिनारा पाहायला आवर्जून येत असतात व त्या ठिकाणी समुद्र स्नानाचा आनंद देखील घेतात. परंतु, याच समुद्रकिनाऱ्यावरती बांधलेल्या धूप प्रतिबंधक बंधाऱ्याची गेल्या कित्येक दिवसापासून स्वच्छताच होत नसल्याने, या ठिकाणी सर्वत्र अस्वच्छता असल्याचेच दिसून येत आहे. धूप प्रतिबंधक बंधाऱ्यावर असलेल्या कचराकुंड्या देखील कचऱ्याने भरलेल्याच आहेत. तसेच, बंधाऱ्यावर आलेली वाळू देखील साफ केली नसल्यामुळे बंधाऱ्याला अस्वच्छतेचे स्वरूप प्राप्त झाले आहे. श्रीवर्धन नगरपरिषदेची सार्वत्रिक निवडणूक होऊन नवीन नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, त्याचप्रमाणे सभापती, नगरसेवक सक्रिय झाले आहेत. परंतु, शहराच्या स्वच्छतेकडे निवडून दिलेले लोकप्रतिनिधी सुद्धा दुर्लक्ष करत असल्याचे पाहायला मिळत आहे. तरी श्रीवर्धन नगरपरिषदेने धूप प्रतिबंधक बंधाऱ्याची तातडीने स्वच्छता करून घ्यावी व समुद्रकिनाऱ्याच्या इतर भागात देखील असलेला कचरा तातडीने उचलावा, अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

## संगम पुलावरून धोकादायक प्रवास

- **केव्हाही अपघात होण्याची शक्यता**
- **पावसाळ्यापूर्वी दुरूस्तीची मागणी**

**| तळा | प्रतिनिधी |**

तळा-तळेगाव मार्गावरील केळशी वानस्ते येथील संगम पुलावरील संरक्षक पाईप निघाले आहेत. या पुलावरून तळेगाव, पन्हेळी, मालुक, भानंगकोंड, उसर व पुढे माणगावकडे मोठ्या प्रमाणात वाहने जात असतात. परंतु, पुलाचे संरक्षक पाईप निघाल्याने केव्हाही अपघात होण्याचा धोका संभवतो. मुसळधार पाऊस पडला की या पुलावरून पाणी जाते. त्यामुळे या पुलावर कठडे असणे आवश्यक



असल्याचे जानकार म्हणत आहेत. तसेच, याच पुलाच्या कॉंक्रीटीकरण स्लॅबमधील आतील स्टील दिसत आहे. त्यामुळे हा देखील धोका लक्षात घेऊन त्याचीही दुरुस्ती करणे आवश्यक आहे. हि सर्व कामे पावसाळ्यापूर्वी होणे आवश्यक आहे. तरी या पुलाची लवकरात लवकर दुरुस्त व्हावी, अशी मागणी प्रवासी व नागरिकांतून होत आहे.

**अपघातांचे प्रमाण कमी करण्याचा प्रयत्न | सर्व विभागांचा राहणार सहभाग**

## शून्य मृत्यूसाठी पंचसूत्री धोरण

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

मुंबई-गोवा महामार्गासह जिल्ह्यातील वेगवेगळ्या रस्त्यांवरील अपघातामध्ये मृत्यूचे प्रमाण वाढत आहे. हे प्रमाण रोखण्यासाठी महसूल व पोलीस प्रशासनाने पाऊल उचलण्यास सुरुवात केली आहे. त्यासाठी शून्य मृत्यूसाठी पंचसूत्री धोरण राबविले जाणार आहे. यामध्ये अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी पोलिसांसह सर्व विभागाचा सहभाग राहणार आहे. त्यामुळे मृत्यू शून्यसाठी पंचसुत्री धोरण वरदान ठरण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

रायगड जिल्हा पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाचा ठरत असताना औद्योगिकीरणाच्या दृष्टीनेही नावारुपाला आहे. अलिबागसह नागाव, काशीद, किहीम, रेवदंडा, आक्षी, मुरूड, श्रीवर्धन, दिवेआगर अशा अनेक समुद्रकिनाऱ्यांना पर्यटक आवर्जून भेटी देत असतात. शनिवार-रविवारी व इतर सुट्टीच्या दिवशी पर्यटकांची प्रचंड वर्दळ निर्माण होते. अनेकवेळा वाहतूक कोंडी होते. जिल्ह्यात वर्षाला २५ हजाराहून अधिक दुचाकी खरेदी केल्या जातात. त्यामुळे दुचाकींची संख्याही प्रचंड वाढली आहे. त्यात रेंटवर बाईक देण्याचा क्रेझ देखील प्रचंड वाढला आहे. दुचाकी

> जिल्ह्यातील अपघात रोखण्यासाठी शून्य मृत्यूसाठी पोलीसांच्या मदतीला अन्य विभागदेखील कार्यरत असणार आहे. त्यासाठी पाच सुत्र हाती घेण्यात आली आहेत. अभियांत्रिकी, अंमलबजावणी, आपत्कालीन आघात काळजी, शिक्षण व नागरी सहभाग, डेटा, नियम, निधी व्यवस्थापन यावर काम करून मृत्यू कमी करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

चालवित असताना वाहतूकीच्या नियमांकडे दुर्लक्ष केले जातात. त्यामुळे अनेक वेळा अपघात होतात. रायगड जिल्ह्यात मागील २६ महिन्यांत रस्ते अपघातामध्ये २३६ जणांचा मृत्यू झाला आहे. त्यात बहुतांशी मृत्यू हे विना हेल्मेटमुळे झाले असल्याची माहिती वाहतूक विभागाकडून उपलब्ध झाली आहे.

त्यामुळे अपघात रोखण्यासह मृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी पोलिसांसह अन्य विभागाची आता मदत घेतली जाणार आहे. २०२५ पेक्षा प्राणांकित अपघाताचे प्रमाण १० टक्क्यांनी कमी करण्यासाठी जिल्हाधिकारीयांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. या बैठकीतून वेगवेगळ्या विभागातील अधिकारी यांच्याशी संवाद साधण्यात आला. स्पीड लिमीटचे बोर्ड लावणे, विजेची व्यवस्था करणे. ५० ते १०० मीटर अगोदर अपघात प्रवणक्षेत्र ठिकाणी आहे, वाहने सावकाश चालवा असे सुचनात्मक फलक लावणे. पंधरा दिवसांत उपाययोजना करून अहलाल सादर करण्याच्या सुचना संबंधित विभागाला देण्यात आल्या आहेत. अन्यथा संबंधित अधिकारी यांच्याविरोधात कारवाई केली जाणार आहे. रस्त्यांवरील अपघात कमी करण्यासाठी दर महिन्याच्या तिसऱ्या शुक्रवारी बैठक घेतली जाईल. या बैठकीतून आढावा घेतला जाणार आहे.

## अध्यक्षपदाच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर

- **गुरूवारी उमेदवारी अर्ज दाखल करता येणार**
- **दि.१ जून रोजी मतदान व निकाल जाहीर होणार**

**| म्हसळा | प्रतिनिधी |**

म्हसळा नगरपंचायत अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयाकडून अधिकृत निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. या निवडणूक प्रक्रियेनुसार नामनिर्देशन अर्ज दाखल करणे, छाननी, माघार तसेच अध्यक्षपदासाठी विशेष सभेचे आयोजन करण्यात आले आहे. जाहीर करण्यात आलेल्या कार्यक्रमानुसार उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया गुरूवारी (दि.२१) सकाळी ११.०० ते दुपारी २.०० वाजेपर्यंत म्हसळा नगरपंचायत सभागृहात पार पडणार आहे. म्हसळा नगर पंचायत मुख्याधिकाऱ्यांकडे नामनिर्देशन पत्र दाखल करण्यात येणार असून, शुक्रवारी (दि.२२) अर्जांची छाननी होणार आहे. सोमवारी (दि.२५) नामनिर्देशन पत्र फेटाळले गेले आहेत त्यांची नावे प्रसिद्ध करणे, मंगळवारी (दि.२६) सकाळी ११.०० ते २.०० वाजेपर्यंत पीठासन अधिकाऱ्यांच्या निर्णयाविरोधात अपिल दाखल करणे, तसेच त्याच दिवशी वैध उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत बुधवारी (दि.२७) दुपारी ३.०० वाजेपर्यंत निश्चित करण्यात आली आहे. अंतिम उमेदवारांची यादी शुक्रवारी (दि.२९) प्रसिद्ध केली जाणार आहे. म्हसळा नगरपंचायत अध्यक्षपदासाठीची विशेष निवडणूक सभा दि.१ जून रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित करण्यात आली असून, त्यानंतर मतदान प्रक्रिया व निकाल जाहीर करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. म्हसळा तालुक्यात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष आणि शिवसेना शिंदे गट यांच्यात सत्ता संघर्ष विकोपाला गेल्यापासून म्हसळा नगर पंचायत अध्यक्षपदाच्या निवडणूकिला रायगड जिल्ह्यात नवा ट्विस्ट सुरू झाला आहे.

# महार म्हणावे की बौध्द?

देशभरातील जनगणनेला अखेर सुरुवात झाली आहे. २०२१ सालात जी व्हायला हवी होती ती आता तब्बल सहा वर्षांनी होत आहे. यंदापासून पुन्हा जातींची गणना व्हावी अशी मागणी राहुल गांधी यांनी लावून धरली होती. १९३१ नंतर देशातील जातनिहाय जनगणना थांबली होती. स्वातंत्र्य मिळाल्यावर केवळ दलित जाती तसेच आदिवासी यांच्या नोंदी होत होत्या. इतर गणना थांबली होती. तिची मागणी देशभर झाल्यावर आधी तिला वाटाण्याच्या अक्षता लावण्याचा प्रयत्न भाजपने केला. पण नंतर त्यांना ती मान्य करावी लागली. त्यानुसार आता जनगणनेच्या दुसऱ्या टप्प्यात जातींची नोंद केली जाणार आहे. दरम्यान, अनुसूचित जातींमध्ये आपापली नोंद महार अशी करावी अशा प्रचाराची मोहिम सध्या काही राजकीय व सांस्कृतिक संघटनांनी चालवली आहे. काही जणांनी त्याला विरोध केला असून जातीचा स्तंभ मोकळा ठेवून धर्म बौध्द लिहावा असे म्हटले आहे. पूर्वाश्रमीचा महार व आताचा बौद्ध समाज हा राजकीयदृष्ट्या अत्यंत जागृत मानला जातो. या समाजात अनेक चांगले वाचक, अभ्यासक वा विश्लेषक आहेत. इतिहासाची त्यांची जाण उत्तम आहे. शिवाय तत्वांच्या आग्रहाबाबतही ते ठाम असतात. त्यामुळे या समाजात या प्रश्नावरून दोन तट पडल्यासारखे दिसते आहे. त्यातच इतर मागास व दलित समाजातील मंडळी त्यांना डिवचण्याचा प्रयत्न करताना दिसतात. जर तुम्ही १९५६ साली धर्मांतर करून जातीचा त्याग केला आहात तर अजूनही जनगणनेमध्ये जात का नोंदवत आहात असा सवाल त्यांना केला जातो आहे. यामुळे सोशल मिडियामध्ये सध्या जातीजातींमधील वाद उफाळून आले आहेत. हे वाद एकूण सामाजिक स्वास्थ्याच्या दृष्टीने चांगले नाहीत. यामुळे दलित समाजाच्या ऐक्यामध्ये फूट पडेल अशी भीती अनेक अभ्यासकांनी व्यक्त केली आहे. तिच्यात तथ्य आहे. दलितांमधील काही विशिष्ट जातींची प्रगती इतरांपेक्षा अधिक झाली आहे हे खरे असले तरी एकुणात दलित समाज एक राहिल्यामुळेच आजवर त्यांच्या भल्याचे व रक्षणाचे कायदे तसेच लाभाच्या योजना सरकारला कराव्या लागल्या आहेत ही वस्तुस्थिती आहे.

## जात एकाएकी नष्ट होत नाही

बाबासाहेब आंबेडकर हे केवळ महारच नव्हे तर अखिल कष्टकरी, दलित, पीडित समाजाचे नेते होते. त्यांच्या वतीने त्यांनी आयुष्यभर वकिली केली. राज्यघटनेत त्यांच्यासाठी तरतुदी व्हाव्यात म्हणून ते भांडले. हिंदू धर्मातील अस्पृश्यता तसेच जातीभेद यांच्याविरुध्द अत्यंत व्यापक अशी मांडणी त्यांनी केली. धर्मातच राहून संघर्ष करण्याचा व दलितांना सन्मानाची जागा मिळवून देण्याचा आटोकाट प्रयत्न त्यांनी केला. महाडचा सत्याग्रह व नंतर काळाराम मंदिरासाठीचे आंदोलन यामधून कथित वरच्या जातींचे लोक खालच्यांना जुमानणार नाहीत हे त्यांच्या लक्षात आले. त्यातच येरवडा कराराच्या वेळी त्यांना माघार घ्यावी लागली. त्यामुळे अंतिमतः १९३५ मध्ये त्यांनी हिंदू म्हणून जन्माला आलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही अशी घोषणा त्यांनी केली. मात्र तरीही ती तात्काळ अमलात आणली नाही. पुढे वीस वर्षे ते थांबले. अखेर १९५६ मध्ये त्यांनी आपला शब्द खरा केला. त्यांच्या समवेत लाखो लोकांनी बौद्ध धर्मात प्रवेश केला. धर्मांतर केल्यानंतर आता आपण हिंदूंच्या जाती व त्याच्या अनुषंगाने येणारे सर्व अन्याय फेकून देऊ असे त्यांना वाटत होते. असे करून हिंदू धर्माला व जातिव्यवस्थेला आपण जोरदार तडाखा देऊ असे त्यांना वाटत होते. काही प्रमाणात ते साध्य झाले. पण कोणतेही वास्तव एकाएकी बदलत नसते. जातीची सवय तर हिंदू व भारतीय समाजाच्या हाडीमासी हजारो वर्षांपासून खिळलेली आहे. ती एकाएकी नष्ट होणे शक्य नव्हते. बाबासाहेबांच्या धम्मपरिवर्तनाला यंदा ऑक्टोबरात ७० वर्षे पूर्ण होतील. तरीही भारतीय समाजात दलितांना जातीवरून छळण्याचे, बहिष्कृत करण्याचे, न्याय्य हक्क न देण्याचे प्रकार हरघडी चालू असतात. महारांनी बौध्द धर्म स्वीकारला असला तरी गावागावांमधली त्यांची ओळख बदललेली नाही. शिवाय आपल्या समाजात आडनावावरून जात ओळखण्याचा छंद सर्वांना असतो. त्यामुळे दलितांनी कागदावर आणि मनाने कितीही धर्मांतर केले तरी इतरांच्या लेखी त्यांचा दर्जा बदललेला नाही.

## डावपेच आणि तत्व

जनगणनेत जात लिहू नये असे म्हणणाऱ्यांचे हेतू चांगले आहेत. आपण जात नाकारायला हवी असे त्यांना वाटते. जात न लिहिता बौध्द धर्म असा उल्लेख केल्याने जातीयतेला नकार देता येईल व जातिव्यवस्थेविरुध्दचे बंड तीव्र करता येईल असे त्यांना वाटते. मात्र असे केल्याने दलितांमधील जातींची लोकसंख्या कमी होईल व नंतर आरक्षण व इतर सवलतींवर घटतील अशी भीती अनेकांना वाटते. त्यासाठीच जातीचा उल्लेख करणे आवश्यक आहे असा मुख्य युक्तिवाद आहे. समाजात जातिव्यवस्था आहे, आरक्षणाच्या सवलती जातीच्या आधारेच मिळतात. ती एक शासकीय बाब असून त्याकडे भावनिक रीतीने पाहणे योग्य नाही असे युक्तिवाद करणाऱ्यांचे म्हणणे आहे. १९५६ नंतर दलितांनी धर्मांतर केल्यानंतर राखीव जागांचे काय करायचे असा प्रस्न निर्माण झाला होता. खुद्द बाबासाहेबांनी जुन्या जातीच्या आधारे कोणत्याही सवलती घेणार नाही, निवडणूकही राखीव मतदारसंघातून लढणार नाही अशी भूमिका एका ठिकाणी घेतली होती. बाबासाहेबांचे म्हणणे तात्त्विकदृष्ट्या योग्यच होते व ते निभावून नेण्याची त्यांच्यात नक्कीच धमक होती. पण समाजातले वास्तव त्याहून भयानक होते व अजूनही आहे. त्यामुळे बहुसंख्य समाजाला आरक्षण व इतर सवलतींची नितांत गरज होती व अजूनही ती संपलेली नाही. आजही शेतमजूर, गरिबातले गरीब, शहरी तळाच्या वर्गातले कामगार यांच्यात दलितांची संख्या सर्वाधिक आढळते. महार वगैरे काही जाती शिकून पुढे गेल्या तरी त्यांचेही सर्वच चांगले झाले आहे असे नाही. आजही राखीव जागांवर त्यांची कोंडी केली जाते. राखीव जागांसाठी योग्य उमेदवार नाहीत असे सांगून त्या भरण्याचे टाळले जाते. त्याची आकडेवारी उपलब्ध आहे. उच्च शिक्षणाच्या प्रवेशांमध्ये आता राखीव जागांवरच्या मुलांची गुणवत्ता बिनराखीव मुलांइतकीच किंवा त्याहूनही अधिक असल्याचे दिसून येऊ लागले आहे. त्यामुळे तिथे स्पर्धा भयंकर वाढली आहे. मात्र तरीही राखीव जागांच्या आधारे प्रवेश मिळवणारे म्हणजे अगदीच कंडम अशा रीतीने पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदललेला नाही. शिवाय यामध्ये बहुसंख्या समाजाला याचा फायदा अजूनही मिळालेला नाही. अशा स्थितीत बौध्द म्हणून नोंद करून सवलती नाकारण्याचे हौतात्म्य करण्याला काही अर्थ नाही. हीच बाब लक्षात घेऊन महाराष्ट्र सरकारने १९६० नंतर बौध्दांमधील पूर्वाश्रमीच्या अस्पृश्यांना राखीव जागांचा फायदा मिळेल अशी तरतूद केली. व्हीपी सिंग यांच्या काळात १९९० मध्ये केंद्र सरकारनेही असाच नियम केला. हा फायदा गमावणे म्हणजे स्वतःच्या पायावर धोंडा पाडून घेण्यासारखे असेल. त्यामुळे बौध्द असूनही जनगणनेत महार किंवा मांग किंवा अन्य कोण्या जातीची नोंद करणे हा डावपेचांच्या दृष्टीने अत्यंत योग्य असा निर्णय आहे. त्यामुळे दलित समाजाच्या क्रांतिकारत्वाला काहीही उणे येत नाही.

विचार

# ...तुला देतो ई-पैसा

*भविष्यात आवाजाने व्यवहार करणे, हाताच्या हालचालीने पैसे देणे, अशा नवीन पद्धती येऊ शकतात. कृत्रिम बुद्धिमत्ता आपल्या खर्चावर लक्ष ठेवेल, सल्ला देईल, बचत वाढवेल. त्यामुळे जीवन अधिक सोपे होईल. 'येरे येरे पावसा, तुला देतो ई पैसा' ही ओळ एका नव्या युगाची सुरुवात दर्शवते. पैसा आता दिसणार नाही, पण तो प्रत्येक ठिकाणी असेल. अशा परिस्थितीत आपली डिजिटल ओळख सुरक्षित ठेवणे सर्वात महत्त्वाचे ठरेल.*






**डॉ. दीपक शिकारपूर**

कोणतेही तंत्रज्ञान स्वीकारताना काही मापदंड तपासून पहावे लागतात. नव्या तंत्रज्ञानामुळे वेळ वाचणार आहे का, श्रम कमी होणार आहेत का, या तंत्रज्ञानामुळे उत्पादनक्षमता वाढणार आहे का, खर्च कमी होणार आहे का, ते वापरणे सोपे जाणार आहे का, अशा प्रश्नांचे उत्तर 'हो' असेल तर ते तंत्रज्ञान स्वीकारावे, असा नियम आहे. या कसोट्यांवर मोबाईल तंत्रज्ञान तपासून पाहिले तर ते 'सौ प्रतिशत खरा' ठरते. या तंत्रज्ञानाचे उपयोग पाहिले तर आश्चर्याने बोटे तोंडात घालायची वेळ येते. गेल्या काही वर्षांमध्ये मोबाईल तंत्रज्ञानामुळे शक्य आणि लोकप्रिय झालेल्या 'युपीआय'चाच विचार केला तरी त्याचे अगणित फायदे सांगता येतील.

एकविसाव्या शतकाची सुरूवात होऊन आता २६ वर्षे झाली आहेत. गेल्या पंधरा-वीस वर्षांमध्ये झालेले बदल त्याआधीच्या ५० वर्षांमध्येही झाले नव्हते, असे म्हणता येईल. कॉंप्युटर, इंटरनेट, त्यानंतर आलेला स्मार्टफोन आणि या तिघांचे जमलेले त्रिकूट यासारख्या घटकांमुळे महानगरांपासून खेड्यांपर्यंत सर्वांच्याच जीवनात फरक पडला. संगणक आणि संगणकीय प्रणाली पूर्वीप्रमाणे फक्त सांगकाम्या राहिल्या नसून त्यांना मानवी व्यवहार अधिक चांगल्या पद्धतीने समजून घेण्याच्या क्षमतेची जोड दिली जात आहे. बदलत्या तंत्रज्ञानामुळे अनेक क्षेत्रांमध्ये क्रांतिकारी परिवर्तन होणार आहे. आपल्या आसपासच्या डिजिटल विश्वाची सतत उत्क्रांती होत राहणार आहे. त्यामुळेच या तंत्राचे व्यावहारिक उपयोगदेखील वाढताना दिसणार आहेत. येरे येरे पावसा तुला देतो पैसा, हे गाणे सर्वश्रुत आहेच. आता पाऊस येईल पण त्याला द्यायला लागणारे पैसे हळूहळू भौतिक जगातून नाहीसे होत आहेत. पूर्वी पैसा म्हणजे हातात असणारी नाणी, नोटा, खिशात ठेवलेले पाकीट, हे सर्व आपल्याला परिचित होते. पण २०२६च्या जगात हा पैसा हळूहळू अदृश्य होत आहे. ई पैसा म्हणजेच डिजिटल पैसा आता आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनत चालला आहे. गेल्या काही वर्षांमध्ये भारतात पैशाच्या व्यवहारांमध्ये मोठी क्रांती घडली आहे. मोबाईलच्या सहाय्याने क्षणात पैसे पाठवणे, बिले भरणे, खरेदी करणे अगदी सहज झाले आहे. आज शहरांपासून गावांपर्यंत प्रत्येक ठिकाणी मोबाईलद्वारे व्यवहार होताना दिसतात. चहाविक्रेता असो किंवा मोठा व्यापारी, सर्वजण एका छोट्याशा क्यूआर चिन्हाद्वारे पैसे स्वीकारत आहेत. त्यामुळे रोख पैसा हळूहळू कमी होत आहे.

आज भारतात युपीआयने अक्षरशः आर्थिक क्रांती घडवून आणली आहे. गावोगावी छोट्या विक्रेत्यांकडेही क्यूआर कोड दिसतो. रिक्षावाले, फळविक्रेते, अगदी मंदिरातील देणग्याही डिजिटल पद्धतीने स्विकारल्या जात आहेत. २०२६ मध्ये ही सवय इतकी अंगवळणी पडली आहे की रोख पैसे नसले तरी व्यवहार थांबत नाहीत. खिशात किती पैसे आहेत, हा प्रश्न आता मोबाईलमध्ये बॅलन्स आहे का, असा बदलला आहे. आजचा स्मार्टफोन केवळ बोलण्यासाठीचे साधन राहिलेला नाही, तर एक प्रकारचे डिजिटल पाकीट बनला आहे. आपले बँक खाते, पैसे, व्यवहारांची माहिती सर्व काही या एका उपकरणात साठवलेले असते. त्यामुळे बँकेत जाण्याची गरज कमी झाली आहे. रांगेत उभे राहण्याचे कष्ट वाचले आहेत. काही क्षणांमध्ये व्यवहार पूर्ण होतो. याचबरोबर 'नियर फिल्ड कम्युनिकेशन' म्हणजेच फोन किंवा कार्ड फक्त यंत्राजवळ नेले की व्यवहार पूर्ण होतो, ही पद्धत वाढत आहे. बस, मेट्रो, दुकाने, रुग्णालये अशा सर्व ठिकाणी ही सुविधा उपलब्ध होत आहे. त्यामुळे व्यवहार अधिक जलद आणि सोपे झाले आहेत. तंत्रज्ञानाची ही घोडदौड इथेच थांबणारी नाही. २०३० पर्यंत आपण वेअरेबल टेक्नॉलॉजी म्हणजे घड्याळ, चष्मा किंवा अगदी शरीरात बसवलेली सूक्ष्म चिप यांच्याद्वारे व्यवहार करताना पाहू शकतो. काही देशांमध्ये तर अशा चिप्सची चाचणी सुरूही झाली आहे. कल्पना करा, आपल्याला पाकिट, कार्ड, अगदी मोबाईलही बाळगण्याची गरज नाही. फक्त आपल्या ओळखीनेच (रेकग्निशन) व्यवहार होणार!

ॲप्सचा उद्योग तर प्रचंड वेगाने वाढत आहे. खरेदी, बिले भरणे, गुंतवणूक, कर्ज घेणे, सर्व काही ॲप्समधून होत आहे. त्यामुळे व्यापार, विपणन आणि ग्राहक सेवा यांचे स्वरूप पूर्णपणे बदलत आहे. आठवड्याचे सातही दिवस २४ तास सेवा ही आता अपेक्षा बनली आहे. ग्राहकाला सर्व काही लगेच, सोप्या पद्धतीने आणि सुरक्षित व्यवहाराद्वारे हवे आहे आणि तंत्रज्ञान ते देत आहे. सुरक्षेच्या दृष्टीनेही मोठे बदल होत आहेत. जैविक ओळख तंत्रज्ञान (बायोमेट्रिक) म्हणजे बोटांचे ठसे, चेहऱ्याची ओळख, डोळ्यांचे स्कॅन यांचा वापर वाढत आहे. यामुळे व्यवहार अधिक सुरक्षित होत आहेत. आज अनेक मोबाईलमध्ये बोट ठेवून किंवा चेहरा दाखवून फोन उघडता येतो. उद्या कदाचित पैशांचा व्यवहारही अशाच पद्धतीने होईल. बँकिंग क्षेत्रातही मोठे बदल होत आहेत. पारंपरिक कार्डांचा वापर कमी होत आहे. त्याऐवजी अधिक सुरक्षित आणि स्मार्ट साधने वापरात येत आहेत. पूर्वी कार्डवरील माहिती सहज चोरता येत असे, पण आता अधिक सुरक्षित पद्धती विकसित होत आहेत. तरीही भविष्यात कार्डांची गरजही कमी होईल असे दिसते. व्यवसायक्षेत्रात या बदलांचा मोठा प्रभाव पडत आहे. दुकानदार आता डिजिटल पद्धतीने पैसे स्वीकारत आहेत. या पद्धतीमुळे ग्राहकांना जलद सेवा मिळते, व्यवहारांची नोंद आपोआप राहते, त्यामुळे पारदर्शकता वाढते. छोट्या व्यवसायांनाही मोठ्या संधी उपलब्ध होत आहेत. शिक्षणक्षेत्रातही बदल दिसत आहेत. विद्यार्थी मोबाईलद्वारे फी भरतात, अभ्यासक्रम घेतात. त्यामुळे लहान वयातच आर्थिक व्यवहारांचे ज्ञान मिळते. डिजिटल साक्षरता वाढते.

डिजिटल व्यवहारांमध्येही भारताने गेल्या काही काळात मोठी झेप घेतली. हे एक असे युग आहे, जिथे तंत्रज्ञानाचा वापर सर्व क्षेत्रात वाढत आहे. या युगात, डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर आपल्या दैनंदिन जीवनात मोठ्या प्रमाणावर होत आहे. यामुळे आपल्या जगण्याची आणि काम करण्याची पद्धत बदलत आहे. आता अशी बरीचशी कामे 'ऑनलाईन' होऊ घातल्याने येत्या फक्त दहा ते २० वर्षांमध्ये आपल्याला कल्पनाही करता येणार नाही, इतक्या बाबी संगणकाद्वारे हाताळता येणार आहेत. परंतु या सगळ्या सोयींसोबत काही आव्हानेही आहेत. सर्वात मोठा प्रश्न म्हणजे सुरक्षितता. फसवणूक, बनावट संदेश, ओटीपी चोरणे या गोष्टी वाढत आहेत. त्यामुळे प्रत्येकाने सतर्क राहणे गरजेचे आहे. आपली माहिती सुरक्षित ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. तसेच समाजात डिजिटल दरी ही समस्या आहे. तरुण पिढी तंत्रज्ञान सहज वापरते, पण वृद्धांना अडचणी येतात. त्यामुळे सर्वांना तंत्रज्ञानाचे शिक्षण देणे आवश्यक आहे. प्रत्येक नागरिक डिजिटल व्यवहार समजू शकेल असे वातावरण तयार करणे गरजेचे आहे. एक महत्त्वाची बाब म्हणजे खर्चाची जाणीव. पूर्वी आपण नोटा मोजून खर्च करत असल्याने व्यवहारावर नियंत्रण रहायचे. आता मोबाईलद्वारे सहज पैसे जातात. त्यामुळे कधी कधी अपेक्षेपेक्षा जास्त खर्च होतो. म्हणून आर्थिक शिस्त राखणे आवश्यक आहे.

भविष्यात आवाजाने व्यवहार करणे, हाताच्या हालचालीने पैसे देणे अशा नवीन पद्धती येऊ शकतात. कृत्रिम बुद्धिमत्ता आपल्या खर्चावर लक्ष ठेवेल, सल्ला देईल, बचत वाढवेल. त्यामुळे जीवन अधिक सोपे होईल. 'येरे येरे पावसा, तुला देतो ई-पैसा' ही ओळ एका नव्या युगाची सुरुवात दर्शवेल. पैसा आता दिसणार नाही, पण तो प्रत्येक ठिकाणी असेल. आपल्या मोबाईलमध्ये, आपल्या ओळखीत, आपल्या प्रत्येक व्यवहारात. पाकीट हरवले तरी नुकसान होणार नाही, पण आपली डिजिटल ओळख सुरक्षित ठेवणे सर्वात महत्त्वाचे ठरेल. तंत्रज्ञानाने आपले जीवन सुलभ केले आहे, पण त्याचा योग्य वापर करणे आपल्या हातात आहे. काळ बदलत आहे, सवयी बदलत आहेत आणि आपणही बदलत आहोत. म्हणूनच या नव्या युगाला स्वीकारून, त्याचा योग्य उपयोग करून, सुरक्षित आणि सजग राहून पुढे जाणे हेच शहाणपणाचे आहे. एकंदरीत, कालाय तस्मै नमः काळाच्या या प्रवाहाला अभिवादन करून, डिजिटल भविष्याचा आत्मविश्वासाने स्वीकार करायला हवा. परिवर्तन हाच निसर्गाचा नियम आहे आणि या परिवर्तनाशी जुळवून घेणाराच उद्याचा विजेता असेल!

चर्चा आजची

# रायगडाच्या दुरवस्थेला जबाबदार कोण?

**संतोष राऊळ**



छत्रपती शिवाजी महाराजांनी बांधलेल्या रायगड किल्ल्यावर सध्या मोठ्या प्रमाणात विकास कामे सुरू आहेत. त्यासाठी सरकारकडून करोडो रुपये मंजूर करण्यात आले आहेत. परंतु, कित्येक वर्षे उलटली तरी ही विकास कामे पुर्णत्वास गेली नाहीत. उलट दिवसेंदिवस धक्कादायक गोष्टी समोर येत आहेत. नुकतेच रायगड किल्ल्यावर रिकाम्या दारूच्या बाटल्या गोळा करण्यात आल्या. त्यामुळे शिवप्रमी, दुर्गप्रेमी, इतिहास अभ्यासक आणि स्थानिकांमधून नाराजीचे सुर उमटू लागले आहेत. त्यामुळे रायगडाच्या दुरवस्थेला जबाबदार कोण? जर रायगड सारख्या किल्ल्याची अशी अवस्था असेल, तर स्वराज्याच्या पराक्रमांची साक्ष देणाऱ्या इतर किल्ल्यांची काय अवस्था असेल, अशे प्रश्न शिवप्रेमी आणि दुर्गप्रेमींमधून उपस्थित हेत आहे.

महाराष्ट्रासह रायगड जिल्ह्यात असंख्य किल्ले आहेत. या सर्व किल्ल्यांच्या उच्चस्थानी रायगड किल्ला आहे. दरवर्षी हजारो पर्यटक, शिवप्रेमी, दुर्गप्रेमी आणि इतिहास अभ्यासक रायगड किल्ल्याला भेट देत असतात. शिवप्रेमींसाठी हे ठिकाण मंदिराहून पवित्र असे ठिकाण आहे. रायगड किल्ल्याच्या संवर्धनासाठी दुर्गप्रेमी वेळोवेळी पुढाकार घेत असतात. परंतु, त्यांना पुरातन विभागाची आडकाठी येत असते. रायगड किल्ला पुरातन विभागाच्या अखत्यारीत येत असल्याने या ठिकाणी साधा खड्डा खणतानाही त्यांची परवानगी घ्यावी लागते. किल्ल्यावर विकास कामे देखील सुरू आहेत. परंतु, ही विकास कामे कधी पुर्णत्वास जातील याची कोणालाच कल्पना नाही. या ठिकाणी नव्याने करण्यात येणारे बांधकाम देखील किती दिवस तग धरून बसेल, याची देखील शास्वती नाही. असे एक ना अनेक प्रश्न उपस्थित होत असतानाच एक धक्कादायक गोष्ट समोर आली आहे. त्यामुळे सर्वस्तरातुन पुरातन विभागावर ताशेरे ओढले जात आहेत.

नुकतेच रायगड किल्ल्यावर ५०हून अधिक दारूच्या रिकाम्या बाटल्या सापडल्या. त्याचबरोबर मोठ्या प्रमाणात प्लास्टिकचा कचरा देखील सापडला. या घटनेमुळे सर्वत्र संताप व्यक्त होत आहे. ज्या रायगड किल्ल्याला मंदिराहूनही पवित्र मानलं जातं, त्या ठिकाणी असे प्रकार घडणं म्हणजे दुदैवंच म्हणावं. रायगड किल्ल्याची संपुर्ण जबाबदारी पुरातत्व विभागाकडे असून, त्यांच्याकडून याकडे पुर्णपणे दुर्लक्ष होताना दिसत आहे. रायगड किल्ल परिसरातील एमटीडीसीच्या खोल्यांजवळ, राणी वसाच्या मागील भागात, तसेच गडावरील इतर ठिकाणी मोठ्या प्रमाणात दारूच्या बाटल्या, प्लास्टिक कचरा आणि अस्वच्छता आढळून आली. शिवरायांच्या स्मृतींशी जोडलेल्या पवित्र स्थळी असे प्रकार उघड झाल्याने शिवप्रेमींमधून संताप व्यक्त होत आहे. रायगडावरील सुरक्षा व्यवस्था अत्यंत अपुरी पडत असून, प्रवेशद्वारांवर कोटेकोर तपास तपासणी होत नसल्याने पर्यटकांकडून मद्याच्या बाटल्या सहजपणे गडावर नेल्या जात आहेत. इतिहासाचा अभिमान सांगणाऱ्या गडावरच अशा प्रकारे पावित्र्याची विटंबना होत असेल, तर प्रशासन नेमके काय करत आहे? असा सवाल शिवप्रेमी उपस्थित करत आहेत.

दरम्यान, शिवप्रेमींनी गडावर तातडीने कडक उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. त्यामध्ये सीसीटीव्ही यंत्रणा वाढवणे, सुरक्षारक्षकांची संख्या वाढवणे, प्रवेशद्वारांवर कडक तपासणी करणे, दारूबंदीचे स्पष्ट फलक लावणे आणि नियम तोडणाऱ्यांवर कठोर कारवाई करणे यांचा समावेश आहे. इतिहास, संस्कृती आणि स्वराज्याच्या अस्मितेचे प्रतीक असलेल्या रायगड किल्ल्यावर घडलेल्या या प्रकारामुळे आता पुरातत्त्व विभाग आणि प्रशासनाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत. जर रायगड सारख्या किल्ल्याची हि अशी अवस्था असेल, तर इतर किल्ल्यांची काय परिस्थिती असेल? अशी भीती देखील व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्यात पायदळ प्रमुख म्हणून कार्य केलेल्या सरनोबत पिलाजीराव गोळे यांचे पंधरावे वंशज लौकिक गोळे यांनी या प्रकाराबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करत राज्य शासन आणि पुरातत्त्व विभागाला थेट जाब विचारला आहे. त्यांनी, छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजधानी असलेल्या रायगड किल्ल्यावर दारूच्या बाटल्या सापडणे ही अत्यंत दुर्दैवी आणि संतापजनक बाब आहे. गडावर अशा घटना घडत असताना पुरातत्त्व विभाग आणि प्रशासन नेमके काय करत आहे, हा मोठा प्रश्न आहे. रायगडाचे पावित्र्य जपण्यासाठी तातडीने कडक सुरक्षा व्यवस्था, सीसीटीव्ही यंत्रणा आणि कठोर कारवाईची गरज आहे. शिवरायांच्या राजधानीची विटंबना कोणत्याही परिस्थितीत सहन केली जाणार नाही, असा थेट इशारा त्यांनी दिला आहे.

लोकसंसद

### क्रीडा संधी म्हणजे 'परदेशवारी' नव्हे!

मुंबई भाजपचे अध्यक्ष आणि आमदार अमित साटम यांनी आपल्या मुलीला दक्षिण कोरियात होणाऱ्या कराटे स्पर्धेत सहभागी न पाठवण्याचा घेतलेला निर्णय चर्चेचा विषय ठरला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशहितासाठी काही काळ अनावश्यक परदेश प्रवास टाळण्याचे आवाहन केले होते. मात्र त्या आवाहनाचा अर्थ क्रीडा, शिक्षण किंवा गुणवत्तेच्या आंतरराष्ट्रीय संधी नाकारणे असा निश्चितच होत नाही. १२ वर्षांच्या मुलीने कराटेसारख्या कठीण खेळात ब्लॅक बेल्ट मिळवून आंतरराष्ट्रीय स्पर्धेपर्यंत मजल मारणे ही अभिमानाची बाब आहे. अशा स्पर्धांमध्ये सहभागी होणारे खेळाडू केवळ स्वतःचे प्रतिनिधित्व करत नसतात, तर ते भारताचाही झेंडा जगासमोर नेत असतात. त्यामुळे अशा संधींना ''परदेशवारी'' किंवा ''मौजमजा''च्या चौकटीत बसवणे योग्य वाटत नाही. देशहिताची भावना महत्त्वाचीच; पण त्याच वेळी पुढील पिढीच्या कर्तृत्वाला प्रोत्साहन देणेही तेवढेच आवश्यक आहे. मुलांच्या मेहनतीने मिळवलेल्या संधी नाकारणे हा त्याग नसून त्यांच्या स्वप्नांवर मर्यादा आणण्याचा प्रकार ठरू शकतो. राष्ट्रप्रेम आणि प्रगती यांचा समतोल राखणे अधिक गरजेचे आहे. **- दीपक काशिराम गुंडये.**

### शिक्षणाच्या वाटेवरील महत्त्वाचे पाऊल!

दुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी शासनाने चार हजार वस्तीस्थाने घोषित करून वाहतूक सुविधा किंवा भत्ता देण्याची केलेली घोषणा स्वागतार्ह आहे. अनेक विद्यार्थ्यांना आजही डोंगरवाटा, ओढे-नाले पार करून शाळेत जावे लागते. त्यामुळे उपस्थिती कमी होऊन काहींना शिक्षणही सोडावे लागते. अशा परिस्थितीत हा निर्णय विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणारा ठरेल. मात्र, केवळ भत्ता न देता प्रत्यक्ष विविध मार्गाने का होईना वाहतूक सुविधा उपलब्ध करणे अधिक गरजेचे आहे. योजनेची प्रभावी अंमलबजावणी झाली तर ग्रामीण शिक्षण व्यवस्थेत सकारात्मक बदल घडेल आणि कोणतेही मूल केवळ अंतरामुळे, शाळा मार्गामुळे शिक्षणापासून वंचित राहणार नाही. **-विश्वनाथ पंडित**

दिनविशेष

# जागतिक मधमाशी दिन

२० मे २०१८ पासून जागतिक मधमाशी दिन साजरा करायला सुरुवात झाली. ज्यास कारण होते, जगभरातील मधमाशांची घटत चाललेली संख्या जी चिंताजनक आहे. मधमाशांचे मानवी आरोग्य आणि पराग कणाबद्दलचे योगदान यांचे स्मरण करण्यासाठी स्लोव्हेनियन सरकारने २०१६ मध्ये राष्ट्रसंघासमोर २० मे हा दिवस जागतिक मधमाशी दिन म्हणून जाहीर करण्याची मागणी केली होती. त्यानंतर या मागणीला इतर राष्ट्राकडून चांगला प्रतिसाद मिळाल्यामुळे २०१८ पासून जागतिक मधमाशी दिन साजरा केला जातो. मधमाशा, पक्षी आणि वटवाघुळ जगातील ३५% शेतमालाचे परागीकरण करतात. प्रमुख ८७ पिकांचे परागीकरण मधमाशा मुळे तयार होतात. ज्यामुळे मानवाला अन्नधान्य उत्पादन मिळते. एवढेच नाही तर आहारात वापरल्या जाणाऱ्या दर चार पिकांपैकी तीन पिकांना परागीकरणाची गरज असते. त्यामुळे पराग कणांच्या अवतीभोवती घोगवणाऱ्या मधमाशांचे महत्त्व आज जागतिक मधमाशी दिनाच्या निमित्ताने जाणून घेऊ. आजूबाजूला दिसणारे प्रत्येक पक्षी व प्राणी महत्त्वाच्या असतात. या प्राणी व पक्षांच्या मदतीने जैवविविधता टिकून ठेवण्यास मदत होते. त्यासाठी निसर्गातील लहान मोठ्या सर्व घटकांची मदत होते. फुलपाखरा पासून ते मधमाशी पर्यंत सर्वच निसर्गातील अन्नसाखळीचे चक्र फिरते ठेवत असतात. आता मधमाशांचे बघा त्या एका फुलातून परागकण गोळा करून दुसऱ्या फुलांमध्ये टाकतात त्यामुळे काय होते तर पोषक अशा फळा फुलांची निर्मिती होते. त्यामुळे मानवाला चांगल्या फळ, बिया आणि पिकांचे उत्पादन घेता येते. आज जगभरातील अनेक जण मधमाशी पालन व्यवसायाकडे वळाले आहेत. मधमाशांच्या पालनामुळे मध तर मिळतोच त्याचबरोबर विविध पिकांची गुणवत्ता सुधारण्यासाठी पुन्हा पुन्हा उत्पादन घेण्यासाठी मधमाशा महत्त्वाच्या ठरतात. मधमाशा पालनाकडे व जैवविविधता टिकून ठेवण्यासाठी चांगला पर्याय म्हणून पाहिले पाहिजे. त्यामुळे आज जगभर मधमाशी पालनासाठी विविध कार्यक्रम राबवले जातात. मधमाशांच्या अस्तित्वाला मानवी वर्तनामुळे धोका निर्माण झाला आहे. पर्यावरणात मानवी हस्तक्षेपामुळे त्याच्या प्रजाती नष्ट होण्याचे प्रमाण १०० ते हजार पट अधिक आहे. मधमाशी पालनावर लाखो लोकांचा रोजगार अवलंबून आहे. मधमाशीला सामाजिक कीटक असे म्हटले जाते. मधमाशा इतर किटकांप्रमाणे एकट्या दुकट्या राहत नाही तर त्या समूह करून राहतात. त्यांच्या घराला पोळे असे म्हणतात. एका पोळ्यात हजारो मधमाशा असतात. मधमाशा त्यांच्या अन्नाच्या पूर्ततेसाठी फुलातील मकरंद आणि पराग गोळा करतात. मधमाशा एका फुलावरून दुसऱ्या फुलावर परागकणांचे स्थलांतर करतात त्यामुळे फुलांची बीजधारणा व फलधारणा होते त्यालाच परागीभवन असे म्हणतात. परागीभवनामुळे पीक उत्पादनात २५ ते ३० टक्के वाढ होते हे शास्त्रज्ञांनी सिद्ध करून दाखवले आहे त्यामुळे मधमाशा या शेतकऱ्यांसाठी वरदान ठरत आहेत.

तरीही मधमाशीपालनाबाबत आपल्याकडील शेतकरी अजूनही गंभीर नाहीत उलट मधमाशांचे पोळे जाळून त्यांना शेतातून हाकलून देण्याकडेच शेतकऱ्यांचा कल असतो. पूर्वी शेतात, बांधावर, आजूबाजूला सहज नजरेस पडणारी मधमाशांची पोळे आता दिसत नाही. मधासाठी पोळे जाळणे, कीटकनाशके फवारणे, मोबाईल टॉवर उभारणे, मधमाशांविषयी अज्ञान पसरवणे या कारणांमुळे मधमाशी सारखा उपयुक्त जीव नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. परिसरातील मधमाशा नष्ट झाल्या तर त्याचा पीक उत्पादनावर विपरीत परिणाम होऊ शकतो म्हणून आपण सर्वांनी मधमाशांच्या संरक्षणासाठी व संवर्धनासाठी पुढे आले पाहिजे. मधमाशांची शास्त्रिय माहिती घेऊन तिचे संगोपन करण्याचे तंत्र अवगत केले पाहिजे. पराग सिंचनामुळे शेती उत्पादनात वाढ होत असल्याने मध व मेन या बाबीपेक्षा उत्पादनातील वाढ हा महत्वाचा घटक मानून शेतकऱ्यांनी मधमाशी पालनाला अग्रक्रम द्यायला हवा.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२० मे

१)श्री.शंकर गोविंद सुतार श्रीबाग-२, अलिबाग, २०-५-१९४५

२) श्री.श्रीनिवास त्र्यंबक जोशी मु.ब्राम्हणआळी,अलिबाग, २०-५-१९४९

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे. **संपर्क-** ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते



शुभम अमोल म्हात्रे , अलिबाग



कुवरबाई खेतशी देढिया, स्मरणार्थ अलिबाग

### कॅनिंग आंब्याला कमी दर

**रत्नागिरी** : आंबा हंगामात मोठ्या प्रमाणावर कॅनिंगसाठी आंब्याची खरेदी केली जाते. मात्र, यंदा व्यापाऱ्यांकडून आणि प्रक्रिया उद्योगांकडून केवळ १५ रुपये प्रति किलो या दराने खरेदी सुरू आहे. हा दर अत्यंत अल्प असून बागायतदारांमध्ये नाराजी आहे.

# उरणच्या दुर्दशेला विरोधक जबाबदार

## ■ नगराध्यक्षा भावना घाणेकर यांचा सडेतोड प्रहार

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

पाणीटंचाईपासून ते कचऱ्याच्या ढिगांपर्यंत आणि खड्डेमय रस्त्यांपासून ते रखडलेल्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांपर्यंत उरण शहर समस्यांच्या गर्तेत सापडले असून, यामागे विरोधकांचे गलिच्छ राजकारण आणि प्रशासनातील काही अधिकाऱ्यांचा नाकर्तेपणा हेच प्रमुख कारण असल्याचा आरोप नगराध्यक्षा भावना घाणेकर यांनी रविवारी केला. उरण नगरपरिषदेच्या सभागृहात आयोजित विशेष पत्रकार परिषदेत त्यांनी विरोधकांवर थेट निशाणा साधत येत्या आठवड्यात आंदोलन छेडण्याचा इशारा दिला.



पत्रकारांशी संवाद साधताना नगराध्यक्षांनी विरोधकांची एकेक पोलखोल केली. शहरातील जुनी व गळकी पाईपलाईन बदलण्याचा प्रस्ताव गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे, कारण विरोधकांनी सभागृहात वारंवार त्याला खो घातला. याच निष्काळजीपणामुळे दररोज लाखो लिटर शुद्ध पाणी वाया जात असून त्याचा थेट परिणाम शहराच्या तिजोरीवर झाला आहे. पाणी बिल दंडासह ४२ कोटी रुपयांवर पोहोचले आहे, तर ची २ कोटी रुपयांची थकबाकी झाली आहे. उद्या शहराचा वीज व पाणी पुरवठा ठप्प झाला तर त्याला सर्वस्वी विरोधकच जबाबदार असतील, असा घणाघात त्यांनी केला.

विरोधकांच्या नकारात्मक भूमिकेमुळेच गेल्या ८ ते १० वर्षांत शहरातील रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य पसरले, पावसाळ्यापूर्वी गटारांची सफाई झाली नाही आणि बहुतांश स्ट्रीटलाईट्स बंद पडल्या. याहून धक्कादायक म्हणजे गेली वीस वर्षे झाली तरी शहरातील पाण्याच्या टाक्या एकदाही साफ केल्या गेल्या नाहीत, असा गंभीर आरोपही त्यांनी यावेळी केला.

शहराच्या अस्मितेचा विषय असलेला राजीव गांधी टाऊन हॉल आणि वाहतूक कोंडी फोडणारा महत्त्वाचा बायपास रस्ता हे दोन्ही प्रकल्प केवळ विरोधकांच्या अंतर्गत राजकीय कुरघोडींमुळे गेल्या ८ ते १० वर्षांपासून रखडले आहेत. जनतेच्या सांस्कृतिक हक्कांचा गळा विरोधकांनीच घोटला आहे, असे त्या म्हणाल्या. स्वच्छतेच्या मुद्द्यावर बोलताना त्यांचा स्वर अधिक आक्रमक झाला. कचरा संकलनाचा ठराव विरोधकांनी सभागृहात हाणून पाडल्यामुळेच आज शहरभर कचऱ्याचे ढीग साचले आहेत. कोट्यवधी रुपये खर्चून उभारलेला बायोगॅस प्रकल्प सुरू करण्याच्या प्रस्तावालाही विरोधकांनी संख्याबळाच्या जोरावर विरोध केल्याने तो गेली तीन वर्षे धूळ खात बंद पडून आहे.

महिला सुरक्षेच्या प्रश्नावर प्रशासनासोबत विरोधकही उदासीन असल्याचा आरोप त्यांनी केला. महिलांसाठी सुरक्षित व सुसज्ज सार्वजनिक शौचालये आणि मुलांसाठी क्रीडांगणे विकसित करण्याचे प्रस्ताव विरोधकांनी जाणीवपूर्वक फेटाळून लावले. गेल्या ४ वर्षांच्या प्रशासकीय राजवटीत कागदोपत्री कोट्यवधींचा निधी मंजूर करून खर्च दाखवण्यात आला, मात्र विरोधकांनी प्रत्येक विकासकामात अडथळे आणल्याने प्रत्यक्षात जमिनीवर एकही काम दिसत नाही. याहून गंभीर बाब म्हणजे प्रशासनातील काही जबाबदार अधिकारी विरोधकांशी हातमिळवणी करून सत्ताधारी पक्षाची कोंडी करण्याचे षडयंत्र रचत आहेत, असा खळबळजनक आरोपही नगराध्यक्षांनी केला.

लवकरच सर्वपक्षीय जागरूक नागरिक, महिला व युवकांना सोबत घेऊन आंदोलन छेडले जाईल, असा स्पष्ट इशारा नगराध्यक्षा भावना घाणेकर यांनी आपल्या तीव्र भावना पत्रकारांसमोर व्यक्त केल्या. या पत्रकार परिषदेला नगरसेवक, विविध क्षेत्रातील मान्यवर आणि प्रिंट, इलेक्ट्रॉनिक व डिजिटल मीडियाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## नथुराम भोईर यांचे निधन

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

वासांबे- मोहोपाडा ग्रामपंचायतीचे माजी सरपंच, रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य आणि ज्येष्ठ शिवसैनिक नथुराम भोईर यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने शिवसैनिकांमध्ये शोककळा पसरली आहे.



नथुराम भोईर यांनी आपल्या प्रदीर्घ राजकीय आणि सामाजिक कारकीर्दीत मोठी छाप पाडली. सर्वप्रथम ते वासांबे-मोहोपाडा ग्रामपंचायतीचे सदस्य म्हणून निवडून आले होते. त्यानंतर १९९३ साली निवडून आल्यावर ते सरपंचपदी विराजमान झाले. सलग दहा वर्षे त्यांनी ग्रामपंचायतीचे सरपंचपद यशस्वीरीत्या भूषविले. याच काळात त्यांच्या नेतृत्वाची चुणूक दिसल्याने १९९७ आणि २००२ साली त्यांनी रायगड जिल्हा परिषदेची निवडणूक लढवली आणि ते सलग दोन वेळा जि.प. सदस्य म्हणून विजयी झाले.

सरपंच आणि जिल्हा परिषद सदस्य या दोन्ही पदांवर कार्यरत असताना त्यांनी परिसरात अनेक उल्लेखनीय विकासकामे केली. प्रशासनावर त्यांचा नेहमीच मोठा वचक राहिला. परिसरातील नागरिक त्यांना अतिशय आदराने अण्णा म्हणून हाक मारत. त्यांच्या जाण्याने रसायनी परिसराने एक अभ्यासू लोकप्रतिनिधी आणि पक्षाने एक निष्ठावान ज्येष्ठ शिवसैनिक गमावला आहे, अशी भावना शिवसैनिकांकडून व्यक्त केली जात आहे.

## साईडपट्टी दुरुस्तीच्या कामाला मुहूर्त मिळेना!

**। रोहा । प्रतिनिधी ।**

रोहा काजूवाडीमार्गे ऊसर या मुख्य रस्त्याच्या साईडपट्टीचे काम गेली कित्येक वर्षे रखडले आहे. त्याचप्रमाणे जागोजागी खड्डे असल्याने या मार्गावरून प्रवास करणे जिकिरीचे जात आहे. अशा परस्थितीत रविवारी नेहमीप्रमाणे या मार्गावर प्रवास करणाऱ्या हजारो पर्यटक फटका बसला असून, सकाळपासून वाहतूक कोंडी निर्माण झाली. मुरुडकडे जाण्यासाठी जवळचा पर्यायी मार्ग पण साईडपट्टी नसलेला सिंगल तो देखील खड्डेमय रस्ता असल्याने या रस्त्याकडे स्थानिक लोप्रतिनिधींनी अक्षरशः कानाडोळा केल्याने नागरिकांत संतापाची लाट पसरली आहे.



रोहा-शिघ्रे मार्गे मुरुड व रोहा-मुरुड मार्गे अलिबाग या मुख्य मार्गांवरून हजारो पर्यटक सुट्टी साजरी करण्यासाठी जात असतात.

■ **शेकडो पर्यटकांना फटका**

■ **रोहा-उसर रस्त्याचे काम रखडले**

पर्यटनाच्यादृष्टीने महत्त्वाच्या ठिकाणी उन्हाळी सुट्टी साजरी करण्यासाठी पर्यटक व स्थानिक नागरिक उसरमार्गे मुरुड या जवळच्या मार्गाला पसंती देतात. रविवार असल्याने हजारो पर्यटकांनी मुरूड समुद्रकिनारी फिरण्याचा बेत आखला. मात्र, उसरमार्गे मुरूड व त्यानंतर अलिबाग येथे जात असताना वाहन चालकांना वाहतूक कोंडीचा फटका बसला. त्यानंतर अनेक गोष्टींचा सामना करावा लागला. उसर मार्गाच्या साईडपट्टीचे काम गेली कित्येक वर्षे रखडला आहे.

# ‘रासायनिक खतांचा वापर कमी करा’

## ● रोहा तालुकास्तरीय कृषी मेळाव्याला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**। चणेरा । प्रतिनिधी ।**

रासायनिक खतांचा वापर कमी करून शाश्वत, सेंद्रिय आणि नैसर्गिक शेतीकडे शेतकऱ्यांनी वळणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन अदिती तटकरे यांनी केले. पंचायत समिती रोहा आणि तालुका कृषी अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुकास्तरीय कृषी मेळाव्यात त्या बोलत होत्या.



जिल्ह्यात आयोजित करण्यात आलेल्या कृषी मेळाव्यांमध्ये रोहा तालुक्याचा मेळावा पहिल्या पाच उत्कृष्ट आयोजनांमध्ये असल्याचे सांगत त्यांनी कृषी विभागाच्या कार्याचे कौतुक केले. महिला शेतकऱ्यांसाठी महिला व बालविकास विभागामार्फत तीन टक्के निधी राखून ठेवण्यात आल्याचे सांगत रायगड जिल्ह्यातील महिला शेतकऱ्यांनीही विविध शासकीय योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी त्यांनी जिल्ह्यातील सफेद कांद्याला जीआय मानांकन मिळाल्याचा उल्लेख करत आता रिठा सुपारी आणि वाल पिकालाही जीआय मानांकन मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले. राज्य शासनाच्या वृक्षलागवड मोहिमेसाठी लागणारी झाडे स्थानिक शेतकऱ्यांकडूनच खरेदी करण्यात यावीत, त्यात फळझाडांचाही समावेश असावा, असे निर्देश त्यांनी कृषी विभागाला दिले. कार्यक्रमात प्रगतशील शेतकरी नितीन पिंपळे, भिकू सुटे, रोशन कापसे, अदिती थिटे, संज्योत पडवळ, किरण बारटक्के, अमित गायकवाड, मेघेश भगत, दगडू बामुगडे, दिपाली जाधव, शिवाजी मुटके आणि तुकाराम भगत यांचा अदिती तटकरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच बिजामृत शेतकरी उत्पादन कंपनी, ग्रोवेल शेतकरी उत्पादक संस्था, विवेकानंद रिसर्च, युवा कृषी उद्योग, संथाय प्रकल्प आणि दीपक फाऊंडेशन यांचाही गौरव करण्यात आला.

यावेळी जि.प. उपाध्यक्ष मधुकर पाटील, कृषी सभापती वैकुंठ पाटील, सभापती उर्वशी वाडकर, निधी जाधव, सुमित काते, विजया पाशिलकर, उपसभापती संजय मांडलूस्कर, विनोद पाशिलकर, किसन मोरे यांच्यासह पंचायत समिती सदस्य, कृषी अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

# लालचुटूक लिचीचा बाजारात थाट



**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

कडाक्याच्या उन्हापासून दिलासा देण्यासाठी आणि जिभेचे चोचले पुरवण्यासाठी बाजारपेठेत विविध फळांची आवक सुरू झाली आहे. रसाळ आंबा आणि कलिंगडानंतर आता उन्हाळ्याचे खास आकर्षण असलेले लिची हे लालचटुक शाही फळ जिल्ह्यात दाखल झाले आहे. मात्र, सुरुवातीच्या काळात या फळाचे दर गगनाला भिडले असून, चारशे रुपये प्रतिकिलो या दराने लिचीची विक्री होत आहे.

दरवर्षी मे महिन्याच्या सुरुवातीला उत्तर भारतातून, विशेषतः बिहार आणि पश्चिम बंगालमधून लिचीची आवक होते. यंदा कडाक्याचे ऊन आणि बदलत्या हवामानाचा फटका लिची उत्पादनाला बसला आहे. परिणामी, बाजारपेठेत आवक कमी असल्याने

■ **रायगड जिल्ह्यात लिचीचे आगमन**

■ **चढ्या दरामुळे सामान्यांची पाठ**

लिचीचे भाव वधारलेले आहेत. सध्या स्थानिक बाजारपेठांमध्ये किरकोळ विक्रेते ४०० रुपयांच्या घरात विक्री करत असल्याने हे फळ सर्वसामान्यांच्या खिशाला परवडणारे नाही. लिचीमध्ये पाण्याचे प्रमाण जास्त असल्याने आणि व्हिटॅमिन सीमुळे उन्हाळ्यात या फळाला मोठी मागणी असते. रसाळ आणि गोड चवीमुळे बच्चेकंपनीसह मोठी माणसेही यावर ताव मारतात. मात्र, सध्याचे दर पाहता अनेक ग्राहक अर्धा किलो किंवा पाव किलोवरच समाधान मानत आहेत. येत्या काही दिवसांत आवक वाढल्यानंतर हे दर कमी होतील, अशी शक्यता विक्रेत्यांनी वर्तवली आहे.

## द्रोणागिरीत हिंदू संमेलन उत्साहात

**। उरण । प्रतिनिधी ।**

हिंदू धर्माविषयी जनजागृती व्हावी, हिंदू धर्मातील व्यक्ती, नागरिकांनी एकत्र यावे, हिंदू समाजाचे मजबूत संघटन उभे राहावे, या दृष्टीकोनातून तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेला १०० वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने संपूर्ण देशभर हिंदू संमेलनांचे आयोजन केले जात आहे. याच पार्श्वभूमीवर, सकल हिंदू समाज द्रोणागिरी उरण यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेले विराट हिंदू संमेलन प्रचंड जल्लोषात आणि उत्साहात पार पडले. हा भव्य सोहळा रविवारी (दि.१७) सायंकाळी ६ वाजता, सेक्टर ५०, द्रोणागिरी येथील देवकृपा सोसायटीसमोर पार पडला. या संमेलनाला द्रोणागिरी आणि उरण परिसरातील हिंदू समाज अत्यंत मोठ्या संख्येने उपस्थित होता.

कार्यक्रमाची सुरुवात प्रभू श्रीरामाच्या प्रतिमेच्या भव्य दिंडी सोहळ्याने झाली. या दिंडीसोबत सुरू असलेला हरिपाठ, अभंगांचे सूर आणि हातात घेतलेले भगवे झेंडे यामुळे संपूर्ण वातावरण भक्तीमय झाले होते. या दिंडीच्या माध्यमातून संपूर्ण द्रोणागिरीमध्ये एक अभूतपूर्व भगवे चैतन्य निर्माण झाले होते. दिंडी परतल्यानंतर व्यासपीठावर राम भक्तीपर गीतांवर सांस्कृतिक कार्यक्रम बालचमूंनी सादर केले. जय श्रीराम, गर्व से कहो हम हिंदू है, छ. शिवाजी महाराज की जय आणि छ. संभाजी महाराज की जय या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

## रस्त्याची दुरवस्था

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग-रेवंदडा रस्त्याचे रुंदीकरणासह काँक्रिटीकरणाचे काम सुरू आहे. गेल्या सहा महिन्यांपासून ही कामे सुरू आहेत. परंतु, सर्वच ठिकाणी रस्ते खोदून ठेवल्याने रस्त्याची दुरवस्था झाली आहे. पावसाळा तोंडावर आला असताना हाती घेतलेली कामेच आधी पूर्ण करण्याची मागणी जनतेतून जोर धरत आहे. परंतु, संबंधित विभागाकडून या मागणीकडे कानाडोळा करण्यात येत असल्याचा आरोप होत आहे.

दुर्गवेध परिवाराने शोधली दातारांची ऐतिहासिक विहीर | तीन महिन्यांच्या शोधमोहिमेला यश

# सरसगडाच्या कुशीत दडलेला इतिहास पुन्हा उजेडात

**। पाली/गोमाशी । भूषण सुतार ।**

पालीजवळील किल्ले सरसगडाच्या कुशीत लपलेला इतिहासाचा आणखी एक महत्त्वाचा ठेवा अखेर प्रकाशात आला आहे. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी आपल्या संशोधनात उल्लेख केलेली दातार यांच्या विहारीवरील शिलालेख असलेली ऐतिहासिक विहीर दुर्गवेध परिवाराने तब्बल तीन महिन्यांच्या शोधमोहिमेनंतर शोधून काढली. झाडीझुडपांनी गिळंकृत झालेल्या या वास्तूला स्वच्छ



करून पुन्हा इतिहासप्रेमींसाठी खुले करण्यात आले आहे.

किल्ले सरसगड परिसरात इतिहासाच्या अनेक खुणा आजही संवर्धनाच्या प्रतीक्षेत आहेत. याच पार्श्वभूमीवर दुर्गवेध परिवाराने सरसगड परिसरात विशेष शोधमोहीम हाती घेतली होती. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी वाचन केलेल्या दातार यांच्या विहारीवरील शिलालेखाचा उल्लेख संशोधन निबंधात आढळत असला, तरी त्या विहिरीचे अचूक स्थान काळाच्या ओघात विस्मरणात गेले होते. गेल्या तीन महिन्यांपासून सुरू असलेल्या मोहिमेदरम्यान शिलालेखातील स्थानिक उल्लेख, भौगोलिक संदर्भ आणि स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीच्या आधारे अखेर ही ऐतिहासिक विहीर शोधण्यात यश आले. मोहिमेदरम्यान दुर्गवेध परिवाराने परिसरातील अडगळ दूर करून विहीर पुन्हा इतिहासप्रेमींसाठी खुली केली. मात्र, दुर्दैवाने ज्या भागावर शिलालेख कोरलेला होता तो भाग विहिरीत कोसळल्याने मूळ शिलालेख अद्याप हाती लागलेला नाही. याच मोहिमेत विहिरीच्या पश्चिमेला असलेल्या श्री थाडेश्वर गोसावी मठ परिसरातील १४ ऐतिहासिक समाध्यांचाही परिसर स्वच्छ करण्यात आला. तसेच त्या समाध्यांची नोंद व माहिती संकलनाचे कामही करण्यात आले. या शोधामुळे किल्ले सरसगडच्या इतिहासात आणखी एक महत्त्वपूर्ण अध्याय समोर आल्याची माहिती दुर्गवेध परिवाराचे संस्थापक नितेश देसाईयांनी दिली. तसेच परिसरातील आणखी दोन शिलालेखांचे वाचन सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले. या मोहिमेत दुर्गवेध परिवारासोबत शिवसेवक प्रतिष्ठान आणि स्वराज्याचे शिलेदार यांनीही सहभाग नोंदवला.

> “सरसगड परिसरातील इतिहासाच्या खुणा जतन करण्यासाठी दुर्गवेध परिवार सातत्याने कार्यरत आहे. दातारांची ऐतिहासिक विहीर आणि समाधी परिसर उजेडात आल्याने सरसगडच्या इतिहासात आणखी महत्त्वाची भर पडली आहे. भविष्यातही अशाच दुर्लक्षित ऐतिहासिक वास्तू शोधून त्यांचे संवर्धन करण्याचा आमचा प्रयत्न राहील.
> – नितेश देसाई”

## निवडक

### आंबेगणी घाटातील प्रवास जीवघेणा



**महाड** : रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांतून जाणाऱ्या महाड-मंडणगड तालुक्यातील तुडील फाटा ते आदिस्ते फाटा या आंबेगणी घाटातील प्रवास सध्या प्रवाशांसाठी अत्यंत त्रासदायक व जीवघेणा ठरत आहे. घाटातील कमालीचा अरुंद रस्ता, टप्प्या-टप्प्यावरील तीव्र वळणे आणि संरक्षण भिंतच नसल्यामुळे येथे रोजच अपघातांची मालिका सुरू आहे. विशेषतः या धोकादायक वळणांवरून एसटी बस नेताना चालकांची मोठी दम छाक होऊन चालकाला तारेवरची कसरत करावी लागते. प्रवाशांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण आहे. वारंवार मागणी करूनही प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याने, अखेर कुडूक खुर्द (हनुमानवाडी) येथील ग्रामस्थांनी मंत्री भरत गोगावले यांची भेट घेऊन तातडीने निधी मंजूर करण्याची मागणी केली आहे. पंतप्रधान मंत्री ग्राम सडक योजनेच्या धर्तीवर या रस्त्याचे रुंदीकरण करावे आणि मजबूत संरक्षण भिंत उभारावी, असे साकडे ग्रामस्थांनी निवेदनाद्वारे मंत्री महोदयांना घातले आहे. त्यांनी दिलेल्या आश्वासनानंतर आता शासन यावर काय पावले उचलते, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे. अनेक दुर्घटना होऊनदेखील या विषयाकडे प्रशासन गांभीर्याने पाहात नाही, याबाबत खंत व्यक्त करण्यात येत आहे.



### अखिल भारतीय बंदर व गोदी कामगार महासंघाची बैठक उत्साहात

**उरण** : देशातील प्रमुख ११ बंदरात काम करणाऱ्या अखिल भारतीय बंदर व गोदी कामगार महासंघाची बैठक नागाव उरण मध्ये संपन्न झाली. बैठक नाव्हा शेवा बंदर कामगार संघटना (अंतर्गत) तर्फे आयोजित करण्यात आली होती. या बैठकीमध्ये देशातील प्रमुख बंदरात काम करणाऱ्या कायम स्वरूपी व कंत्राटी कामगारांच्या मागण्यांबाबतीत सविस्तर चर्चा होऊन पुढील कार्यक्रम ठरविण्यात आले. जेएनपीटी (जेएनपीए )मधील सिंगापूर पोर्ट, गुजरातमधील अदानीचे मुंद्रा पोर्ट येथे कामगारांचे मोठ्या प्रमाणात शोषण होत आहे, याविरोधात आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला. देशातील पोर्ट व डॉक कामगारांचा चालू वेतन करार ३१ डिसेंबर २०२६ रोजी संपणार आहे.१ जानेवारी २०२७ ते ३१ डिसेंबर २०३१ या ५ वर्षाच्या नवीन वेतन करारासाठी मागणी पत्रक बनविण्यात येणार आहे. कायम स्वरूपी कामगारांना तसेच कंत्राटी कामगारांना पगार वाढीसाठी कामगार महासंघ प्रयत्न करणार आहे, अशी माहिती महासंघाचे सचिव कॉ. भूषण पाटील यांनी दिली. या बैठकीला कामगार नेते माजी खासदार कॉ. तपन सेन व सिटू राष्ट्रीय सचिव कॉ. करुमालायन यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. या बैठकीसाठी जेनपिटी अंतर्गत युनियन कार्याध्यक्ष गणेश घरत, अध्यक्ष दिनेश घरत, सचिव राजेश घरत व नंदू म्हात्रे यांनी मेहनत घेतली.



### नेत्र तपासणी, आरोग्य शिबीर उत्साहात

**उरण** : तालुक्यातील मोरा येथील मोरा मत्स्यव्यवसायिक विविध कार्यकारी सहकारी सोसायटी मर्यादित यांच्यावतीने मोफत नेत्र तपासणी व आरोग्य शिबिराचे रविवार, दि. १७ मे रोजी आयोजित करण्यात आले होते. या शिबिरास माजी आमदार मनोहर भोईर, नगराध्यक्षा भावना घाणेकर, माजी नगराध्यक्ष गणेश शिंदे, उरण शहर संपर्कप्रमुख गणेश म्हात्रे, गटनेते व नगरसेवक अतुल ठाकूर, नगरसेविका नायदा ठाकूर, नगरसेविका वंदना पवार, उपशहरप्रमुख कैलास पाटील, डॉ. नयना ठाकूर, विविध आजाराचे तज्ज्ञ डॉक्टर, वैद्यकीय स्टाफ व मान्यवर पदाधिकाऱ्यांची शिबिरास उपस्थिती लाभली होती. न्यू इंग्लिश स्कूल मोरा कोळीवाडा, उरण येथे आयोजित केलेल्या आरोग्य शिबिराचे उद्घाटन संस्थेचे सचिव नारायण पांडुरंग कोळी यांच्या हस्ते करण्यात आले. शुश्रुषा सुपर स्पेशालिस्ट हॉस्पिटल, पनवेल, मॅक्स विजन सुपर स्पेशलिस्ट आय हॉस्पिटल, द्रोणागिरी व श्री पॅथॉलॉजी लॅबोरेटरी, उरण यांच्या सहकार्याने आयोजित केलेला या शिबिरात ईसीजी तपासणी, रक्ताच्या विविध चाचण्या तपासणी, नेत्र तपासणी, शुगर व बीपी तपासणी करण्यात आली. या शिबिरास मोरा विभागातील नागरिकांनी उत्तम प्रतिसाद दिला. शिबीर यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष राकेश कोळी, उपाध्यक्ष कल्पना मोरेकर, सचिव नारायण कोळी आदींनी मेहनत घेतली.



### ज्येष्ठांना एसटी स्मार्ट कार्डचे वितरण

**मुंबई** : सानपाडा येथील ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने नुकतेच सुमारे २५० ज्येष्ठ नागरिकांना एसटी महामंडळाचे एनसीएमसी स्मार्ट कार्डचे वितरण प्रभाग क्रमांक १९ चे नगरसेवक सुनिल कुरकुटे यांच्या हस्ते करण्यात आले. ज्येष्ठ नागरिकांच्या सोयीसाठी आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला ज्येष्ठ नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ज्येष्ठ नागरिक संघ व भारत ई सेवा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने १८ मार्च रोजी संघाच्या कार्यालयात एसटी स्मार्ट कार्ड नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात सुमारे १५० ज्येष्ठ नागरिकांनी स्मार्ट कार्डसाठी नोंदणी केली होती. त्यानंतर या कार्डांचे वितरण मंगळवारी (दि.५) करण्यात आले. तसेच नगरसेवक सुनिल कुरकुटे यांच्या वाढदिवसानिमित्त १९ एप्रिल २०२६ रोजी आयोजित वैद्यकीय शिबिर, एसटी स्मार्ट कार्ड नोंदणी व शासकीय दाखले वाटप कार्यक्रमात आणखी १०० ज्येष्ठ नागरिकांनी नोंदणी केली होती. त्या कार्डांचे वितरण गुरुवारी (दि.१४) ज्येष्ठ नागरिक संघाच्या कार्यालयात करण्यात आले. एनसीएमसी स्मार्ट कार्डमुळे ज्येष्ठ नागरिकांना एसटी बस, मेट्रो व इतर सार्वजनिक वाहतुकीसाठी एकाच कार्डाचा वापर करता येणार असून प्रवास अधिक सुलभ होणार आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या आगारामध्ये जाऊन रांगेत उभे राहण्याची गरज न पडता सानपाडा परिसरातच ज्येष्ठ नागरिकांना ही सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल उपस्थित ज्येष्ठ नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

## निवडक

### टोलवसुलीला रायगड प्रेस क्लबचा विरोध




**धाटाव :** मुंबई गोवा हा कोकणात जाणारा महामार्ग चार पदरी सुसज्ज रस्ता व्हावा यासाठी रायगड प्रेस क्लबच्या माध्यमातून गेले १७ वर्ष अनेक आंदोलने केली होती. हा रस्त्याचा प्रश्नमार्गी लावण्यासाठी सातत्याने लढा दिला. सध्या परिस्थितीत रस्त्याचे काम बऱ्यापैकी झालेले असले, तरी अजून तरी हा महामार्ग पूर्णत्वास आलेला नसताना अनेक ठिकाणी कामे सुरू आहेत. तसेच अधिकृत उद्घाटन झालेले नसताना या मार्गावर भारतीय राष्ट्रीय राज्य प्राधिकरण विभागाने टोल वसुली सुरू केली आहे. ही टोल वसुली तात्काळ बंद करावी या मागणीसाठी रायगड प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत गोपाळे यांच्या नेतृत्वाखाली येथील पनवेल कार्यालयात निवेदन देण्यात आले आहे. यावेळी विजय मोकल, अनिल भोळे, भारत गोरेगावकर, रवींद्र मोरे, दिनेश सुतार, प्रशांत शेडगे अन्य पदाधिकारी उपस्थित होते. ही टोल वसुली तात्काळ थाबवावी अन्यथा रायगड प्रेस क्लब टोल नाक्यावर आंदोलन करेल असा इशारा देण्यात आला आहे.




### दगडी शाळांना आकर्षक रंगसंगती

**नेरळ :** नेरळ गावात असलेली रायगड जिल्हा परिषदेची शाळा दगडी शाळा या नावाने प्रसिद्ध आहे. या शाळेला नव्याने सुशोभित करण्यात येत असून शिक्षण विभागाने या ठिकाणी येणारे विद्यार्थ्यांना आकर्षित करण्यासाठी शाळेच्या भिंती पक्षी प्राणी आणि फळाफुलांच्या रंगांनी सजवलेल्या आहेत. नेरळ गावात दगडी बांधकाम केलेली शाळा असून १०० वर्षे जुन्या असलेल्या या शाळेला नाव देखील तेथील दगडी बांधकामामुळे दगडी शाळा असेच पडले आहे. या शाळेची इमारत २०१७, २०१८ मध्ये वाहनतळ बनविण्यासाठी तोडण्यात येणार होती. त्यावेळी तेथे पार्किंग करण्यास स्थानिकांनी विरोध केल्यानंतर रायगड जिल्हा परिषदेचा डाव उधळवून लावला गेला होता. एक दुमजली आणि एक शंभर वर्षे जुनी अशा दोन इमारती असलेल्या शाळेत जिल्हा परिषदेची उर्दू माध्यमाची शाळा भरवली जात आहे. या इमारतीचे नूतनीकरण करून अद्ययावत अशा वर्गखोल्या तयार झाल्या आहेत. शाळेच्या परिसरात एक अंगणवाडी देखील भारावली जात आहे. मात्र, नवीन कामांमुळे दगडी शाळा नव्या स्वरूपात सजली जात आहे. शाळेच्या भिंतींवर आकर्षक अशी रंगसंगती करण्यात आली आहे. त्यामुळे शाळेत येणारे विद्यार्थी यांना शाळेची आवड निर्माण होईल अशी अपेक्षा आहे.



### उरण तालुक्यात जीवामृताचे प्रात्यक्षिक

**चिरनेर :** उरण तालुक्यात कृषी विभागाच्या वतीने खरीप हंगामाच्या बैठकीतून आढावा घेतला जात आहे. पावसाळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. त्यामुळे भातबियाणांसह इतर पिकांच्या उत्पादनावर शेतकऱ्यांकडून भर दिला जात आहे. तसेच महाबीजासह इतर खासगी कंपनीकडून बियाणे व खते उपलब्ध होणार आहेत. दरम्यान, उरण तालुका कृषी विभागामार्फत कृषी अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यात गावोगावी दशपर्णी अर्क, गोकृपा अमृत, जीवामृत असे पिकांची रोग प्रतिकार शक्ती वाढविण्यासाठी तसेच जमिनीची सुपीकता टिकवून ठेवण्यासाठी चिरनेर येथील श्री महागणपती शेतकरी गटातर्फे दशपर्णी अर्क तयार करण्यात आला आहे. कृषी सहाय्यक अधिकारी सुषमा गायकवाड कृषीमित्र प्रफुल्ल खारपाटील यांच्या मार्गदर्शनाखाली रविवारी (दि.१७) दशपर्णी अर्क तयार करण्याची प्रात्यक्षिके दाखविण्यात आली. यामध्ये कडुलिंबाची पाने, करजाची पाने, निरगुडीची पाने, घाणेरीची पाने, सिताफळीची पाने, रुईची पाने, पपईची पाने, मोमरी एरंडाची पाने, लाल कन्हेरीची पाने, गुळवेल, धोतरा शेण, गोमूत्र या सर्व मिश्रणातून दशपर्णी अर्क तयार करण्यात आला आहे. या दशपर्णी अर्कामुळे कीड व रोग नियंत्रणास मदत होईल. मातीची सुपीकता वाढली जाते. पिकांची वाढ व उत्पादन वाढते. नैसर्गिक व पर्यावरण पूरक, शाश्वत शेतीसाठी उपयुक्त असे हे अर्क असल्यामुळे शेतकऱ्यांनी त्याचा मोठ्या प्रमाणात वापर करावा. असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे.

## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **नागाव मधील हॉटेलमध्ये काम** करण्यासाठी स्टाफ ची आवश्यकता आहे. रिसेप्शनिस्ट, हाऊसकीपर, रेस्टॉरंट कॅप्टन, किचन हेल्पर, ब्रेकफास्ट कुक, मेंटेनंस बॉय इच्छुक उमेदवारांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल - ७५५९१८४६१२
- **फर्निचर शोरूममध्ये सेल्स गर्ल/बॉय पाहिजे.** ठिकाण : झिराड, पात्रता- MBA अनुभव- ३-४ वर्षे सेल्सचा अनुभव, पगार-२५००० महिना + इन्सेटिव्ह. Contact- 9823585321
- **मांडवा जेट्टीजवळ लुमा रिसॉर्टमध्ये अकाऊंटट पाहिजेत.** शिक्षण- ग्रॅज्युएशन, संगणक नॉलेज, टॅली, एक्सेल. मो. ९१४६३८३२५२
- **आवश्यक : सहाय्यक कर्मचारी** खाजगी बंगल्याच्या साफसफाईसाठी आणि देखभालीसाठी जबाबदारी आणि विश्वासू व्यक्तींची आवश्यकता आहे. दैनंदिन घरकाम, सामान्य देखभाल आणि पाहुण्यांच्या व्यवस्थेत मदत करणे या कर्तव्यांमध्ये समाविष्ट आहे. पूर्णवेळ/राहणे पसंत. पूर्वीचा अनुभव इष्ट. स्थान : नागाव, संपर्क : ९८२०४१४८११ बैठकीची तारीख २० मे २०२६, सकाळी ११ वाजल्यापासून सुरू.
- **अलिबागमधील कार्यालयासाठी कर्मचारी** आवश्यक आहेत. पदवीधर मुलाखतीसाठी येऊ शकतात.संपर्क: ९९२३७५०५४९ वेळ: सकाळी ११ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# माथेरानकरांना मिळणार मुबलक पाणी

## ■ दीर्घकालीन उपाययोजनांसाठी प्रयत्न सुरु ■ उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याच्या समस्या

**। नेरळ / माथेरान । प्रतिनिधी ।**

माथेरान या थंड हवेच्या ठिकाणी पर्यटक उन्हाळ्यात गर्दी करत असतात. दरवर्षी माथेरानमध्ये उन्हळ्यात पिण्याच्या पाण्याच्या समस्येला सामोरे जावे लागत असते. तसे यावर्षी देखील पाण्याच्या गहन समस्येला स्थानिकांना सामोरे जावे लागल्याने जीवन प्राधिकरण बाबतीत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. सातत्याने कमी दाबाने पाणीपुरवठा तसेच अन्य समस्या यांच्या अडचणी निर्माण होत असल्याने पाण्याचा पुरवठा नियमितपणे होत नव्हता.

यावर्षी कडक उन्हाला असल्याने पाण्याचा वापर देखील



अधिक प्रमाणात करावा लागत आहे. त्यामुळे पर्यटन हंगामात पाण्याचा तुटवडा भासू नये यासाठी नागरपरिषद आग्रही आहे. माथेरान पालिकेचे नगराध्यक्ष आपली सर्व

> **“कुंभे, जुंमा पट्टी आणि वॉटर पाईप येथील पंपिंग हाऊस वर जीवन प्राधिकरण मार्फत एक एक पंप आणून ठेवला आहे. यदाकदाचित एखादा पंप बिघडल्यास दुसऱ्या पंप द्वारे पाण्याचा पुरवठा केला जाऊ शकतो. त्यामुळे नागरिकांना पाण्याची समस्या उद्भवणार नाही. पर्यटन हंगाम हे केवळ लक्ष्य नाहीतर पुढील काळात अखंडित पाण्याचा पुरवठा व्हावा यासाठी आमचे पर्यटन सुरु राहतील. –चंद्रकांत चौधरी,** नगराध्यक्ष माथेरान”

कामे सोडून शहरात पिण्याचे पाणी व्यवस्थित आणि मुबलक यावे यासाठी प्रयत्न करीत आहेत. त्याचवेळी माथेरानकरांचा पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी संपुष्टात येण्यासाठी ठोस उपाययोजना आवश्यक आहेत त्या सर्व उपाययोजना दीर्घकाळ असाव्यात यासाठी प्रयत्न सुरु आहेत.

कधी जुंमापट्टी येथील पंपिंग बंद असायची तर कधी वॉटर पाईप येथील पंपिंग हाऊसमध्ये तांत्रिक बाबी निर्माण व्हायच्या. त्यामुळे येथील शारलोट तलावातील पाण्याचा उपसा करण्यात आला होता. परिणामी शारलोट तलावाची पाण्याची पातळी कमी झाली असून या तलावात अगोदरच दहा ते पंधरा फूट मातीचा गाळ साचलेला आहे. पावसाळ्यात नेरळ येथून होणारी पाण्याची पंपिंग बंद असते तरीसुद्धा बिल भरमसाठ आकारले जात असल्याचे ग्राहक बोलत आहेत. सद्यस्थितीत शहरात असलेले पर्यटक यांना पिण्याच्या पाण्याची कुठेही गैरसोय निर्माण होऊ नये यासाठी नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी लक्ष ठेवून आहेत.

नगराध्यक्ष चौधरी यांनी स्वतः अनेकदा या तीनही पंपिंग हाऊसवर भेटी देऊन पाहणी करून संबंधित अधिकारी वर्गाला कर्मचाऱ्यांना तांत्रिक बाबी दूर करण्यासाठी सूचित केले होते. त्यामुळे काही काळ पाण्याची समस्या काहीशा प्रमाणात दूर झाली होती. परंतु, कुंभे याठिकाणी जवळपास सहा फूट खोलवर पाण्याचा पाईप फुटला होता त्यामुळे पाणी माथेरानला येऊ शकले नाही.

याकामी पुन्हा एकदा नगराध्यक्ष चौधरी आणि कार्यक्षम मुख्याधिकारी राहुल इंगळे यांनी कुंभे येथे जाऊन माहिती घेतली असता पाईप लाईन फुटलेली होती ती ताबडतोब दुरुस्त करून घेण्यात आली आहे. त्यामुळे यापुढे माथेरानकरांना मुबलक पाणी मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तर हा पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी संपुष्टात आणण्यासाठी पर्यायी व्यवस्था उपलब्ध करावी अशी मागणी स्थानिक लोक करीत आहेत.

# भारतीयत्वाचे सत्व फक्त हिंदुत्व

## ■ शरद पोंक्षे यांचे पेणमध्ये परखड मार्गदर्शन

**। पेण । प्रतिनिधी ।**

सकल हिंदू समाज बाजारपेठ समिती पेण यांच्या वतीने भारतीयत्वाचे सत्व फक्त हिंदुत्व या विषयावर आयोजित मार्गदर्शन कार्यक्रमाला पेण शहरातील हिंदू बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. या कार्यक्रमासाठी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या विचारांचे अभ्यासक, समाजप्रबोधक आणि ज्येष्ठ अभिनेते शरद पोंक्षे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन करून भारतमातेच्या तसबिरीसह गणपती बाप्पा आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मुर्तीचे पूजन करून करण्यात आले कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुनील पाटील यांनी केले, तसेच अनुराधा ओंगळे यांनी देखील मार्गदर्शन केले. तर संपूर्ण सूत्रसंचालन प्रा. अथर्व घाटे यांनी केले.

यावेळी मार्गदर्शन करताना शरद पोंक्षे म्हणाले की, रामायण आणि




महाभारताच्या काळातील लढाया या धर्माविरुद्ध अधर्माच्या होत्या. त्या काळात जातीव्यवस्था नव्हती, तर वर्णव्यवस्था अस्तित्वात होती. आजच्या काळातदेखील संघर्ष हा धर्माविरुद्ध नसून अधर्माविरुद्धच असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दुर्दैवाने अधर्माच्या प्रवृत्तींमध्ये मोठ्या प्रमाणावर काही समाजघटक सहभागी असल्याचे चित्र दिसत असल्याने त्याविरोधात लढावे लागत असल्याचे त्यांनी नमूद केले.

हिंदू म्हणजे हीन आणि वाईट गोष्टी दूर ठेवणारा असा तो हिंदू अशी हिंदुत्वाची व्याख्या करताना त्यांनी माजी राष्ट्रपती ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे उदाहरण दिले. जन्माने मुसलमान असले तरी त्यांनी वाईट गोष्टी दूर ठेवल्या होत्या, म्हणून ते खऱ्या अर्थाने हिंदू होते, असे वक्तव्य त्यांनी केले.

वर्णव्यवस्थेवर भाष्य करताना पोंक्षे म्हणाले की, पूर्वी गुरुकुल पद्धतीमध्ये प्रत्येकाला आपल्या आवडीनुसार वर्ण स्वीकारण्याची मुभा होती. व्यक्तीच्या कामावरून वर्ण ठरत असे. मात्र, कालांतराने जातीव्यवस्थेने समाजव्यवस्थेचे मोठे नुकसान केले असल्याचे त्यांनी सांगितले.

दहीहंडी उत्सवावर भाष्य करताना त्यांनी सांगितले की, भगवान श्रीकृष्ण फक्त आठ वर्ष गोकुळात राहिले आणि त्या काळात एक-दोन थर लावून दही-दुधाच्या चोऱ्या होत असत. मात्र, आज दहीहंडी उत्सवाला मोठ्या इव्हेंटचे स्वरूप देण्यात आले असून व्यासपीठावर महिलांचे नृत्य सादर केले जाते, ही हिंदू संस्कृती नसल्याची टीका त्यांनी केली.

हिंदू संस्कृती महान आहे आणि ती महानच राहणार आहे. हिंदू संस्कृती जपणे ही काळाची गरज आहे. जर हिंदू संस्कृती जपली नाही, तर राष्ट्र टिकणार नाही, असे मत व्यक्त करत त्यांनी उपस्थितांना हिंदू संस्कृती संवर्धनाचे आवाहन केले. कार्यक्रमाची सांगता वंदे मातरम गीताने करण्यात आली.

## लोभेवाडीत गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील पाथरज ग्रामपंचायत हद्दीतील लोभेवाडी गावातील तरुणांनी स्तुत्य उपक्रम राबवत असतात. यावर्षी लोभेवाडी, नालधेवाडी गावातील सन २०२५-२६ शैक्षणिक वर्षात १०वी, १२ वी एकूण २२ विद्यार्थी परिक्षेला बसले होते. त्यापैकी सर्वच विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यावर्षी सुद्धा गावाचा १०० टक्के निकाल लागला आहे. यावेळी विद्यार्थांचा गुलाब पुष्प, पेन देऊन कर्जत कविता पादीर, तसेच ग्रामस्थ यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावर्षी १०वी, १२ वी उत्तीर्ण झालेल्याची संख्या २२ होती. त्यात १२ वी सायन्स ३ विद्यार्थी, कॉमर्स ४ विद्यार्थी, आर्टस ४ विद्यार्थी, एकूण ११ विद्यार्थी तर १० वीत ११ विद्यार्थी एकूण २२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. १२ वी सायन्स विनेश पादीर. ५४.९५ टक्के, विपुल पादीर ४९.५० टक्के, राहुल लोभी ४७.७० टक्के, कॉर्मस उन्नती लोभी ७८ टक्के, अक्षदा लोभी. ७३.१७ टक्के, दिपक लोभी.५२.८३ टक्के, कुणाल पादीर. ५१.८३ टक्के, आर्टस विभाग प्रथम साहील लोभी.५२.७० टक्के, स्नेहल पादीर. ५१ टक्के, रोशन पारधी ४७.७० टक्के, विवेक पारधी. ४७.४० टक्के. १० वी कल्पेश पिंगळा. ७०.६० टक्के, कावेरी पिंगळा. ७०.४० टक्के, वितेश कांबडी ६४.२० टक्के,



समिक्षा लोभी ६२.०० टक्के, ऋतुजा पादीर. ४९.४० टक्के, विनायक थोराड. ४७.६० टक्के, रिया लोभी ४०.६० टक्के, श्रद्धा केवारी ३७.२० टक्के, मेघा पादीर ३६.२० टक्के, योगेश्वरी लोभी ४१.०० टक्के, विद्या पादीर.४६.२० टक्के हे सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

## झाडाच्या फांद्या ठरताहेत धोकादायक

**। उरण । प्रतिनिधी ।**



महावितरण कंपनीकडून मान्सूनपूर्व कामे करताना दरवर्षी धोकादायक झाडांची छाटणी करण्यात येते. मात्र, छाटणी करण्यात येत असलेल्या झाडांच्या फांद्या या ठिक ठिकाणी झाडांवर लोंबकळत ठेवण्यात येत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे वादळी वाऱ्यासह येणाऱ्या पावसात छाटणी करण्यात येत असलेल्या झाडांच्या फांद्या या नागरिकांच्या अंगावर पडून दुर्घटना घटण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी महावितरण कंपनीच्या माध्यमातून लाखो रुपये खर्च करून छाटणी करण्यात आलेल्या झाडांच्या फांद्या जिवघेण्या ठरु शकतात अशी भिती नागरिक व्यक्त करत आहेत.

काही वर्षांपासून उरण तालुक्यातील काही ठिकाणच्या वृक्ष छाटणीच्या कामांना विलंब झाल्याने अनेक झाडे कोसळण्याच्या घटना घडल्या होत्या. या दुर्घटनांमध्ये सुदैवाने जीवितहानी झाली नसली तरी वारंवार झाडे कोसळून नुकसान झाले आहे. यंदाही याची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी जून महिना सुरू होण्याआधी तालुक्यातील धोकादायक आणि मोठ्या झाडांच्या छाटणीची कामे तातडीने मार्गी लावावीत, अशी सामाजिक संघटनांकडून केली आहे. त्या अनुषंगाने महावितरण कंपनीच्या माध्यमातून लाखो रुपये खर्च करून तालुक्यातील अनेक ठिकाणच्या धोकादायक ठरू पाहणाऱ्या झाडांच्या फांद्या तोडून टाकण्याच्या कामांना जून महिन्याच्या अगोदरच सुरुवात झाली आहे.

मात्र, छाटणी करण्यात येत असलेल्या झाडांच्या फांद्या या ठिक ठिकाणी झाडांवर लोंबकळत ठेवण्यात येत असल्याचे दिसून येत आहे.त्यामुळे वादळी वाऱ्यासह येणाऱ्या पावसात छाटणी करण्यात येत असलेल्या झाडांच्या फांद्या या नागरिकांच्या अंगावर पडून दुर्घटना घटण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी महावितरण कंपनीच्या माध्यमातून लाखो रुपये खर्च करून छाटणी करण्यात आलेल्या झाडांच्या फांद्या या जिवघेण्या ठरु शकतात अशी भिती नागरिक व्यक्त करत आहेत.

## हरिश्चंद्र म्हात्रेंना जीवन गौरव पुरस्कार

**। उरण । प्रतिनिधी ।**

पाले गावातील हरिश्चंद्र म्हात्रे हे गेली अनेक वर्षे सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहेत. यामध्ये सफाई अभियान, गडकिल्ले सफाई, वृक्षलागवड करत आहेत. त्यांचाच एक भाग म्हणून मधुबन कट्टा तसेच कोमसा उरणतर्फे त्यांना जिवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी प्रा. एल. बी. पाटील, रामचंद्र म्हात्रे, मच्छिंद्रनाथ म्हात्रे, संजय होळकर, रंजना केणी, समता ठाकूर, संजीव पाटील, अजय शिवकर, अनिल भोईर, नरेश पाटील, किशोर पाटील, भरत पाटील, हेमंत पाटील, दौलत पाटील, रमण पंडीत, शिवप्रसाद पंडीत, अनामिका राम, संजीवनी म्हात्रे, संतोष जोशी, प्रकाश म्हात्रे, निखिल म्हात्रे, श्रुती म्हात्रे, अरुण म्हात्रे, कामेश्वर म्हात्रे, अविनाश म्हात्रे, सई म्हात्रे उपस्थित होते.

## पालीत ‘समाधान शिबीर’ यशस्वी

### लाभार्थ्यांना १५ हून अधिक सेवांचा लाभ

**। सुधागड-पाली । प्रतिनिधी ।**

पाली नगरपंचायत क्षेत्रातील भक्तनिवास क्रमांक १ येथे छत्रपती ‘शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर’ टप्पा क्रमांक १ अंतर्गत विशेष शिबीराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात लाभार्थ्यांना १५ हून अधिक शासकीय सेवांचे लाभ वितरित करण्यात आले. कार्यक्रमास राजकीय व सामाजिक कार्यकर्ते, नागरिक, महिला, शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




सुधागड तालुक्यात यापूर्वी चार मंडळांमध्ये हे शिबीर पार पडले असून आजचे हे पाचवे व अंतिम विशेष शिबीर नगरपंचायत क्षेत्रासाठी आयोजित करण्यात आले होते.

शिबिरात महसूल, कृषी, भूमी अभिलेख, आरोग्य आणि महावितरण विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित राहून नागरिकांना सेवा पुरविण्यात आली. या शिबिराच्या यशस्वी आयोजनात तहसीलदार उत्तम कुंभार यांचे सूक्ष्म नियोजन आणि समन्वय महत्त्वपूर्ण ठरले. स्थानिक नागरिकांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला, ही बाब विशेष उल्लेखनीय ठरली होती.

कार्यक्रमास पराग मेहता, सुलतान बेनसेकर, आरिफ मणियार, निवासी नायब तहसीलदार भारत फुलपगारे, महसुल नायब तहसीलदार ज्ञानेश्वर आडसुळे, साजिद शेख, नकुल पोळेकर,नायब तहसीलदार, तालुका कृषी,अधिकारी सुधागड, सुखदेव वाढणकर पुरवठा निरीक्षण, रूपेश भादिकर जांभुळपाडा मंडळ अधिकार, अधिकारी, अंकुश साळवे मंडळ अधिकारी पेडली, गणेश साळुंखे मंडळ अधिकारी नांदगाव, यांच्यासह ग्राम महसूल अधिकारी, भूमी अभिलेख कर्मचारी, कर्मचारी उपस्थित होते.

## कुंडेवहाळ्यात ‘माझा कचरा माझी जबाबदारी’चे आयोजन

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

ग्रुप ग्रामपंचायत कुंडेवहाळ येथे माझा कचरा माझी जबाबदारी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. नो हाऊ फाऊंडेशन (इनोरा) यांच्या तंत्रज्ञानातून व अदानी फाऊंडेशनच्या आर्थिक सहाय्याने राबविण्यात येणाऱ्या कंपोस्टर प्लांटर प्रकल्पांतर्गत लाभार्थ्यांचा कौतुक सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून मराठी चित्रपटसृष्टीतील सुप्रसिद्ध अभिनेत्री अलका कुबल उपस्थित होत्या. यावेळी त्यांनी ग्रामपंचायत अधिकारी व ग्रामस्थांना माझा कचरा माझी जबाबदारी या विषयावर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास रायगड जिल्हा परिषद, अलिबाग येथील ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालिका प्रियदर्शनी मोरे, रंजना वासकर, मनीषा पाटील, सुबोध सिंग, मंजुश्री तडवळकर व आभा तडवळकर, नो हाऊ फाऊंडेशनचे कार्यकारी विश्वस्त, कुंडेवहाळ ग्रामपंचायतचे सदाशिव वास्कर, विजय भालेकर, इनोरा पदाधिकारी रविंद्र जाधव, आदित्य जोशी, संतोष ठोंबरे, रुपेश गायकवाड कुंडेवहाळचे ग्रामस्थ व पनवेल तालुक्यातील ग्रामविकास अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पाणी भरून येण्या-जाण्याचा मार्ग बंद | ग्रामस्थांकडून दोन बोटींची मागणी

# जासईत नालेसफाईकडे प्रशासनाचे दुर्लक्ष

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील नॅशनल हायवे प्रशासनाला वारंवार पत्र व्यवहार करून पावसाळा सुरु होण्या आधी नाले सफाई करावी अशी मागणी केली आसता नॅशनल हायवे प्रशासन याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करीत आहे. वारंवार पत्र व्यवहार करून व प्रत्यक्ष कार्यालयाला भेटी देवून सुध्दा नॅशनल हायवे प्रशासन आजूनही झोपेचे सोंग केल्याचे नाटक करत आहे. बऱ्याच वेळेला जासई लगत आसलेले नॅशनल हायवे येथे पावसाळ्यामध्ये पाणी



भरून चार महिने येण्याजाण्याचा मार्ग बंद असतो. नॅशनल हायवे प्रशासनाला माहित असून अधिकारी याकडे दुर्लक्ष करतात व नागरीकांना वेठीस धरण्याचे काम करतात.

सोमवारी (दि. १८) मे रोजी सरपंचानी कार्यालयाला भेट दिली आसता नॅशनल हायवे प्रशासनाने नाले सफाई करण्याकरीता आजूनही कोणताही कॉन्ट्रक्टर नेमला नाही. त्यामुळे येणाऱ्या पावसाळ्यामध्ये नॅशनल हायवेच्या रस्त्यांवर नदीचे स्वरूप प्राप्त होणार आहे. त्यामुळे जासई गावातील नागरीकांसाठी नॅशनल हायवे प्रशासनाने बोटीची व्यवस्था करावी अशी मागणी सरपंच घरत यांनी नॅशनल हायवे प्रशासनाकडे केली आहे. गेल्या वर्षी रस्त्यावर व नाले गटारांमध्ये भरपूर प्रमाणात पावसाचे पाणी साचल्याने अनेक ग्रामस्थांचे टू व्हीलर, फोर व्हीलर वाहनांचे खूप मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. तर अनेक दुकान व घरात पाणी गेल्याने मोठे नुकसान झाले होते. गेल्या वर्षी सारखी परिस्थिती पुन्हा उदभवू नये यासाठी त्वरित उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे.

> **“नॅशनल हायवे प्रशासनाकडे वारंवार पत्रव्यवहार करून देखील वेळेत गटारे साफ होत नसल्याने नागरिकांना, जनतेला विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. यंदाही साफसफाई न झाल्याने अनेक समस्या निर्माण होणार आहेत. त्यामुळे नॅशनल हायवे प्रशासनाने त्वरित नाले साफसफाई करावी व नागरिकांना दिलासा द्यावा. – संतोष घरत, सरपंच, जासई ग्रामपंचायत”**

# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**

**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे-आवास, ता.अलिबाग, जि.रायगड, येथील गट नंबर ७२४/२, एकूण क्षेत्र ४-६०-०० आर.चौ. मीटर, आकार ४६.०० रू. पैसे पैकी क्षेत्र १-५०-०० आर.चौ.मीटर आकार १५.०० रू. पैसे ही बिनशेती मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक उमेश विश्वनाथ नागवेकर, दर्शना दत्तात्रेय नागवेकर, सुनिता विश्वनाथ नागवेकर, विकास विश्वनाथ नागवेकर, विनायक विश्वनाथ नागवेकर, शिल्पा सुबोध पाटील, नेहा निलेश पाटील व विनंती वंदेश साखरकर यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : १९/०५/२०२६

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, खालील वर्णनाच्या इमारती मधील शांतादुर्ग को. ऑप. हाउ. सोसायटी अलिबाग या इमारती मधील दुसऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका नं.६, ही श्री आनंद पांडुरंग करंबत रा. चेंढरे अलिबाग ता. अलिबाग जि. रायगड यांचेकडुन कायम खरेदीने विकत घेण्याचा माझे अशिलांचा मानस आहे. याकरिता सदर सदनिका विकत घेणेबाबत माझे अशिलांनी श्री आनंद पांडुरंग करंबत यांचेशी तशी बोलणी करून रितसर साठेकरार केला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड येथील सिटी सर्व्हे नं ९५६, ९५७, के-९५७, ९५८-बी / १, आणि ९५९/१-अ या मिळकतीमधील मधील शांतादुर्ग को. ऑप. हाउ सोसायटी या ईमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका नं.६, क्षेत्र ५३९ चौ.फुट (५०.०९ चौ.मी.) बिल्टअप (सदर मिळकतीचा अलिबाग नगरपालिका मालमत्ता क्र.ALB००००१७०९) (जुना मालमत्ता क्र.Z1MKT ००१७११) (मॅन्युअल मालमत्ता क्र.१४४४) हि निवासी सदनिका.

सदर सदनिका ही पुर्णपणे निर्वेध व बोजारहित असुन या सदनिकेवरील आपली मालकी अबाधित आहे तसेच सदरची सदनिका ही आपले प्रत्यक्ष ताबे, कब्जा, वहिवाटीत आहे असा निर्वाळा श्री आनंद पांडुरंग करंबत यांनी माझे अशिलांस दिला आहे.

सबब, या सदनिकेबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा गहाण, दान, लिज, लिन, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, कर्ज वगैरे बाबत कसलाही हक्क अथवा हरकत असल्यास अथवा श्री आनंद पांडुरंग करंबत यांचे सोबत माझे अशिल करत असलेल्या व्यवहारांस कोणाची काही हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्यासंबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार खरेदीदारांचे वकील यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसांचे आत आणुन दयावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आली नाही, तर सदर मिळकत निर्वेध आहे व विद्यमान मालकांना या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, व या प्रकारे मागाहून आलेली अशी कोणाचीही कसलीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक देखील राहणार नाही याची सर्वानी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळविले.

अलिबाग
दिनांक :१९/०५/२०२६

स्वाक्षरीत / -
**ॲड. अमित अ. राणे**
२०१ सृष्टी २ रा मजला वेधशाळेसमोर
ता.अलिबाग, जि.रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी खालील वर्णनाच्या मिळकती, मिळकतीचे विद्यमान मालक कौशल कपील पाटील, भाग्यश्री कपील पाटील, शारदा गणपत पाटील व ओम कपील पाटील यांच्याकडुन सर्व हक्कांगासह विकत घेण्याच्या ठरविलेल्या आहेत.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे.) |
|---|---|---|---|
| वनवली, ता.अलिबाग | ४६ | ०-३६-१०<br>पो.ख. ०-००-००<br>एकूण ०-३६-१० | ८.१९ |
| वनवली, ता.अलिबाग | ४७/२ | ०-९४-२०<br>पो.ख. ०-००-००<br>एकूण ०-९४-२० | २१.०९ |
| वनवली, ता.अलिबाग | ४७/१ | ०-९४-२०<br>पो.ख. ०-०१-००<br>एकूण ०-९५-२० | २१.१० |

सदरहू मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकती निर्वेध आहेत, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : १९/०५/२०२६

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो.,ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता.अलिबाग जि.रायगड.

## कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
**(भारत सरकारचा उपक्रम)**

सादर सेवा

### निविदा अधिसूचना

उप मुख्य अभियंता (कार्य), कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, रत्नागिरी, पात्र कंत्राटदारांकडून खालील कामासाठी आयआरईपीएस पोर्टलवर ई-निविदा प्रणालीद्वारे एकल लिफाफा बोली पद्धतीने खुल्या निविदा मागवित आहे: **कामाचे नाव:** महाराष्ट्र राज्यातील कोकण रेल्वेच्या रत्नागिरी विभागातील कोलाड स्थानकासाठी गोडी नदी येथे पाइपलाइनसह बोअरवेलचे बांधकाम करणे. **निविदा सूचना क्र.: केआर-आरएन-डिवायसीईडब्ल्यू-बोर-2-2026 दिनांक: 20/05/2026**, **एकूण अंदाजित खर्च:** ₹ 6,47,700.81/- (जीएसटी वगळून) **निविदा सुरू होण्याची तारीख:** 27/05/2026, **निविदा बंद होण्याची तारीख व वेळ:** 10/06/2026 रोजी दुपारी 15:00 वाजेपर्यंत ऑनलाईन बोली/ऑफर सादर करता येतील. **काम पूर्ण करण्याची मुदत:** 5 महिने मान्सून सह. हस्तलिखित प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. तपशील व सहभागासाठी कृपया https://www.ireps.gov.in या संकेतस्थळास भेट द्या. सर्व सुधारणा/परिशिष्टे याच संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जातील.

## कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
**(भारत सरकारचा उपक्रम)**

सादर सेवा

### निविदा अधिसूचना

उप मुख्य अभियंता (कार्य), कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, रत्नागिरी, पात्र कंत्राटदारांकडून खालील कामासाठी आयआरईपीएस पोर्टलवर ई-निविदा प्रणालीद्वारे एकल लिफाफा बोली पद्धतीने खुल्या निविदा मागवित आहे: **कामाचे नाव:** महाराष्ट्र राज्यातील कोकण रेल्वेच्या रत्नागिरी विभागात इंदापूर-माणगाव स्थानकांदरम्यान एलसी-11 (ढाकणे गेट) येथे गेट लॉजचे बांधकाम, चिपळूण स्थानकाच्या पश्चिम बाजूस सबवे जवळ बुकिंग ऑफिसचे बांधकाम तसेच फिरत्या क्षेत्राचा विकास व इंदापूर, गोरेगाव रोड आणि उक्शी स्थानकांवर ऑटो-स्टँडची व्यवस्था आणि मॉड्युलर शेल्टरचे बांधकाम करणे. **निविदा सूचना क्र.: केआर-आरएन-डिवायसीईडब्ल्यू-एमआयएससी-3-2026 दिनांक: 20/05/2026**, **एकूण अंदाजित खर्च:** ₹ 38,39,609.43/- (जीएसटी वगळून) **निविदा सुरू होण्याची तारीख:** 27/05/2026, **निविदा बंद होण्याची तारीख व वेळ:** 10/06/2026 रोजी दुपारी 15:00 वाजेपर्यंत ऑनलाईन बोली/ऑफर सादर करता येतील. **काम पूर्ण करण्याची मुदत:** 6 महिने. हस्तलिखित प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. तपशील व सहभागासाठी कृपया https://www.ireps.gov.in या संकेतस्थळास भेट द्या. सर्व सुधारणा/परिशिष्टे याच संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जातील.

## जाहीर नोटीस

सर्वांना या नोटीसने असे कळविणेंत येत आहे की, जिल्हा रायगड, तालुका अलिबाग पैकी गांव नागांव येथील श्रीमती कलावती श्रीधर आठवले वगैरे यांचे मालकीची खालील वर्णनाची मिळकत असून, सदर मिळकत आमचे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले आहे.

| गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| २४४ | - | ०-१२-४० | २=८१ |

सदर मिळकतीपैकी क्षेत्र ०-०८-१० हे.आर.पॉ. आणि पोटखराबा ०-००-५० हे.आर.पॉ. असे एकूण ०-०८-६० हे.आर.पॉ. क्षेत्राची मिळकत

सदर व्यवहार पूर्ण करणेपूर्वी सदर मिळकतीमध्ये त्रयस्थ व्यक्तीची काही जडजोखीम असल्यास त्याची माहिती मिळविण्याकरिता ही नोटीस देण्यांत येत आहे.

तरी सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून आठ दिवसांत नोंदवावी. सदर मुदतींत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

तारीख: १९/०५/२०२६

सही / -
**ॲड. चैताली हरेश मगर**
मु.सहाणगोठी, पो.ढवर
तालुका अलिबाग, जिल्हा रायगड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे-भादाणे, ता.अलिबाग, जि. रायगड, येथील गट नंबर ८२, एकूण क्षेत्र ०-४९-०० हे. आर., आकार ३.०० रू. पै. ही जमीन मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक कौशल कपील पाटील, भाग्यश्री कपील पाटील, शारदा गणपत पाटील व ओम कपील पाटील यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : १९/०५/२०२६

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को.ऑप.हौ.सो.,ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी खालील वर्णनाच्या मिळकती, मिळकतीचे विद्यमान मालक कौशल कपील पाटील, भाग्यश्री कपील पाटील, शारदा गणपत पाटील व ओम कपील पाटील यांच्याकडुन सर्व हक्कांगासह विकत घेण्याच्या ठरविलेल्या आहेत.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे.) |
|---|---|---|---|
| वरंडे, ता.अलिबाग | ४५४/१ | ०-०६-६०<br>पो.ख. ०-०१-३०<br>एकूण ०-०७-९० | ०.४४ |
| वरंडे, ता.अलिबाग | ४५४/२ | ०-२१-३०<br>पो.ख. ०-००-००<br>एकूण ०-२१-३० | १.३३ |
| वरंडे, ता.अलिबाग | ४५५ | ०-२८-१०<br>पो.ख. ०-०३-३०<br>एकूण ०-३१-४० | १.८७ |
| वरंडे, ता.अलिबाग | ४५६/१ | ०-६३-२०<br>पो.ख. ०-००-५०<br>एकूण ०-६३-७० | ४.१७ |
| वरंडे, ता.अलिबाग | ४५६/२ | ०-०७-६०<br>पो.ख. ०-००-००<br>एकूण ०-०७-६० | ०.४८ |
| वरंडे, ता.अलिबाग | ४५७ | ०-४६-००<br>पो.ख. ०-०१-५०<br>एकूण ०-४७-५० | ३.६८ |
| वरंडे, ता.अलिबाग | ४५८ | ०-२८-८०<br>पो.ख. ०-००-५०<br>एकूण ०-२९-३० | २.१९ |
| वरंडे, ता.अलिबाग | ४८८ | ०-३९-६०<br>पो.ख. ०-०४-४०<br>एकूण ०-४४-०० | ७.०६ |

सदरहू मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकती निर्वेध आहेत, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : १९/०५/२०२६

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को.ऑप.हौ.सो.,ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता.अलिबाग जि.रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे- नागेवाडी, तालुका कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं./ हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १) अंकुश रघुनाथ घोडविंदे<br>२) ज्योत्स्ना अंकुश घोडविंदे<br>३) सतीश रघुनाथ घोडविंदे | ६/१/अ | एकूण क्षेत्र ५-६०-०० त्यापैकी लिहून देणार यांचे हिश्यास असलेले क्षेत्र ०-८८-५० हे.आर.पॉ.त्यापैकी लिहून दिलेले प्लॉट नं.२१ चे क्षेत्र ०-२०-०० हे. आर. पॉ. | ०-१६ |

तरी सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचे कडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधन कारक राहाणार नाही.

ठिकाण:- कर्जत
दिनांक २०/०५/२०२६
मो. नं. ९९२१०२३८९४

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट.
**ॲड. योगेश का. देशमुख**
पत्ता: श्री गणेश प्रसाद सोसा. प्लॅट नं.१०४.
कदम वाड्या जवळ, स्टेशन रोड. कर्जत
ता.कर्जत जि.रायगड

## पनवेल महानगरपालिका, पनवेल
## महापालिका सचिव कार्यालय

जा.क्र.: पमपा/सचिव/२०२६/प्र.क्र.०५/१९९/२०२६ दिनांक : १९/०५/२०२६

**शुद्धीपत्रक**

प्रति,
श्री/श्रीमती..............................................
सदस्य/ सदस्या,
पनवेल महानगरपालिका

विषय : पनवेल महानगरपालिकेची दि.२०/०५/२०२६ रोजी आयोजित सर्वसाधारण सभा स्थगित करणेबाबत.

संदर्भ : १.भारत निर्वाचन आयोग यांची १८ मे २०२६ ची प्रेस नोट-ECI/PN/०८७/२०२६
२. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्रमांक संकीर्ण २०२६/प्र.क्र.३८/३३ (नि.-११), दिनांक १८ मे, २०२६.
३. सर्वसाधारण सभा क्र.५ दि. २०/०५/२०२६ ची विषयपत्रिका

मा. महोदय/ महोदया,

उपरोक्त संदर्भ क्र. १ व २ अन्वये, महाराष्ट्र विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांच्या द्वैवार्षिक निवडणूक-२०२६ कार्यक्रमाची घोषणा भारत निवडणूक आयोगामार्फत करण्यात आलेली असून रायगड जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता तात्काळ प्रभावाने लागू झालेली आहे.

त्याअनुषंगाने पनवेल महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा सुचना क्र.५ अन्वये बुधवार, दिनांक २०/०५/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. ''आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह'', पनवेल येथे आयोजित करण्यात आलेली सर्वसाधारण सभा आचारसंहिता कालावधीसाठी स्थगित करणेत येत आहे. तरी स्थगित सभेची पुढील सुचना मा.सदस्य/सदस्या यांना यथावकाश अवगत करण्यात येईल.

**(मा.महापौर यांचे आदेशान्वये व मंजूरीने)**

सही/-
**नानासाहेब कामठे**
**महापालिका सचिव**
**पनवेल महानगरपालिका, पनवेल**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे-चोंढी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील ग्रुप ग्रामपंचायत किहीम हद्दीतील मिळकत नं. ५१४ अ-३, क्षेत्र १६.७२ चौ.मीटर ही दुकान गाळा मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. नयना हेमंत पाटील रा. बामणसुरे, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : १९/०५/२०२६

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो.,ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेल्या शेतजमिन मिळकतीचे मालक श्री. नरेश परशुराम भोईर यांनी त्यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील शेतजमिन मिळकत आमचे अशिल यांना कायम स्वरूपी खरेदीखताने विकत देण्याचे ठरविले असून तशी बोलणी आमचे अशिलांचे बरोबर केलेली आहेत. मौजे-कोठींबे, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड ४१०२०१ येथील शेतजमिन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे नमुद केले आहे:-

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार |
|---|---|---|
| ८४/१/ब | २.६४.००<br>०.३३.०० पो. ख<br>२.९७.०० एकूण क्षेत्र | २.१५ |

तरी शेतजमिन मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळवहिवाट, ताबा, वहीवाट, बयाणा, पावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षीस, दान, जप्ती, लिज, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशिर हक्क, भारतातील कोणत्याही कोर्टाचे केसेस व मनाईहुकूम, न्यायनिर्णय, आदेश, तसेच त्रयस्थ इसमांबरोबर केलेला करारनामा व इतर कोणतेही हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली सही करणार वकील यांच्या नमुद केलेल्या कार्यालयाचे पत्त्यावर आपल्या हरकती लेखी पुराव्यासह देण्यात यावे. दिलेल्या मुदतीनंतर कोणाचीही हरकत आली तर ती हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

कर्जत
तारीख २०/०५/२०२६

सही / -
**ॲड. जगदिश पांडूरंग कराळे**
कार्यालय : गाळा नंबर १०, पंकज रेसिडेन्सी,
साई हॉस्पीटल जवळ, आगरी समाज हॉल शेजारी,
धामोते, नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड ४१०१०१,
मो. नं. ८३६९२१७३१३

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली शेतजमिन मिळकत त्यांच्या मालकाकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे - खरवंडी, तालुका - कर्जत, जि. - रायगड येथील शेतजमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| मारूती धोंडु चव्हाण<br>सुनिल धोंडु चव्हाण | ३० | २/ब | एकूण क्षेत्र ०-७८-०० हे.आर.पॉ त्यापैकी लिहून दिलेले क्षेत्र ०-४८-०० | ९-३१ |

सदरची शेतजमीन मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील शेतजमीन मिळकत ही तद्ंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार कुलमुखत्यारपत्र, मृत्युपत्रांकीत दान कुळवहिवाट, बोजा, चार्ज लिन, ताबेकब्जा वगैरे कोणतेही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. २०/०५/२०२६

खरेदीदारा तर्फे वकील
**ॲड. स्वप्निल बाबूराव देशमुख**
पत्ता. सदनिका नं. ५०४, ५ वा मजला, गजवक्र
रेसिडेंन्सी, कचेरी रोड, कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड
मो. ८८३०५६०९६२/९२७३२२४६८०

## जाहीर नोटीस

माझे आशिल यांनी दिलेल्या माहितीवरून व सांगितलेवरून त्यांचे तर्फे सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालीलप्रमाणे:-

मौजे-सातिर्जे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट नं. आणि उपविभाग २५५, क्षेत्र ०.४२.२० (हे.आर.), पो. ख. ०.००.०० (हे.आर.), एकूण क्षेत्र ०.४२.२० ( हे.आर.), आकार ३.५० (रु. पैसे) ही मिळकत विद्यमान मालक श्रीमती. प्रगती प्रभाकर राऊत, श्री. वैभव प्रभाकर राऊत, रा.मुंबई यांजकडुन जाण्या येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह माझे आशिलांनी विकत घेण्याबाबत व्यवहार ठरविलेला आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी माझे आशिलांस दिला आहे. या उपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, वारसा हक्क, वहीवाटीचे हक्क, कुळ हक्क वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार खरेदीदार यांचे वकील यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे मुदती रजिस्टर पोस्टाने सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजुन माझे आशिल विद्यमान मालकांबरोबर पुढील व्यवहार ठरवून खरेदीखत पुर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक :- २०/०५/२०२६.

**(ॲड.परेश एम.घरत)**
तळमजला, अशोका शॉपींग सेंटर,
एस.टी.स्टॅड जवळ, अलिबाग
ता.अलिबाग, जि.रायगड ४०२२०१
९८५०४८१२३४

## जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक चंद्रकांत मारुती भगत यांचेकडून सदर मिळकत कायमस्वरूपी मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या अनुषंगाने आम्ही विद्यमान मालकाचे सदर मिळकतीवरील मालकी हक्क तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांना पूर्ण हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांना दिलेला आहे. तथापि, कोणत्याही व्यक्ती/संस्थेस सदर मिळकत किंवा त्यातील कोणत्याही भागासंदर्भात कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त हक्क, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्य कोणताही दावा असल्यास त्यांनी त्याबाबतची लेखी सूचना झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४था मजला, जलाराम ज्योत, जन्मभूमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे संबंधित कागदपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रतांसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवावी.

वरील मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निर्विवाद मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरून आमचे अशील सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उपजिल्हा रायगड यांच्या कार्यक्षेत्रातील मौजे हाशिवरे, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड येथील शेतजमीन खालील प्रमाणे:

| अ.क्र. | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) |
|---|---|---|
| १. | ६/४ | ००-४८-२० |
| २. | ८/१ | ००-२०-४० |

ठिकाण: अलिबाग
दिनांक: २०/०५/२०२६

**झुंजारराव आणि कं. करीता**
**सही/-**
**विक्रांत झुंजारराव**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसने कळविण्यात येते की, आमचे आशिलांनी पुढे नमुद केलेली शेती मिळकत तिचे विद्यमान मालक १) श्री. विश्वनाथ गणेश आपटे, २) श्री. सौरभ अरूण आपटे, ३) स्नेहा अरूण आपटे, ४) श्रुती जयदेव कर्वे, ५) श्री. सुयोग गोविंद आपटे, ६) स्मिता गोविंद आपटे, ७) विदुला कौस्तुभ माचव व ८) धनश्री श्रीकांत सोमण यांचेकडुन कायम खरेदी करण्याचे ठरवले असुन त्याबाबत विद्यमान मालक व आमचे आशिलांमध्ये बोलणी चालु आहेत. मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

| गावाचे नाव | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| मौजे नागाव, ता.अलिबाग | १८८२<br>PU-ID: 17934773560 | ०.११.०० | १.५६ |

सदरहु मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा अथवा व्यक्तींचा, कोणत्याही संस्थेचा, बँकेचा गहाण, दान, लिज, लिन, बक्षिस, खरेदी, साठेकरार, कोणताही करार, कुळ हक्क, वहिवाटीचा हक्क, पोटगी, मृत्युपत्र, अखत्यारपत्र, ताबा बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध, दिवाणीदावा, महसुलवाद असल्यास त्याच्या लेखी हरकतीसह व कागदोपत्री प्रथमदर्शनी पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ०७ दिवसांचे आत प्रत्यक्ष येवुन अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वर नमुद मिळकत पूर्णतः निर्वेध व बीनजोखमी आहे असा भरवसा जमिन मालकांनी आमचे आशिलांना दिलेला आहे. सबब विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासहीत न आल्यास सदरहु मिळकतींबाबत आमचे आशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे आशिलांवर बंधनकारक राहाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. १९/०५/२०२६
जागा मालकांची सही

**श्री.अमित महेश्वर देशमुख**
ॲडव्होकेट आणि नोटरी,
सृष्टी बिल्डींग,वेधशाळेसमोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री.राजेश लक्ष्मणदास कावरा, रा. मुंबई यांचेकडुन कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहु मिळकत हि निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्यूपत्र, तारण, ताबा /गहाण, वहिवाट इ. स्वरूपाचे हक्क हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकित खरेदीदार यांच्या वकिलांकडे हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ सात दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहु मिळकत हि निर्वेध आहे समजुन आमचे अशिल खरेदी व्यवहार पुर्ण करतील. तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र.व उपविभाग क्र. | क्षेत्रफळ (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| झिराडपाडा, ता.अलिबाग | १३ | १-३९-३०<br>पो.ख. ०-०७-९०<br>एकुण १-४७-२० | ९.४५/- |
| | वर नमुद मिळकतीपैकी राजेश कावरा यांचे मालकीचे क्षेत्र ०-१२-० हे.आर. आकार ०.८१ /- हि मिळकत | | |
| | १६ | ०-३१-६० | १.६०/- |
| | १७ | ०-१२-२० | १.४५/- |
| | १८ | ०-११-१० | १.३०/- |
| | १९ | ०-१२-२० | १.४५/- |
| | २० | ०-०४-०<br>पो.ख. ०-०५-८०<br>एकुण ०-०९-८० | ०.१०/- |

दिनांक : १९/०५/२०२६

सही/-
**ॲड. प्रविण मधुकर ठाकुर,**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफीस पत्ता-शितोळे आळी, अलिबाग,
ता.अलिबाग, जि.रायगड
मोबा. नं. ९८२२०४८३३८

विनायक दळवी

## कमी वयाचा वाद अन् अडचणी

बिहारचा युवा क्रिकेटपटू वैभव सूर्यवंशी याच्या कमी वयामुळे त्याला करारबद्ध करताना किंवा भारतीय संघात स्थान देताना सुरुवातीला काही कायदेशीर आणि प्रशासकीय अडचणी आल्या. सध्या तो १५ वर्षांचा असून आयपीएल २०२६ च्या हंगामात धावांचा पाऊस पाडत आहे. आयसीसीच्या नियमांनुसार, कोणत्याही खेळाडूला वरिष्ठ स्तरावर किंवा आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळण्यासाठी किमान १५ वर्षे वय पूर्ण असणे अनिवार्य आहे. वैभवने १९ वर्षांखालील विश्वचषकात आणि देशांतर्गत क्रिकेटमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली असली, तरी २७ मार्च पूर्वी (तो १५ वर्षांचा होण्याआधी) बीसीसीआयची इच्छा असूनही त्याची भारतीय वरिष्ठ संघात निवड करता आली नव्हती. आता तो १५ वर्षांचा झाल्यामुळे आंतरराष्ट्रीय निवडीचा हा कायदेशीर मार्ग मोकळा झाला आहे. वैभव सूर्यवंशी १४ वर्षांचा असताना आयपीएल खेळत असल्याने एका सामाजिक कार्यकर्त्याने १४ वर्षांखालील मुलाला व्यावसायिक करारांतर्गत खेळवणे म्हणजे बालमजुरी (चाइल्ड लेबर) आहे, असा दावा करून वाद निर्माण केला होता. भारतीय संविधानानुसार १४ वर्षांखालील मुलांना घातक कारखान्यांमध्ये किंवा खाणींमध्ये काम करण्यास मनाई आहे, खेळात नाही. तसेच, आता वैभव १५ वर्षांचा झाल्याने या तांत्रिक वादाला कोणताही कायदेशीर आधार उरलेला नाही. त्याच्या कमी वयामुळे उद्भवलेल्या अडचणी आणि सद्यस्थिती याचा विचार केला असता सचिन तेंडुलकर जेव्हा १४ वर्षांचा होता, तेव्हा देखील असाच प्रसंग उद्भवला होता, याची आठवण होते. मात्र, त्यावेळी मुंबईतल्या कल्पक क्रिकेट संघटकांनी अचूक मार्ग काढला होता.सचिन तेंडुलकर आणि विनोद कांबळे या जोडीने आंतरशालेय क्रिकेट स्पर्धेत विश्वविक्रम केल्यानंतर त्यांना सनग्रेस मफतलाल या कंपनीने उदयोन्मुख क्रिकेटपटू म्हणून करारबद्ध केले होते. सचिनचा करार १४ वर्षापासून अठराव्या वर्षात पदार्पण करेपर्यंतचा होता. आश्चर्याची गोष्ट अशी की, त्याला प्रतिमहा केवळ दोनशे रुपयाचा धनादेश मफतलाल योजनेद्वारा प्रशिक्षणासाठी म्हणून दिला जात होता. या योजनेअंतर्गत या जोडीला क्रिकेटची आयुध आणि प्रशिक्षणासाठी लागणाऱ्या अन्य गोष्टी दिल्या जात होत्या. हे दोघेही त्या गोष्टीत समाधानी होते, हे महत्त्वाचे. कारण त्यांना त्यामुळे सुदृढ क्रिकेटचे वातावरण मिळाले होते.विनोद कांबळी आणि सचिन तेंडुलकर यांनी अठराव्या वर्षात पदार्पण केल्यानंतर, पहिल्या दिवसापासून त्यांना अधिकृतरित्या करारबद्ध करण्यात आले. सचिनच्या त्या आधीच्या करार पत्रकावर, म्हणजे १४ ते १८ वय वर्ष लागेपर्यंतच्या करार पत्रकावर त्याच्या वडिलांची, म्हणजे प्राध्यापक रमेश तेंडुलकर यांची स्वाक्षरी होती. वयाच्या १८ व्या वर्षात पदार्पण केल्यानंतर सचिन तेंडुलकर आणि विनोद कांबळी यांनी तोपर्यंत खूपच नाव कमावले. त्यावेळी त्या दोघांनाही एअर इंडियापासून, अन्य औद्योगिक संघाकडून करारबद्ध करण्याच्या चांगल्या ऑफर आल्या होत्या. मात्र, या दोघांनी आपल्या आधीच्या आधार देणाऱ्या कंपनीला, म्हणजे मफतलाल कंपनीलाच प्रथम पसंती दिली. या दोघांनीही पुढे काही वर्षांसाठीच्या करारावर स्वाक्षऱ्या केल्या. त्यानंतर जो घडला तो इतिहास होता.

# आशियाई खेळांवर तिरंदाजांचे लक्ष्य

## धीरज-ज्योती सुरेखा ट्रायलमध्ये अव्वल; ऑलिम्पियन दीपिका-अतानु दास संघाबाहेर

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

भारतीय तिरंदाजी संघाने जपानमध्ये होणाऱ्या २०२६ च्या आशियाई खेळांसाठी भारतीय संघाची घोषणा केली आहे. सोनीपत येथील साईसेंटरमध्ये ३ दिवस चाललेल्या निवड चाचण्यांनंतर संघाची निवड करण्यात आली. देशाचे स्टार तिरंदाज धीरज बोम्मदेवर आणि ज्योती सुरेखा वेन्नम यांनी आपापल्या गटात पहिले स्थान पटकावून संघात सहज स्थान मिळवले.



महिलांच्या रिकर्व्ह आणि पुरुषांच्या कंपाऊंड गटात चाचण्या घेण्यात आल्या. चार वेळा ऑलिम्पियन राहिलेली दीपिका कुमारी, माजी इंडिया नंबर-१ अतानु दास आणि आशियाई खेळांमध्ये अनेक पदके जिंकणारा अभिषेक वर्मा यावेळी आशियाई खेळांचे तिकीट मिळवण्यात अपयशी ठरले. ३ दिवसांच्या कडव्या स्पर्धेत दीपिका आणि अतानु चाचण्यांमध्ये चौथ्या स्थानावर राहिले, ज्यामुळे त्यांना आशियाई खेळांच्या संघातून बाहेर पडावे लागले.

महिलांच्या रिकर्व्ह विभागात युवा खेळाडूंनी वरिष्ठ खेळाडूंना मागे टाकले. १९ वर्षीय तिरंदाज कीर्ती शर्माने ट्रायल्समध्ये १३.५ गुणांसह पहिले स्थान पटकावले. तर महाराष्ट्राची तिरंदाज कुमकुम मोहोद दुसऱ्या स्थानावर राहिली. दोन्ही खेळाडूंनी थेट आशियाई क्रीडा संघातील स्थान निश्चित केले.

तिसऱ्या आणि शेवटच्या स्थानासाठी ऑलिम्पियन अंकिता भकत आणि अनुभवी दीपिका कुमारी यांच्यात चुरशीची लढत झाली. तीन दिवसांच्या तीन फेऱ्यांनंतर अंकिता आणि दीपिका १०.७५ गुणांवर बरोबरीत (टाय) होत्या. यानंतर दोघांमध्ये निर्णायक शूट-ऑफ सामना झाला. यात अंकिताने दीपिकाला हरवून आशियाई क्रीडा संघातील तिसरे आणि शेवटचे स्थान मिळवले.

दिग्गज तिरंदाज दीपिका कुमारी सलग दुसऱ्यांदा आशियाई क्रीडा स्पर्धेत खेळू शकणार नाही. यापूर्वी २०२२ च्या हांगझोऊ आशियाई क्रीडा स्पर्धेत ती मुलीच्या जन्मामुळे भाग घेऊ शकली नव्हती. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेची विजेती आणि अनेक विश्वचषक पदके जिंकणाऱ्या दीपिकाने २०१० पासून आतापर्यंत तीन आशियाई क्रीडा स्पर्धा खेळल्या आहेत, परंतु तिला कधीही वैयक्तिक पदक जिंकता आलेले नाही. तिची सर्वोत्तम कामगिरी २०१० च्या ग्वांगझू खेळांमधील सांघिक कांस्यपदक होती.

चौथ्या स्थानावर राहिल्यामुळे दीपिका विश्वचषक सर्किटच्या तिसऱ्या आणि चौथ्या टप्प्यासाठी भारतीय संघात कायम राहील. खरं तर, विश्वचषकासाठी ४ तिरंदाज निवडले जातात, तर आशियाई क्रीडा स्पर्धेत केवळ टॉप-३ ला संधी मिळते.

ट्रायल्समध्ये अव्वल ठरलेल्या १९ वर्षीय कीर्ती शर्माची कहाणी प्रेरणादायी आहे. हरियाणाच्या जींद जिल्ह्यातील रहिवासी असलेल्या कीर्तीचे वडील लोखंडी गेट बनवण्याचे काम करतात. २०२२ मध्ये प्रशिक्षक उधम सिंह यांच्या देखरेखीखाली झालेल्या टॅलेंट स्काउटिंग ट्रायलनंतर कीर्तीची झारखंडच्या साई हजारीबाग केंद्रात निवड झाली होती.

तिने याच वर्षी फेब्रुवारीमध्ये बँकॉक आशिया कप स्टेज-१ मधून आंतरराष्ट्रीय पदार्पण केले होते. तिने आतापर्यंत तीन आशिया कप खेळले आहेत आणि रिद्धी फोर व रूमा बिस्वास यांच्यासोबत संघाने कांस्यपदक जिंकले आहे.

### कंपाऊंड संघात मोठा बदल

गेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताने कंपाऊंड तिरंदाजीतील सर्व ५ सुवर्णपदके जिंकली होती, पण यावेळी संघ बदललेला दिसेल. अनुभवी ज्योती सुरेखा वेन्नम ही एकमेव वरिष्ठ खेळाडू होती, जिने तिचे स्थान कायम राखले. पुरुषांच्या गटात मोठा उलटफेर झाला. अनुभवी अभिषेक वर्माची कामगिरी खराब झाली आणि तो टॉप-८ तिरंदाजांमध्ये शेवटच्या स्थानावर राहिला. तर, जगातील सातव्या क्रमांकाचा कंपाऊंड तिरंदाज ऋषभ यादव चौथ्या स्थानावर राहून चुकला. आंध्र प्रदेशच्या थिरुमुरु गणेश मणि रत्नमने त्याला मागे टाकून संघात स्थान मिळवले. आशियाई क्रीडा स्पर्धा यावर्षी सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये जपानमधील आईची-नागोया येथे होतील.

## नांदाईपाडा येथे डायरेक्ट व्हॉलिबॉल जिल्हा चाचणी स्पर्धा उत्साहात संपन्न



■ पेणला अंतिम विजेतेपद

■ बोरपाडा संघ उपविजेता

| रेवदंडा | प्रतिनिधी

अलिबाग तालुक्यातील झिराड परिसरातील फकिरपाडा-नांदाईपाडा येथे रायगड जिल्हा डायरेक्ट व्हॉलिबॉल असोसिएशन आणि जय हनुमान क्रीडा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत करण्यात आलेली डायरेक्ट व्हॉलिबॉल जिल्हा चाचणी स्पर्धा २०२६-२०२७ मोठ्या उत्साहात पार पडली. पुरूष व महिला गटासाठी आयोजीत या स्पर्धेला जिल्हाभरातून खेळाडू व क्रीडाप्रेमीचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

अत्यंत चुरशीच्या झालेल्या या स्पर्धेत पेण संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत अंतिम विजेतेपद पटकावले, बोरपाडा संघ उपविजेता ठरला, अलिबाग संघाने तृतिय क्रमांक मिळविला. यजमान फकिरपाडा संघाने चतुर्थ क्रमांकाचा मानकरी ठरला. यावेळी डायरेक्ट व्हॉलिबॉल असोसिएशन महाराष्ट्र व डायरेक्ट व्हॉलिबॉल असोसिएशनचे रायगडचे जनरल सेक्रेटरी दिपक मोकल, यतिराज पाटील, आशिष पाटील, प्रसन्ना पाटील, गणेश भोईर यांचे हस्ते घेण्यात आला. स्पर्धेतील प्रथम क्रमांकास रूपये १० हजार व भव्य चषक, द्वितीय क्रमांकास रूपये ७ हजार व भव्य चषक, तृतीय क्रमांकास रूपये ३ हजार व भव्य चषक तसेच चतुर्थ क्रमांकास रूपय ३ हजार व भव्य चषक अशी पारितोषीके मान्यवर उपस्थितांचे हस्ते वितरीत करण्यात आली.

## बायर्न म्युनिचला बुंदेस्लिगाचे विजेतेपद

| म्युनिच | वृत्तसंस्था |

हॅरी केनच्या हॅट्ट्रिकच्या जोरावर गोलचा नवा विक्रम रचत बायर्न म्युनिकने अखेर बुंदेस्लिगा करंडकावर आपले नाव कोरले. केनच्या या चौथ्या हॅट्ट्रिकमुळे त्याच्या एकूण गोलांची संख्या ३६ वर पोहोचली आहे. रॉबर्ट लेवांडोस्कीच्या २०२०-२१ मधील ४१ गोलांच्या ऐतिहासिक विक्रमापेक्षा तो अवघ्या ५ गोल दूर राहिला. या सामन्यात टॉम आणि निकोलस यांनीही गोल केले. बायर्नने एकूण १२२ गोल नोंदवून एक नवा इतिहास रचला आहे.

# आयपीएल प्लेऑफचे ३ संघ ठरले!

## एका जागेसाठी पाच संघांमध्ये झुंज

| नवी दिल्ली| वृत्तसंस्था |

आयपीएल २०२६ प्लेऑफचं समीकरण आता रोमांचक वळणावर येऊन ठेपलं आहे. चेपॉकच्या मैदानावर खेळण्यात आलेल्या चेन्नई सुपर किंग्स आणि सनरायझर्स हैदराबाद संघांमधील सामन्यांनंतर प्लेऑफसाठी पात्र ठरलेल्या संघांचा आकडा तीनवर पोहोचला आहे. प्लेऑफचे ३ संघ ठरले असून आता एका जागेसाठी पाच संघांमध्ये चुरशीची लढत होणार आहे. त्यामुळे आगामी सामने फार महत्त्वाचे असतील.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू हा संघ सर्वाधिक १८ गुणांसह यंदाच्या प्लेऑफसाठी पात्र ठरणारा पहिला संघ ठरला. आरसीबीच्या पाठोपाठ गुजरात टायटन्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांनीही प्लेऑफमधील आपलं स्थान निश्चित केलं आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू सध्या १८ गुणांसह पहिल्या स्थानावर आहे. गुजरात टायटन्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांचे सध्या समान १६ गुण आहेत, परंतु गुजरातचा नेट रन रेट किंचित चांगला असल्याने ते दुसऱ्या स्थानावर आहेत, तर हैदराबाद तिसऱ्या स्थानावर आहे.

प्लेऑफच्या शर्यतीतून केवळ दोन संघ अधिकृतरित्या बाहेर पडले आहेत. मुंबई इंडियन्स नवव्या स्थानावर, तर लखनौ सुपर जायंट्स दहाव्या स्थानावर आहे. या दोन्ही संघांचे सामने अद्याप शिल्लक आहेत. आता एका जागेसाठी स्पर्धा करणाऱ्या पाच संघांमध्ये पंजाब किंग्स, राजस्थान रॉयल्स, चेन्नई सुपर किंग्स, दिल्ली कॅपिटल्स आणि कोलकाता नाईट रायडर्स यांचा समावेश आहे.

## एशियन पिंच्याक सिलॅट चॅम्पियनशिपसाठी किर्णाक्षी येवलेची निवड

| पाली /बेणसे | प्रतिनिधी |

१० व्या पिंच्याक सिलॅट एशियन चॅम्पियनशिपसाठी किर्णाक्षी किशोर येवले हिची भारतीय संघात निवड झाली आहे. ही स्पर्धा १५ ते २३ जुलै २०२६ दरम्यान व्हिएतनाम येथे आयोजित करण्यात आली आहे. या प्रतिष्ठित स्पर्धेत १७ देशांतील सुमारे ४०० खेळाडू सहभागी होणार आहेत.

भारतीय संघाची निवड चाचणी १७ ते १९ मे २०२६ रोजी श्रीनगर येथील शेर-ए-कश्मीर इंडोर स्टेडियममध्ये पार पडली. या चाचणीत देशातील विविध राज्यांमधून तसेच




■ सर्व स्तरातून होतेय अभिनंदन

पॅरामिलिटरी फोर्समधील सुमारे ३५० खेळाडूंनी सहभाग घेतला होता किर्णाक्षी हिची तुंगल प्रकारात निवड झाली असून ती या स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे.किर्णाक्षी हिने आतापर्यंत उत्कृष्ट कामगिरी करत ज्युनियर सिंगापूर ओपनमध्ये सुवर्णपदक जिंकले आहे. तसेच नॅशनल गेम्स, खेलो इंडिया बीच गेम्स, भारतीय विद्यापीठ पुणेच्या संघातून खेळून ऑल इंडिया इंटर-युनिव्हर्सिटी चॅम्पियनशिप आणि इतर राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये तिने एकूण ११ सुवर्ण, ११ रौप्य, ६ कांस्य अशी एकूण २९ पदके मिळवली आहेत.

राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर सातत्यपूर्ण यश मिळवत असल्यामुळे या एशियन पिंच्याक सिलॅट चॅम्पियनशिपमध्ये तिच्याकडून भारतासाठी पदकाची मोठी अपेक्षा आहे.तिला महाराष्ट्र पिंच्याक सिलॅट असोसिएशन व महाराष्ट्रातील क्रीडाप्रेमींनी या स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

### विश्वचषक फुटबॉल स्पर्धा
## भारतातील प्रक्षेपणाचा तिढा कायम

| नवी दिल्ली| वृत्तसंस्था |

पुढील महिन्यात सुरू होणाऱ्या विश्वचषक फुटबॉल स्पर्धेच्या भारतातील प्रक्षेपणाचा तिढा अद्याप कायम आहे. तो सोडविण्यासाठी फिफाचे माध्यम हक्क अधिकारी भारताच्या दौऱ्यावर आल्याचे तीन सूत्रांनी रॉयटर्सला सांगितले. भारतातील फुटबॉलप्रेमींना यंदाचा विश्वचषक पाहता येणार की नाही, याबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे. प्रसारण हक्कांच्या किमतीवरून फिफा आणि भारतीय मीडिया कंपन्यांमध्ये तोडगा निघालेला नाही. गेल्या आठवड्यात चीनमध्येही अशीच परिस्थिती होती. मात्र, चीन मीडिया ग्रुपने करार करून तिथला तिढा सोडवला.

फिफाच्या योजनांची माहिती असलेल्या तीन सूत्रांनी सांगितले की, फिफाचे माध्यम हक्क अधिकारी भारतात विविध भागधारकांशी चर्चा करत आहेत. मात्र, ते कोणाला भेटत आहेत आणि नेमका त्यांचा दौरा कशासाठी आहे, याचा तपशील स्पष्ट झालेला नाही.जगातील १८० हून अधिक प्रदेशांमध्ये प्रसारण करार पूर्ण झाले आहेत. भारतातही चर्चा सुरू असून त्या सध्या गोपनीय ठेवण्यात आल्या आहेत,असे फिफाने वृत्तसंस्थेला सांगितले.

भारतातील सर्वांत मोठी मीडिया कंपनी रिलायन्स-डिस्ने आणि फिफा यांच्यातील चर्चा निष्फळ ठरली आहे. सोनी या आणखी एका मोठ्या कंपनीने बोली लावण्यापासून माघार घेतली आहे, अशी माहिती मिळते आहे. रिलायन्स-डिस्नेने फिफाच्या प्रक्षेपण हक्कांसाठी दोन कोटी डॉलर देण्याची तयारी दर्शवली होती. परंतु फिफाने सुरुवातीला १० कोटी डॉलरची मागणी केली, ज्यामुळे मतभेद निर्माण झाले. फिफाने अखेरीस किमान सहा कोटी डॉलरच्या आसपासची मागणी केल्याचे समजते.

फिफाची रिलायन्स-डिस्नेबरोबर बैठक होत आहे की नाही, हे स्पष्ट झालेले नाही. अब्जाधीश मुकेश अंबानी यांच्या रिलायन्सच्या नेतृत्वाखालील या उपक्रमाने यावर भाष्य करण्यास नकार दिला आहे. विश्वचषक ११ जून रोजी सुरू होणार आहे, त्यामुळे कराराला अंतिम स्वरूप देण्यासह प्रसारणाच्या पायाभूत सुविधा उभारण्यासाठी आणि जाहिरातींची विक्री करण्यासाठी फक्त तीन आठवडे शिल्लक आहेत.

## राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा: मुंबई, कोल्हापूर, पुणे, लातूरला विजेतेपद

| बदलापूर | वृत्तसंस्था |

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, कुळगाव-बदलापूर नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत मुंबई, कोल्हापर, पुणे, लातूर विभागाने विजेतेपद पटकावले. विद्युत प्रकाशझोतात रंगलेल्या स्पर्धेत १८ वर्षांखालील मुलांच्या गटात

२१ वर्षांखालील मुलींच्या गटात पराभवानंतर सलग ३ सेट जिंकून मुंबईने नाशिकचा लोळवून विजेतेपदावर नाव कोरले. १६-२५, २५-१८,२५-१९, २५-२१ गुणांनी मुंबई अजिंक्य ठरला. शिवप्रिया पनीकर, दिव्या मेहता व वेदिका सामगिर या खेळाडुंनी दुसऱ्या सेटमध्ये पिछाडीवर असलेल्या संघाला एकहाती सेट जिंकून दिला. गतविजेता नाशिक विभागाला चौथ्या सेटमध्ये रोखून मुंबईच्या संघाने विजेतेपदाला गवसणी घातली.

मुलींच्या १८ वर्षांखालील गटात पुणे विरूध्द नागपुर आमनासामना एकतर्फी झाला. अनुभवी खेळाडूंच्या भरणा असलेल्या पुणे विभागाने नागपूरचा २५-१९,२५-१८, २५-१६ गुणांनी विजेतेपद पटकावले. साक्षी साळुंखे, वैष्णवी अडलिंगे व श्रेया चव्हाणने आक्रमण करीत पुणे संघाला विजयश्री बहाल केली. २१ वर्षांखालील मुलींच्या गटात पुणे संघाने नागपूरवरच मात करीत तिसरे स्थान संपादन केले.

रात्री अडीच वाजेपर्यंत रंगलेल्या २१ वर्षांखालील मुलांच्या गटातील विजेतेपदाची लढत लातूरने जिंकली. चार सेटपर्यंत रंगलेल्या लढतीत लातूरने मुंबईचा पराभव केला. निर्भय देशमुख, शेहराज खान, आफताब कुरेशी या खेळाडूंनी आक्रमक झुंज देत तिसऱ्यांदा विजेतेपदाला गवसणी घातली. दुसरा सेट गमविल्यानंतर पुन्हा आघाडी घेत लातूरने बाजी मारत प्रेक्षकांची मने जिंकली.

पाच दिवस चाललेल्या या स्पर्धेत राज्यतील ८ विभागातील ३८४ खेळाडूंचा थरार रंगला. स्पर्धेत कोल्हापूर, लातूर, अमरावती, संभाजीनगर, पुणे, नागपूर, मुंबई व नाशिक या संघात चुरशीच्या लढती पहाण्यास मिळाल्या. १८ व २१ वर्षांखालील युवकांचा व्हॉलीबॉलचा थरार प्रथमच बदलापूरकरांनी अनुभवला. स्पर्धेतील विजेत्यांवे २३ लाख ३५ हजारांची रोख बक्षिसे व करंडक, पदकांनी कौतुक करण्यात आले.बदलापूर नगरी रंगलेला व्हॉलीबॉलचा रणसंग्राम पहाण्यासाठी बदलापूर जिमखाना मैदानावर सोमवारी रात्री अडीच वाजेपर्यंत प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद लाभला.

### खुटील प्रीमियर लीग स्पर्धा
## एकनाथ सुकुम मित्र मंडळ विजेता



| महाड | प्रतिनिधी |

ग्रामीण क्रिकेटचा कुंभमेळा समजल्या जाणाऱ्या खुटील प्रीमियर लीग पर्व २ रे या भव्य ओव्हरआर्म क्रिकेट स्पर्धेचा थरारक सांगता सोहळा नुकताच मोहल्ला मैदान, खुटील येथे मोठ्या दिमाखात पार पडला. संपूर्ण पंचक्रोशीचे डोळे दीपवून टाकणाऱ्या या स्पर्धेत एकनाथ सुकुम मित्र मंडळ संघाने आपल्या अष्टपैलू खेळाच्या जोरावर मानाच्या प्रथम क्रमांकाच्या चषकावर नाव कोरले. तर एस पी रायडर्स आणि झेन इलेव्हन संघ अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांकाचे मानकरी ठरले.

या स्पर्धेत प्रसिद्ध समालोचक निलेश भुवड आणि शिक्षक अविनाश धाडवे यांनी आपल्या खुमासदार शैलीत केलेल्या समालोचनाने सामन्यांची रंगत आणखीनच वाढवली. बक्षीस वितरण समारंभाला सभापती प्रेरणा सावंत, जिल्हा परिषद सदस्य मन्सूर ताज, शिरगांव सरपंच सोमनाथ ओझर्डे, जितेंद्र सावंत, सोहेब पाचकर, कृष्णा सुकूम, एकनाथ सुकूम, राजेश सुकूम, संजय धाडवे, काशिनाथ भुवड, सखाराम पवार यांच्यासह पंचक्रोशी तसेच विभागातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

खेळाडूंना पाठबळ देण्यासाठी एकूण ८ संघ आणि त्यांच्या संघमालकांनी मैदानात आपली ताकद पणाला लावली होती, यामध्ये एकनाथ सुकूम मित्र मंडळ, (संघमालक :एकनाथ सुकुम), एस. पी. इलेव्हन (संघमालक: सखाराम पवार), झेन इलेव्हन, (संघमालक: कु. झेन देशमुख,) श्री स्वामी समर्थ इलेव्हन (संघमालक: राजेंद्र भावे), गौरव अद्विक इलेव्हन खुटील (संघमालक: जयदास मोरे), साराह इलेव्हन (संघमालक: साराह देशमुख), हर्ष इलेव्हन (संघमालक: प्रदीप भुवड), के.पी.एल. रायडर्स के.पी.एल. कमिटी संघ या संघांनी भाग घेतला होता. सर्वच संघ मालकांनी आपल्या संघांना उत्तम प्रोत्साहन दिले.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष दीपक सुकुम, सेक्रेटरी प्रशांत निंबरे, खजिनदार जितिन मालुसरे, वैभव मोरे, युवराज धाडवे, उमर देशमुख, अमीन देशमुख, फिरोज देशमुख आणि कमिटी सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. सर्व खेळाडू आणि क्रीडाप्रेमींचे आयोजकांच्या वतीने आभार मानण्यात आले.

### माथेरानमध्ये अश्व शर्यतींचा जल्लोष | ५६व्या वर्षी माथेरान वार्षिक स्पर्धेचे आयोजन
# सबिल अन् सुफियान ठरले चॅम्पियन

| नेरळ | प्रतिनिधी |

माथेरान नगरपरिषद आणि माथेरान युथ सोशल क्लब यांच्या माध्यमातून अश्व शर्यतींचे आयोजन केले जाते.दोन दिवसीय माथेरान वार्षिक क्रीडा स्पर्धेत पर्यटक आणि स्थानिकांनी मोठा सहभाग घेतला. माथेरान युथ सोशल क्लब कडून गेली ५५ वर्षे माथेरान वार्षिक क्रीडा स्पर्धेचे आयोजन केले जाते.

माथेरान सोशल क्लबचे अध्यक्ष माजी नगराध्यक्ष प्रदीप दिवाडकर यांनी माथेरानमध्ये अश्व शर्यती सुरू केल्या.त्यानंतर माथेरान नगरपरिषद आणि माथेरान सोशल यांच्याकडून माथेरान वार्षिक क्रीडा स्पर्धेचे आयोजन येथील



ऑलिंपिया रेसकोर्स हुतात्मा भाई कोतवाल मैदान येथे करण्यात येऊ लागले. वेळी नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी उपनगराध्यक्ष संतोष शेलार दिव्यांग कल्याण सभापती रिजवाना अनिस शेख बांधकाम सभापती गौरंग वाघेला, नगरसेवक सोहेल महापुळे, किरण पेमारे उपस्थित होते. माथेरान सोशल क्लबचे अध्यक्ष प्रशाम दिवाडकर तसेच करण संघवी,प्रसाद सावंत, छाया दवे, शर्मिला दिवाडकर, रितिका दिवाडकर यांच्यासह माथेरानमधील आश्वपाल या स्पर्धेचे नियोजनात आघाडीवर असतात. दोन दिवसीय पंच म्हणुन प्रशांत दिवडकर तसेच दिनेश आखाडे आणि जाणू आखाडे यांनी काम पाहिले.१९८९-९० मध्ये छत्रपती शिवाजी महाराज पुरस्काराने सन्मानित झालेल्या कल्पना दिवाडकर या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

विविध स्पर्धांमधून मधून लोकल चॅम्पियन सबील महापुळे हे ठरले.तर टुरिस्ट चॅम्पियन सुफियान शेख यांचा सन्मान झाला. सहा स्पर्धांमध्ये सुफियान शेख यास प्रथम पारितोषिक मिळाले घोड्याचे नाव बाबर होते. चॅम्पियन हॉर्स म्हणून बाबर या घोड्याचा प्रथम क्रमांक आला.मनन सोनी, शैलेश शिंदे, जानू आखाडे, अब्बास मुकादम, अभिषेक मूर्ती, आयान मूर्ती, गोविंद झोरे, हितेश शहा, हर्षल दवे, आनंद विरामने, आतिक अल्ताफ, रईस कुरेशी, मुजफ्फर पटेल यांनी विविध गटात पारितोषिके मिळविली. यावेळी माथेरान मधील डोंगर भागात राहणार आदिवासी यांच्यासाठी धावण्याची स्पर्धा आयोजित करण्यात आली.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)